जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार २८ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०

महाविकास आघाडीत अस्वस्थता



मुंबई/पुणे : संसदेच्या विशेष अधिवेशनात केंद्र सरकारकडून प्रस्तावित मतदारसंघ पुनर्रचना अर्थात डिलिमिटेशन विधेयक मांडले जाण्याच्या हालचालींना वेग आला असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने या विधेयकाला सशर्त पाठिंबा देण्याचे संकेत दिल्याने महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीत मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. एकीकडे काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) आणि समाजवादी पक्षाने या विधेयकाला तीव्र विरोध दर्शवला असताना, शरद पवार गटाच्या या वेगळ्या चुलीमुळे विरोधी पक्षांच्या एकजुटीत उभी फूट पडल्याचे चित्र समोर आले आहे. संसदेच्या आगामी विशेष सत्रात घटनादुरुस्तीसाठी केंद्र सरकारला दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर ➪ (पान २ वर)

मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षणाच्या विधेयकातील दुरुस्त्यांना मंत्रिमंडळाची मंजूरी

नवी दिल्ली : मतदारसंघ पुनर्रचना आणि महिलाआरक्षणाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयकातील दुरुस्त्यांना कॅबिनेटमध्ये मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मोदींच्या कॅबिनेट मंत्रिमंडळाने मतदारसंघांच्या पुनर्रचनेशी (डिलिमिटेशन) संबंधित घटनादुरुस्ती विधेयकाला मंजुरी दिली आहे. यामध्ये विविध राज्यांमधील जागांची संख्या ५० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यांमध्ये जागांच्या वाटपाची सध्याची व्यवस्था पुढील २५ वर्षांपर्यंत, म्हणजेच २०५१ सालापर्यंत, कायम राहील. याच पार्श्वभूमीवरती केंद्र सरकार आणत असलेल्या डिलिमिटेशन बिलाला पाठींबा मिळावा यासाठी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यासोबत भाजपाच्या वरिष्ठ



नेत्यांचा संपर्क केला असल्याची माहिती आहे. पुढील काही दिवसांत हे बिल आणले जात आहे, त्यावेळेस सर्व सहकार्य मिळावे यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाच्या नेत्यांसोबत संवाद करून शंका दूर करण्यात येणार असल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. मोदी सरकारची मंत्रिमंडळ बैठक पार पडली आहे. ही बैठक सुमारे ४० मिनिटे चालली. पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत संसदेच्या आगामी कामकाजावर चर्चा करण्यात आली. सूत्रांनुसार, बैठकीत 'डीलिमिटेशन बिल' (परिसीमन विधेयक) मंजूर करण्यात आले. याव्यतिरिक्त, महिला आरक्षणाशी संबंधित एक दुरुस्तीही मंजूर करण्यात आली आहे. लोकसभा ३० नोव्हेंबर रोजी, तर राज्यसभा २ डिसेंबर रोजी बोलावण्यात आली आहे. दिल्ली पातळीवर आणि राज्य सरकारच्या पातळीवरती घडामोडींना वेग आला आहे, भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांना संपर्क केला असल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या पक्षाशी आता भाजपचे वरिष्ठ नेते संपर्क साधत आहेत. याआधी देखील संपर्क करण्यात आला होता, हे विधेयक पास व्हावं यासाठी भाजपकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. तर हे विधेयक पास करताना कोणकोणते पक्ष पाठिंबा देऊ शकतात त्यांना संपर्क केला जात आहे, तर या विधेयकाची माहिती जाणून घेतल्यानंतर त्याला पाठिंबा देण्याबाबत शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे संकेत ➪ (पान २ वर)

नेते-कार्यकर्त्यांनी जनतेत दिसावे, होर्डिंग्जवर नाही-मुख्यमंत्री

पुणे : पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या नेतृत्वाखाली शहरात सुरू असलेल्या अतिक्रमणविरोधी आणि अनधिकृत जाहिरात फलकांविरोधातील मोहिमेची दखल आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. महापालिकेच्या अभिनव 'भाऊ फ्लेक्स काढा' या मोहिमेसह अतिक्रमणविरोधी कारवाईचे मुख्यमंत्र्यांनी मनापासून कौतुक केले आहे. विशेष म्हणजे, उद्या माझ्या नावाचेही बेकायदा होर्डिंग लागले, तर पुरस्कारांच्या यादीत माझेही नाव जाहीर करा, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी महापालिका प्रशासनाच्या कारवाईला पाठबळ दिले आहे.शुक्रवारी (२७ नोव्हेंबर) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरून पुणे महापालिकेच्या कार्यवाहीचे अभिनंदन



केले. शहरातील रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागा नागरिकांसाठी मोकळ्या असल्या पाहिजेत, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

नियम केवळ शासकीय दस्तावेजात छापण्यासाठी नसतात!

पुण्यात सध्या अतिक्रमणांविरोधात आणि विशेषतः अनधिकृत होर्डिंग्जविरोधात सुरू असलेल्या कारवाईबद्दल पुणे महापालिका प्रशासनाचे मनापासून कौतुक आणि अभिनंदन करतो. शहरातील पायाभूत सुविधांचा नागरिकांना योग्य वापर करता आला पाहिजे. वाहनांसाठी आणि पादचाऱ्यांसाठी मोकळ्या जागा उपलब्ध असल्या पाहिजेत, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.नियम हे केवळ शासन निर्णय किंवा शासकीय दस्तावेजांमध्ये प्रकाशित करण्यासाठी नसतात, तर ते प्रत्यक्षात पाळण्यासाठी असतात. सर्वसामान्य नागरिकांचे जीवन सुखकर करणे, हाच त्यामागील खरा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

माझ्या नावाचे होर्डिंग लागले तरी माझे नाव जाहीर करा!

बेकायदेशीर होर्डिंग्ज ही केवळ पुण्याची समस्या नसून सर्वच शहरांमध्ये ती गंभीर बनली आहे. त्याविरोधात सातत्याने आणि नियमितपणे कारवाई होणे आवश्यक आहे. पुणे महापालिकेने स्वीकारलेल्या अभिनव आणि अस्सल पुणेरी संकल्पनेचे ➪ (पान २ वर)

रोहित पवारांवरून दोन्ही राष्ट्रवादीत वाद

पुणे : गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात अनेक राजकीय घडामोडी घडताना पाहायला मिळत आहेत. यातच पुण्यातील शिवाजीनगर



न्यायालयाबाहेर बुधवारी एका व्यक्तीवर झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यावरूनच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकारण तापले आहे. या घडामोडीच्या अनुषंगाने पुण्याच्या पालकमंत्रिपदावरून वाद पेटला असून राष्ट्रवादी (शरद पवार) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षात आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळत आहेत.शहर शोधा

आमदार रोहित पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. पुण्यातील घटनेवर बोलताना खासदार सुप्रिया सुळे यांनी पुण्याची जबाबदारी आणि पालकत्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घ्यावे असे म्हटले होते. तसेच रोहित पवारांनीही यावर भाष्य करत पुण्याचे पालकमंत्री अजित पवारांसारखे काम करत नाहीत असे म्हटले होते.शहर शोधा

रोहित पवारांनी केलेल्या वक्तव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर अखेर रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची माफी मागितली होती. दरम्यान, आता रोहित पवार यांनी सुनेत्रा पवारांबाबत केलेल्या वक्तव्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनीही माफी मागितली आहे. ➪ (पान २ वर)

शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा डिलिमिटेशनला पाठिंबा

जितेंद्र आव्हाडांनी केली भूमिका स्पष्ट, म्हणाले- माझ्या दैवताची जी भूमिका तीच माझी

आव्हाडांची भूमिका कोल्हेंनी खोडली

मुंबई : डिलिमिटेशन विधेयकाचा मसूदा आल्याशिवाय पाठिंब्याचा निर्णय घेता येणार नाही. संसद समिती विधेयकाचा मसूदा समोर आल्याशिवाय त्यावर भूमिका घेणे योग्य ठरणार नाही. अद्याप हा मसूदा आला नाही. त्यामुळे पाठिंब्याचा निर्णय घेता येत नाही अशी भूमिका खासदार अमोल कोल्हे यांनी मांडली आहे. डिलिमिटेशन विधेयकाला आमचा पाठिंबा असेल असे विधान राष्ट्रवादी नेते जितेंद्र आव्हाड यांनी केली होती. त्यानंतर अमोल कोल्हे यांनी हे विधान केले. खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, विधेयकाचा मसूदा अद्याप आमच्या हातात आला नाही. जोपर्यंत त्यातील बारकावे आम्ही समजून घेत नाही तोपर्यंत पाठिंब्याचा निर्णय घेता येणार नाही.



डिलिमिटेशन ही संवैधानिक तरतूद आहे हे खरे आहे. परंतु जोपर्यंत विधेयक मसूदा समोर येत नाही तोपर्यंत पाठिंब्याचा निर्णय घेता येणार नाही. मसूदा आल्यानंतर पक्षातंर्गत बैठक होईल. त्यानंतर यावर चर्चा होईल. जर मसूदा संयुक्तिक असेल तर आम्ही सकारात्मक विचार करू असे सुप्रिया सुळे यांनीही म्हटले आहे. परंतु आधी मसूदा येऊ द्या, त्यावर चर्चा होईल. मग विरोध आणि समर्थनाचा निर्णय होईल असे त्यांनी सांगितले.तसेच कुठलीही भूमिका घेताना त्याची कारणेही पाहिली पाहिजे. विरोध करायचा ➪ (पान २ वर)

काँग्रेस अलर्ट मोडवर, सर्व खासदारांना दिल्लीत दाखल होण्याच्या सूचना

मुंबई : राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत असून ३० नोव्हेंबरला भाजप सरकारने विशेष अधिवेशन बोलावले आहे. याच अधिवेशनात डिलिमिटेशन बिल देखील सादर होण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आता घडामोडींना वेग आला आहे. काँग्रेसकडून आपल्या सर्व खासदारांना दिल्लीत दाखल होण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी दहाच्या आत दिल्लीमध्ये हजर व्हा, अशा सूचना पक्षाच्या वतीने खासदारांना देण्यात आल्या आहेत. काँग्रेसच्या सर्व खासदारांची एकत्र बैठक होण्याची देखील शक्यता आहे. ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबरपर्यंत या काळात संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्यात आले असून या अधिवेशनात डिलिमिटेशन बिल सादर केले जाण्याची



शक्यता आहे. काँग्रेसकडून या बिलाला जोरदार विरोध होत आहे.

मतांची जुळवाजुळव- दरम्यान यापूर्वी देखील एकदा केंद्रातील भाजप सरकारकडून डिलिमिटेशन बिल सादर करण्यात आले होते. मात्र ते मंजूर होऊ शकले नाही. मात्र यावेळी भाजपाने मतांचे गणित लक्षात घेऊन आधीच खासदारांच्या आकड्याची जुळवाजुळव केल्याची चर्चा आहे. या बिलाला एनडीएचे घटक पक्ष नसलेले देखील काही पक्ष पाठिंबा देण्याच्या तयारीमध्ये आहेत. तामिळनाडूमधील मोठा पक्ष असलेल्या डीएमकेने या बिलाला पाठिंबा देण्याची तयारी दाखवली आहे. जर सर्व राज्यांना ५० टक्के जागा मिळणार असतील तर आम्ही पाठिंबा देण्याचा विचार करू असे स्टॅलिन यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून देखील या बिलाला पाठिंबा दिला जाऊ शकतो. दरम्यान ३० नोव्हेंबर रोजी विशेष अधिवेशन बोलावण्यात आले ➪ (पान २ वर)

त्र्यंबकमध्ये पुजेनंतरची वस्त्रे धुऊन पुन्हा बाजारात

नाशिक : कुंडली दोष दूर करण्यासाठी त्र्यंबकेश्वरमध्ये कालसर्प आणि नारायण नागबळी पूजा करतात. यात धारण केलेली सुतकाची सफेद वस्त्रे स्नानानंतर त्याज्य म्हणून तेथेच सोडून देण्यास भाविकांना सांगण्यात येते. भाविकांची पाठ फिरताच ही वस्त्रे संकलित करून पुन्हा नाशिक प्रक्रियेसाठी आणण्यात येतात आणि त्यानंतर ते वस्त्र त्र्यंबकमध्ये विक्रीस उपलब्ध होत असल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे.देशभरातून भाविक मोठया श्रद्धेने, भावनेने येथे पूजेसाठी येतात. मात्र, असे प्रकार म्हणजे त्यांच्या भावनांशी खेळच आहे. हे थांबायला हवे अशी मागणी भाविकांमधून होत आहे. या पूजांसाठी देशभरातून भाविक त्र्यंबकेश्वरमध्ये येतात. त्यांना तेथेच खरेदी केलेली वस्त्रे घ्यायला लावतात. कुर्ता, पंचा, साडी असा साधारण ५०० ते ७०० रुपयांचा सेट भाविकांना नवा कोरा म्हणून विकला जातो.

विधीसाठी त्याज्य सुतकी कपडे अशुभ- कुंडली व पितृदोष हा विधी शुद्धीसाठी आहे. त्यामुळे कोरी वस्त्रे आवश्यक. सुतकी वस्त्रे पुन्हा विकली जात असल्यास चुकीचे. कुणी असे करत असल्यास भाविकांमध्ये जनजागृती करत तक्रारींची दखल घेतली जाईल असे त्र्यंबक पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज थेटे यांनी सांगितले.

एक तर अमेरिका सोडा, नाहीतर नोकरी सोडा!

न्यूयॉर्क : अमेरिकेत दुस-यांदा डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार आल्यापासून अमेरिकेत राहणा-या परदेशी नागरिकांवर वेगवेगळी संकटे येत आहेत. अमेरिकेतील एच-१ बी व्हिसाधारक कर्मचा-यांसमोर आता नवे संकट ओढावले आहे. प्रसिद्ध आयबीएम कंपनीने कर्मचा-यांना एक तर अमेरिका सोडा किंवा नोकरी सोडा असे फर्मान काढले आहे. कारण, आयबीएमने आपल्या कन्सल्टिंग विभागातील बहुतांश पदांसाठी अमेरिकी



वर्क व्हिसा आणि ग्रीन कार्डसाठी प्रायोजकत्व देणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.कन्सल्टिंग विभागात १,५०,००० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. कंपनीच्या या निर्णयामुळे संबंधित विभागातील कर्मचा-यांना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत नोकरीचा राजीनामा द्यावा लागणार आहे. जर कंपनीत कायम राहायचे असेल, तर या कर्मचा-यांना दुस-या देशात स्थलांतरित व्हावे लागणार आहे. त्यामुळे या कर्मचा-यांसमोर नोकरी गमावण्याची टांगती तलवार आहे. जे कर्मचारी दुस-या ठिकाणी स्थलांतरित न होता कंपनी सोडण्याचा पर्याय निवडतील, त्यांना तीन महिन्यांच्या पगाराइतकी नुकसानभरपाई दिली जाईल आणि ३१ डिसेंबर हा त्यांचा कामाचा शेवटचा दिवस असेल. कौशल्यांची कमतरता भरून काढण्यासाठी आयबीएम कन्सल्टिंग अमेरिकेतील उच्च-कुशल कामगारांसाठीच्या व्हिसा कार्यक्रमांमध्ये सहभागी होते. कंपनीने अशा बहुतांश पदांसाठी व्हिसा आणि ग्रीन कार्ड प्रायोजकत्व देणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, असे आयबीएमच्या प्रवक्त्याने सांगितले. नोकरीच्या संधीही प्रामुख्याने अमेरिकेबाहेर आहेत. आयबीएमच्या करिअर पोर्टलवरील माहितीनुसार, अमेरिकेबाहेर कन्सल्टिंग पदांच्या १,२७८ जागा उपलब्ध असून यामध्ये भारतीय १,१२५, सिंगापूर २३ आणि युनायटेड किंगडममधील १८ जागांचा समावेश आहे. अमेरिका सोडून भारतात स्थलांतर केल्यास पगारात जवळपास ८० टक्क्यांपर्यंत कपात होऊ शकते.

उत्तर प्रदेशात ४० तर महाराष्ट्रात २४ खासदार वाढणार

नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या सुधारित मतदारसंघ पुनर्रचना विधेयकातील (अ-र्त्सूर्ग्दह ग्त्त) प्रस्तावानुसार, सर्व राज्यांच्या लोकसभेच्या जागांमध्ये सरसकट ५० टक्क्यांची वाढ केली जाणार आहे. हे विधेयक पारित झाल्यास लोकसभेतील खासदारांची संख्या सध्याच्या ५४३ वरून वाढून सुमारे ८१५ इतकी होईल. राज्यघटनेतील कमाल जागांची मर्यादा ५५० वरून ८५० पर्यंत नेण्याचा प्रस्ताव या विधेयकामध्ये मांडण्यात आला आहे. त्याचवेळी महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचं विधेयकही मांडण्यात येणार आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने मतदारसंघ



पुनर्रचना विधेयक आणि महिला आरक्षण विधेयकाला मंजुरी दिली आहे. हे दोन्ही विधेयकं आता संसदेमध्ये मांडण्यात येणार असून ती मंजूर करुन घेण्यासाठी सरकारने जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत.

सरकारच्या या नव्य प्रस्तावानुसार सर्व राज्यांच्या खासदारांच्या संख्येत सरसकट ५० टक्क्यांची वाढ होणार आहे. महाराष्ट्रात सध्या ४८ खासदार असून नव्या विधेयकानुसार ती संख्या ७२ पर्यंत पोहोचणार आहे. म्हणजे राज्यात २४ नवे खासदार वाढणार आहेत. या ७२ जागांपैकी २४ जागा या महिलांसाठी आरक्षित असणार आहेत

गुजरातमधून जैश-ए-मोहम्मदचा संशयित दहशतवादी अटक

वडोदरा : गुजरात दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) वडोदरा येथून जैश-ए-मोहम्मदशी संबंधित संशयित दहशतवादी मोहम्मद सहारुल इस्लाम याला अटक केली आहे. तो आसामचा रहिवासी आहे. अळर ने जारोड बसस्थानकाजवळ एका संशयित वाहनाला थांबवून आरोपीला पकडले. त्याच्याकडून एक एके-४७ रायफल आणि २० हून अधिक जिवंत काडतुसे सापडली आहेत. गुजरात अळर च्या अधिका-यांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणात मोठी कारवाई सुरू असून आरोपीची चौकशी केली जात आहे. गुजरात एटीएसने ३ जुलै रोजी दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी संबंधित ८ दहशतवाद्यांना गुजरात आणि मध्य प्रदेशातून पकडले होते. सर्वांना वेगवेगळ्या जिल्ह्यांतून पकडण्यात आले. ➪ (पान २ वर)

नोएडामध्ये १६४ परदेशी नागरिकांची सुटका

नोएडा : नोएडामध्ये ओलीस ठेवलेल्या १६४ परदेशी नागरिकांची सुटका करण्यात आली आहे. यामध्ये ९२ इंडोनेशियन आणि ७२ मलेशियन नागरिकांचा समावेश आहे. या सर्वांना आधी चांगल्या नोकरीचे आमिष दाखवून भारतात बोलावण्यात आले. त्यानंतर त्यांचे पासपोर्ट काढून घेऊन त्यांच्याकडून जबरदस्तीने सायबर फसवणूक करून घेतली जात होती. दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने गुरुवारी नोएडाच्या सेक्टर १३६ मध्ये सुरू असलेल्या कॉल सेंटरवर छापा टाकला. पोलिसांनी येथून ३५५ मोबाइल फोन, १७५ हून अधिक डेस्कटॉप आणि लॅपटॉप तसेच अनेक सिम ➪ (पान २ वर)

भारत पाचवी एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली तैनात करणार

नवी दिल्ली : भारत जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्तानला लागून असलेल्या ७४० किलोमीटर लांबीच्या नियंत्रण रेषेवर सुरक्षा मजबूत करण्याच्या तयारीत आहे. यासाठी पाचवी एस-४०० हवाई संरक्षण यंत्रणा तैनात करण्याची योजना आहे. भारतीय हवाई दलाचे एक पथक पुढील महिन्यात रशियाला जाऊन या यंत्रणेची प्री-डिस्पॅच तपासणी करणार आहे. फेब्रुवारी २०२७ पर्यंत ती तैनातीसाठी सज्ज होण्याची अपेक्षा आहे. ही माहिती या प्रकरणाशी संबंधित दोन अधिका-यांनी दिली आहे. अहवालानुसार, चीन २०२७ मध्ये पाकिस्तानला जे-३५ पाचव्या पिढीची लढाऊ विमाने देऊ शकतो. याला प्रत्युत्तर म्हणून भारत दीर्घ पल्ल्याची शस्त्रे आणि लोइटरिंग म्युनिशन्स तयार करण्याची व खरेदी करण्याची योजना आखत आहे. भारत या शस्त्रांच्या माध्यमातून चीनच्या पीएल-१५ ई दीर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्राचा आणि मुख्यालय-९बीई हवाई संरक्षण प्रणालीचा मुकाबला करू इच्छितो. ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानी हवाई दलाने चिनी जे १० लढाऊ विमाने आणि स्वीडिश अहअउरच्या मदतीने सुमारे २०० किलोमीटर पल्ल्याच्या पीएल-१५ ई क्षेपणास्त्रांचा वापर केला होता. अहवालानुसार, ➪ (पान २ वर)

न्यायाधीशांच्या नियुक्तीवर माजी सीजेआय गवई यांचे प्रश्नचिन्ह

नवी दिल्ली : सुप्रीम कोर्टचे माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहून सुप्रीम कोर्ट आणि हायकोर्टमधील न्यायाधीशांच्या नियुक्त्या आणि बदल्यांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. २७ नोव्हेंबर रोजी लिहिलेल्या पत्रात त्यांनी आरोप केला की, कॉलेजियमच्या अलीकडील शिफारशींमध्ये एका विशिष्ट समुदायाला प्राधान्य दिले जात आहे. त्यांनी म्हटले की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय म्हणजेच एससी, एसटी आणि ओबीसी, अल्पसंख्याक तसेच महिलांचे प्रतिनिधित्व कमी होत आहे. गवई यांनी कॉलेजियमच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना म्हटले की, न्यायाधीशांच्या नियुक्त्या आणि बदल्यांमध्ये गुणवत्ता, विविधता आणि सर्व वर्गांचा सहभाग दुर्लक्षित केला जात आहे. त्यांनी कॉलेजियम व्यवस्थेतील उत्तरदायित्वाच्या अभावाचा मुद्दाही उपस्थित केला आणि राष्ट्रपतींना या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले.



७१५ न्यायाधीशांमध्ये एससीचे केवळ २२

गवई यांनी पत्रात नमूद केले की, २०१८ पासून आतापर्यंत उच्च न्यायालयात नियुक्त झालेल्या ७१५ न्यायाधीशांपैकी केवळ २२ अनुसूचित जाती, १६ अनुसूचित जमाती, ८९ ओबीसी आणि ३७ अल्पसंख्याक समुदायांमधील आहेत. त्यांच्या मते, जवळपास तीन-चतुर्थांश नियुक्त्या सामान्य प्रवर्गातून झाल्या आहेत. त्यांनी असेही लिहिले की, जानेवारी २०२१ ते ➪ (पान २ वर)


संपूर्ण लग्न बस्ता
आराधना
होलसेल शॉपिंग मॉल
• बनारसी शालू • डिझायनर साड्या • घाघरा ओढनी
• ड्रेस मटेरियल • सलवार सुट • रेडीमेड कोट
• सुटिंग-शर्टिंग • टिनेज वेअर • किड्स वेअर
फॅशन | ज्वेलरी | विल्ड्रेन्स वेअर | शूज व सँडल | होम डेकोर | मैचिंग
जवाहर रोड, अमरावती. 2574594 / L -2, बिझीलॅन्ड, नांदगावपेठ, अमरावती.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

लुंबिनी बुद्ध विहारात कठीण चिवरदान महोत्सव श्रद्धामय वातावरणात संपन्न!

धम्मरॅली, महापरित्राण पाठ व संघदानाला हजारोंची उपस्थिती



अमरावती/प्रतिनिधीः-

तपोवन परिसरातील लुंबिनी बुद्ध विहार येथे पूज्य भिक्खू अमरावती सीलवंसलंकार यांच्या तृतीय वर्षावास समापनानिमित्त २३ व २४ नोव्हेंबर रोजी आयोजित दोन दिवसीय कठीण चिवरदान महोत्सव व महापरित्राण पाठ उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

२३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता कठीण चिवरासाठी वस्त्र ग्रहण करून चिवरनिर्मिती प्रक्रियेला प्रारंभ झाला. शेकडो उपासक-उपासिकांनी दिवसभर सामूहिकरीत्या चिवर शिवण्याच्या प्रक्रियेत सहभाग घेतला. त्यानंतर रात्री निघालेल्या भव्य धम्मरॅलीने संपूर्ण नगरी धम्ममय झाली. बुद्धकालीन वैशालीच्या सामूहिक धम्मजीवनाच्या संकल्पनेतून प्रेरित या धम्मरॅलीतून मैत्री, करुणा, समता व सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्यात आला. यानंतर लुंबिनी बुद्ध विहारातील नवनिर्मित भिक्खू निवासाचे भिक्खू संघाच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. संपूर्ण रात्र महापरित्राण पाठाचे आयोजन करण्यात आले. याचदरम्यान कठीण चिवराला पारंपरिक पद्धतीने रंग देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. वस्त्र शिवण्यापासून चिवरनिर्मितीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया बौद्ध परंपरेनुसार २४ तासांच्या कालमर्यादेत पूर्ण करण्यात आली. २४ नोव्हेंबर रोजी भिक्खू संघाला भोजनदान, संघदान व धम्मदेशनेचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सामाजिक सलोखा आणि सद्भावनेचा परिचय देत अमरावती जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे, मनपा विरोधी पक्षनेते विलास इंगोले, माजी मंत्री सुनील देशमुख, नगरसेवक बबलू शेखावत व नगरसेवक मिलिंद चिमोटे यांनी सदिच्छा भेट दिली.

समारोपप्रसंगी हजारोंच्या संख्येने उपस्थित अनुयायांना सामूहिक भोजनदान करण्यात आले.

१ व १० वरिल उर्वरित

महाविकास आघाडीत अस्वस्थता

प्रत्येक राज्यात ५० टक्के जागावाढ आणि महिला आरक्षण लागू करण्याच्या अटीवर देशहितासाठी डिलिमिटेशन विधेयकाला सकारात्मक प्रतिसाद देण्याचे संकेत खासदार सुप्रिया सुळे यांनी दिले आहेत. तसेच, पक्षाने आपल्या सर्व खासदारांना अधिवेशनात उपस्थित राहण्यासाठी व्हिपही जारी केला आहे. शरद पवार गटाच्या या बदलत्या पवित्र्यामुळे सत्ताधारी एनडीएचे संख्याबळाचे गणित सोपे होण्याची शक्यता वर्तवली जात असून मित्रपक्षांनी यावर तीव्र नाराजी आणि संशय व्यक्त केला आहे.

मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला

गेल्या काही दिवसांपासून दिसून येत आहे. संसदेचे चार दिवसीय अधिवेशन आहे, यामध्ये महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मांडले जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. हे स्वतंत्र हिवाळी अधिवेशन नसून पावसाळी अधिवेशनाचाच पुढील भाग असणार आहे. ३० नोव्हेंबरपासून लोकसभेचे तर २ डिसेंबरपासून राज्यसभेचे कामकाज सुरू होणार आहे.

नेते-कार्यकर्त्यांनी जनतेत

कौतुक करावे तेवढे कमी आहे, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. उद्या माझ्या स्वतःच्या नावाचे जरी बेकायदा होर्डिंग लागले, तरी प्रशासनाने कोणताही मुलाहिजा न ठेवता तुमच्या त्या पुरस्कारांच्या यादीत माझेही नाव जाहीर करावे, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांनाही स्पष्ट संदेश दिला आहे.नेते आणि कार्यकर्त्यांनी जनतेत दिसावे, होर्डिंग्जवर नाही!

रोहित पवारांवरून दोन्ही

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या जर भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी अंत:करणातून आणि हात जोडून माफी मागते असे खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

रोहित पवार यांनी माफी मागितली आहे. त्यामुळे एकदा माणूस सॉरी म्हटल्यानंतर आता काय बोलणार. मात्र, तरीही राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या काही महिला नेत्या आंदोलन करत आहेत. खरं तर आंदोलन करणा-या महिला नेत्या आणि आम्ही आधी एकत्र काम केलेले आहे.

आव्हाडांची भूमिका कोल्हेंनी

असेल तर कोणत्या कारणासाठी आणि समर्थन द्यायचे असेल तर कोणत्या कारणासाठी, त्यामुळे आधी मसूदा येऊ द्या. विधेयकाच्या मसुद्यात काय आहे हे वाचल्याशिवाय त्यावर भाष्य करणे हे खूप घाईचे होत आहे. मसूदा समोर आल्यानंतर त्यावर निर्णय घेऊ. मंत्रिमंडळातील निर्णयाचे काही मुद्दे समोर आलेत पण विधेयकाचा मसूदा आणि त्यातील बारकावे समोर आले पाहिजेत असे खासदार अमोल कोल्हे यांनी म्हटले.

काँग्रेस अलर्ट मोडवर, सर्व खासदारांना

आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून आपल्या सर्व खासदारांना व्हीप लागू करण्यात आला आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे मुख्य प्रतोद खासदार अमोल कोल्हे यांनी सर्व खासदारांना व्हीप जारी केला आहे. अधिवेशन काळात सर्वांनी सभागृहात हजर राहावे, तसेच पक्ष जी भूमिका घेईल तिला पाठिंबा द्यावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तर काँग्रेसकडून सर्व खासदारांना दिल्लीत बोलावण्यात आले आहे.

गुजरातमधून जैश-ए-मोहम्मदचा

यापैकी दोघांचे वय १८ आणि १९ वर्षे आहे. हे सर्व गुजरातमध्ये खोटचे एक सक्रिय नेटवर्क तयार करण्यासाठी काम करत होते, जेणेकरून दहशतवादी कारवाया घडवून आणता येतील. माहिती मिळाल्यानंतर एटीएसने ५ वेगवेगळ्या पथकांची स्थापना करून मोठी मोहीम राबवली होती.

नोएडामध्ये १६४ परदेशी

कार्ड जप्त केले. यामध्ये आंतरराष्ट्रीय सिम कार्डांचाही समावेश आहे. सुमारे १७५ पासपोर्टही जप्त करण्यात आले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, हे सर्व जण बिझनेस व्हिसावर भारतात आले होते. सायबर फसवणुकीच्या या प्रकरणात एका मलेशियन नागरिकाला अटक करण्यात आली आहे. तर, २ भारतीय नागरिक फरार आहेत.

न्यायाधीशांच्या नियुक्तीवर माजी

जानेवारी २०२६ दरम्यान उच्च न्यायालयातील नियुक्त्यांमध्ये सामान्य प्रवर्गाचा वाटा सुमारे ८०ङ्म राहिला. दुसरीकडे, देशाच्या लोकसंख्येत ४० ते ५०ङ्म वाटा असलेल्या ओबीसी समुदायाला १४ङ्म पेक्षाही कमी पदे मिळाली.

भारत पाचवी एस-४०० हवाई

चीन आणि तुर्किये पाकिस्तानची लष्करी ताकद वाढवत आहेत. अमेरिका पाकिस्तानच्या एफ-१६ लढाऊ विमानांचे आधुनिकीकरण करण्यास मदत करत आहे, तर सौदी अरेबिया त्याला आर्थिक मदत देत आहे. पाकिस्तान चीनकडून ८ हँगोर श्रेणीतील पाणबुड्या खरेदी करत आहे. या कराराची किंमत ५ अब्ज डॉलर म्हणजेच सुमारे ४६,२२० कोटींपेक्षा जास्त आहे. यापैकी एक पाणबुडी जून २०२६ मध्ये पाकिस्तानी नौदलात सामील झाली आहे. तुर्किये पाकिस्तानच्या अगोस्टा-९० बी पाणबुड्यांचे अपग्रेड करत आहे आणि त्याला लांब पल्ल्याचे कामिकाझे ड्रोन देत आहे. त्याचवेळी, चीनने पाकिस्तानला क्षेपणास्त्र डागण्यास सक्षम विंग लूंग-कक ड्रोनही दिले आहेत.

जर्जर राजकमल उड्डाणपूल इतिहास

२०२७ च्या अखेरपर्यंत नवीन पुलाचे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.नवीन पूल भविष्यात शहराला वाहतुकीची चांगली सुविधा देणारा ठरणार असला तरी सध्या जुना पूल पाडणे आणि नवीन बांधकामाच्या मध्ये नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः रेल्वे स्टेशन, बेलपुरा, राजापेठ आणि इर्विन चौकाकडे येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांसमोर वाहतुकीचे आव्हान उभे राहिले आहे. पुलाचा वरचा भाग हटवल्या नंतर आता या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद राहणार आहे. संबंधित संस्थांकडून नवीन पूल बांधून होईपर्यंत रस्ता बंद ठेवण्याची तयारी आहे. त्यामुळे नागरिकांना पर्यायी मार्गांचा आधार घ्यावा लागणार आहे.पूल पाडल्या नंतर निघणाऱ्या ढिगाऱ्याची विल्हेवाट लावण्याचा मुद्दाही समोर आला आहे. माहिती नुसार, नेहरू मैदान अथवा सांस्कृतिक मैदानात ढिगारा ठेवण्याची परवानगी प्रशासना कडून न मिळाल्याने संबंधित कंत्राटदाराला मोठी अडचण येत आहे. ठेकेदार पंकज रामेकर यांच्याकडून पोकलेन आणि वाहनांच्या मदतीने ढिगारा हटवून मलबा शहराबाहेरील नवसारी परिसराकडे नेला जात आहे.

अखेर व्यापारी स्वतःहून काढणार

दखल घेत काल (दि. २७) बाजार समितीचे संचालक मंडळ, व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ आणि बंडू घोम व शिवसेना पदाधिकारी यांच्यात समन्वयाची बैठक उपोषण स्थळी पार पडली.व्यापाऱ्यांनी पुन्हा अतिक्रमण पुढे वाढवू नये, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. चर्चेअंती व्यापाऱ्यांनी स्वतःहून नालीपासून दुकानाच्या दिशेने असलेले २० फुटांचे अतिक्रमण काढून घेण्याचे मान्य केले व तसे लेखी आश्वासन दिले.या लेखी आश्वासनानंतर ठाणेदार अजय आखरे, शिवसेना नेते नरेंद्र पडोळे, प्रशांत ठाकरे, बाजार समितीचे संचालक नितीन आगे,माजी उपसभापती अमोल चिमोटे,पोपट घोडेराव, अनिल पवार, अजय उभाड, सुधीर रहाटे,अशोक जवंजाळ प्रितेश अवघड, द्वारकानाथ जवंजाळ, योगेश चव्हाण, दिलीप जवंजाळ कैलास आवारे, व्यापारी संकुलातील प्रकाश मुंदे, सुभाष पांडव, किरण पटेल, किशोर इंगळे, बाजार समितीचे सचिव मनोज ठाकरे तसेच पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत बंडू घोम यांनी आपले उपोषण मागे घेतल्याचे जाहीर केले. या निर्णयामुळे परिसरातील वाहतूक कोंडी सुटून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. व्यापाऱ्यांनी १ डिसेंबर पर्यंत अतिक्रमण स्वतःहून न काढल्यास बाजार समिती निर्णायक भूमीका घेईल असा निर्णय सभापती व संचालक मंडळाने घेतला.

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती तर्फे अमरावती मार्गावर असलेली व्यापार संकुलाच्या इमारतीचे बिल्डिंग ऑडिट केल्याचे माहिती समोर आली आहे .मात्र अचलपूर मार्गावरील असलेल्या बाजार समितीच्या व्यापार संकुलात लोखंडी पायऱ्या निर्मितीचा ठराव दोन वेळा संचालक मंडळांच्या सभेत मंजूर होऊन प्रत्यक्षात पायऱ्याची निर्मिती कधी होणार ? दुकानदार आणि ग्राहकांना पहिल्या मजल्यावर २० दुकानापूर्वी असलेली पायऱ्या वरून खरेदीसाठी जावे लागते आणि काही विद्युत संबंधित अनुचित प्रकार घडला तर दुकानदार आणि ग्राहकांनी बाहेर जावे तरी कसे ? यामुळे तत्काळ दोन्ही बाजूने लोखंडी पायऱ्याची निर्मिती तत्काळ करण्याची मागणी ग्राहकाकडून होत आहे.अन्यथा आता उपोषणाचा मार्ग स्वीकारण्याच्या तयारीत दुकानदार आणि ग्राहक आह.

ग्रामपंचायतींचा कारभार गतिमान व

संसाधनांचा योग्य वापर करून ग्रामपंचायतींचे आर्थिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला.

ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कामकाजात पारदर्शकता राखणे, नागरिकांना विविध शासकीय सेवा वेळेत उपलब्ध करून देणे तसेच डिजिटल प्रणालींचा प्रभावी वापर करून प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. अभियानाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींनी परस्पर समन्वय, योग्य नियोजन आणि लोकसहभागाच्या माध्यमातून सक्रियपणे काम करावे, असे आवाहन यावेळी उपस्थित मान्यवरांनी केले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून उपस्थितांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यशाळेची सांगता झाली.

शेतशिवारातील संत्रा चोरीचा छडा;

समांतर तपासाचे निर्देश दिले होते.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक या गुन्ह्याचा तपास करीत होते. दरम्यान, २६ नोव्हेंबर रोजी पथकाला गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत दर्यापूर ते भामकुली मार्गावर संशयितांचा पाठलाग केला. यावेळी अब्दुल गफुर अब्दुल कादर (रा. लालखडी) आणि सलीम शाह अयुब शाह (रा. बिस्मिल्ला नगर) यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. पोलिसी चौकशीदरम्यान अब्दुल गफुर अब्दुल कादर याने रामापूर शेतशिवारातून संत्र्यांची चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुन्ह्यात वापरण्यात आलेले टाटा कंपनीचे झेनॉन मालवाहू वाहन (किंमत पाच लाख रुपये) आणि २७ हजार ४०० रुपयांची रोकड जप्त केली. या कारवाईमुळे संत्रा चोरीच्या गुन्ह्याच्या तपासाला महत्त्वपूर्ण दिशा मिळाली आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक दत्तात्रय तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे, पोलीस अंमलदार मंगेश लकडे, सचिन मसांगे, हर्षल काळे आणि चालक राहुल यांच्या पथकाने ही कारवाई केली.

नेहरू मैदान परिसरात चाकू घेऊन

हातात चाकू असून तो परिसरातील नागरिकांमध्ये दहशत पसरवत गोंधळ घालत फिरत आहे. या माहितीची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. दिलेल्या वर्णानानुसार संशयित इसमाला पोलीस पथकाने ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव मुकेश मापारी असल्याचे सांगितले. पोलिसांनी दोन पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे धारदार चाकू आढळून आला. लाकडी मुठ असलेल्या या चाकूच्या लोखंडी पात्याची लांबी नऊ इंच, तर रुंदी दोन इंच आहे. मुठीसह चाकूची एकूण लांबी साडेतेरा इंच असून, त्याची अंदाजे किंमत ५० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. दरम्यान, पोलीस आयुक्तांनी महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनेचे तसेच कलम ३७ (३) अन्वये लागू असलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी मुकेश मापारी याच्याविरुद्ध सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ५१५/२०२६ अन्वये कलम ४, २५ आर्म ॲक्ट आणि सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रमांक २ शाम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त राजापेठ विभाग संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन सिरसाट व पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक तुषार गावंडे, रंगराव जाधव, पोलीस हेडकॉन्स्टेबल दिनेश भिसे, मंगेश भेलाये, संजय वानखडे यांच्यासह अन्य पोलीस अंमलदारांचा सहभाग होता.

यशदाच्या परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांची

प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सहायक राज्यकर आयुक्त प्रदीप जवंजाळ यांनी सर्व परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांना भावी प्रशासकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देत आभार मानले. या दौऱ्यामुळे प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजाचा मौल्यवान अनुभव मिळाल्याचे मत प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

गोवंशाची कत्तल करून मांसविक्री;

करण्यात आली आहे.अमरावती ग्रामीण जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक, कत्तलीच्या उद्देशाने होणारी हालचाल आणि जनावरांवरील निर्दयतेचे प्रकार रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष कारवाईचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना कुरेशीपुरा परिसरात गोवंशाची कत्तल करून मांसविक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीची दखल घेत पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. तेथे गोवंशाचे मांस आणि कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे ६५ किलो मांसासह एकूण २२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच मोहम्मद अशपाक शेख अहमद याला ताब्यात घेऊन अटक केली. याप्रकरणी अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमाच्या कलम ५, ५ (ब), ९ आणि ९ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक दत्तात्रय तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे, पोलीस अंमलदार मंगेश लकडे, सचिन मसांगे, हर्षल काळे आणि चालक राहुल यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली. गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक, कत्तल आणि जनावरांवरील क्रूरतेच्या प्रकारांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा अमरावती ग्रामीण पोलिसांनी दिला आहे.

अल्पवयीन मुलीस पळवून नेणारा

अपराध क्रमांक ५२६/२०२६ कलम १३७(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस आरोपी आकाश नंदकिशोर पचारे, (वय २६, ता. चांदूरबाजार) याने पळवून नेले होते. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता.सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन चांदूरबाजार पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी तपासाची चक्रे वेगाने फिरविली. तांत्रिक माहिती व गोपनीय सूत्रांच्या आधारे आरोपीचा शोध घेतला असता तो ग्राम चंदू खेडी, जिल्हा भोपाल, मध्य प्रदेश येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांचे पथक मध्य प्रदेश येथे रवाना करण्यात आले. पथकाने कौशल्यपूर्ण तपास व शोधमोहीम राबवून आरोपीस ताब्यात घेत अटक केली. तसेच अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका करण्यात आली.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रभारी ठाणेदार पोलीस स्टेशन चांदूरबाजार सहायक पोलीस निरीक्षक पंकज कांबळे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.या कारवाईमध्ये रवींद्र बावणे, नरेंद्र मुळतकर, आशिष राऊत, जितेश सावरकर, वैभव आकोटकर, सुहास पोटे व दत्ता राजेकर यांनी सक्रिय सहभाग घेतला.

आदिवासी विकास मंत्र्यांच्या

तक्रारी ग्रामस्थांनी मांडल्या. पीकविमा मिळण्यात येणाऱ्या अडचणी आणि नुकसानभरपाईतील विलंबामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत असल्याचे सांगण्यात आले. दुसरीकडे, उच्च शिक्षण घेऊनही रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नसल्याने ग्रामीण युवकांसमोर भविष्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी आणि विद्यार्थ्यांच्या अडचणीचाही यावेळी पाढा वाचण्यात आला.शिक्षणासंदर्भातील तक्रारी समोर येताच अभिजीत दीपके यांनी थेट शिक्षणाधिकाऱ्यांना मोबाईलवर संपर्क साधून ग्रामस्थांच्या समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. मात्र, फोनवरून समस्या मांडणे आणि प्रत्यक्षात त्यांचे निराकरण होणे यात मोठे अंतर आहे. त्यामुळे संबंधित विभागांकडून केवळ आश्वासन न देता ठोस कार्यवाही होणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.एकीकडे विकासाच्या घोषणा होत असताना दुसरीकडे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, युवकांना रोजगार आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे धोत्रा येथील चौपालमधून समोर आले. आता या चौपालमध्ये मांडलेल्या प्रश्नांची दखल प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कितपत घेतात, की नागरिकांच्या तक्रारी पुन्हा कागदावरच राहतात, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

दर्यापूर नगर परिषदेत रुग्णवाहिकेची

एका व्यक्तीचा किंवा राजकीय पक्षाचा विषय नसून तो संपूर्ण शहराच्या आरोग्याशी निगडित महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे या कामात कोणीही राजकारण करू नये किंवा श्रेयवादाची लढाई लढू नये. नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत सर्वांनी एकत्र येऊन समाजहितासाठी सहकार्य करावे.शहरातील गरजू रुग्णांना वेळेवर आरोग्य सुविधा मिळाव्यात, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिकेचा आधार मिळावा आणि नगर परिषदेच्या माध्यमातून आरोग्य सेवा अधिक सक्षम व्हावी, हाच या प्रयत्नांमागील मुख्य उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सफाई कर्मचाऱ्यांच्या आवास,

जिल्हास्तरावर अधिकृत अधिकारी नेमावा. त्यांच्याकडून या कर्मचाऱ्यांना निवासाची सुविधा उभारण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी. त्यासोबतच सफाई कर्मचारी जोखीमीचे काम करीत असल्याने त्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. यासाठी निश्चित कालावधीनंतर संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात यावी. आरोग्याच्या सुविधा मिळण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांचे आयुष्मान कार्ड काढण्याची प्रक्रिया करण्यात यावी. यामुळे त्यांना कॅशलेस सुविधा मिळण्यास मदत होईल. तसेच कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना चांगले शिक्षण मिळावे, यासाठी प्रयत्न करण्यात यावे.

यासोबतच कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षेचाही लाभ देण्यात यावा. प्रामुख्याने वेतन जमा होणाऱ्या बँका वेतन खात्यावर विविध सुविधा देतात. त्यामुळे या सुविधांचा लाभ घेण्यात यावा. सफाई कर्मचाऱ्यांनाही सुट्टीचा अधिकार असून इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांनाही सुट्टया द्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी शिबीरे आयोजित करण्यात यावी, अशा सूचनाही डागोर यांनी दिल्या.

ग्रामसखीनेच केली महिला

गट जुनी भारवाडी या गटाची सदस्य असलेली महिला (गैरअर्जदार) आरती, वय ३२ वर्षे, रा. जुनी भारवाडी ही लहानुजी ग्रामसंघाची ग्रामसखी (CRP) म्हणून सुद्धा कार्यरत आहे.सदर महिलेने दिनांक ०१/०१/२०२४ ते २८ /०९/२०२६ या दरम्यान दुर्गा महिला स्वयंसहायता बचत गटाच्या महिलांचे मासिक कर्ज परत फेडीचे ५ मासिक कर्जाची एकूण २, २०,००० रुपये रक्कम ही बचत गटाच्या बचत खात्यात जमा करून बचत गटाचा चेक स्वतःच्या नावाने लिहून रोख स्वरूपात काढून घेतली. तसेच शासनातर्फे ग्रामसंघाला देण्यात येणारा समुदाय गुंतवणूक निधी हा पाच बचत गटांना वितरित करणे अपेक्षित असताना स्वतः सदस्य असलेल्या दुर्गा महिला स्वयंसहायता बचत गटाचे खात्यावर वळता करून बचत गटाचा चेक स्वतःच्या नावाने लिहून रोख स्वरूपात काढून घेतला. ग्राम संघाचा निधी ५ महिला बचत गटांना वितरित करण्यात आला आहे असा खोटा ठराव पंचायत समिती येथे सादर केला. बचत गटाचा चेक बुक मधील कोऱ्या चेकवर बचत गटाच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन सदरचे चेक स्वतःच्या नावाने लिहून चेक द्वारे रोख रक्कम काढून घेतली. गैरअर्जदार आरोपी महिलेने लहानुजी ग्राम संघाच्या ग्रामसखी या जबाबदार पदावर कार्यरत असताना दुर्गा महिला बचत समूहातील सभासदांचा विश्वासाचा गैरफायदा घेऊन बनावट स्वाक्षऱ्या व ठरावाच्या आधारे शासनाची व दुर्गा महिला बचत समूहातील सभासद महिलांची ५ लाख ८५ हजार रुपये रकमेचा अपहार करून फसवणूक केलेली आहे. अशा तक्रार अर्जाची चौकशी वरून अर्ज चौकशी अंती आर्थिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण यांची विविध परवानगी घेऊन तिवसा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ शनिवार, २८ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

टंचाईशी संबंधित कामे १५ डिसेंबरपूर्वी पूर्ण करा - पालकमंत्री

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत चर्चा ; जलसंधारण कामांना प्राधान्य

■ प्रतिनिधी | वाशिम ■



पेयजलाची उपलब्धता हे शासनाचे प्राधान्य असून, त्यादृष्टीने नियोजन व्हावे. जिल्ह्यात सर्वत्र जलसंधारण कामे व्यापकपणे राबवावीत. टंचाईशी संबंधित कामे गुणवत्तापूर्ण व १५ डिसेंबरपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश राज्याचे कृषी मंत्री तथा पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज येथे दिले. जिल्हा नियोजन समितीची बैठक, तसेच दुष्काळ निवारण सभा पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेत नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार संजय देशमुख, आमदार श्याम खोडे, आमदार भावना गवळी, आमदार सईताई डहाके, आमदार अमित झनक, आमदार किरण सरनाईक, आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, पोलीस अधिक्षक निकेश खाटमोडे पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी कुंटला आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. भरणे म्हणाले की, हे दुष्काळाचे वर्ष असल्याने पेयजलाचे स्त्रोत वाचवणे व सर्वत्र पाण्याची उपलब्धता ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे परिपूर्ण नियोजन करावे. लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन कामांना गती द्यावी. व्हीबी जी राम जी योजनेतून भरीव रोजगारनिर्मिती व्हावी. सार्वजनिक कामांवर भर द्यावा. शेतकरी बांधवांना पीक कर्ज उपलब्धता. विविध योजनांतून आवश्यक मदत वेळेत करावी. पीक विमा कंपनीबाबत तक्रारी आहेत. त्यांचे निराकरण करून शेतकरी बांधवांना भरपाई द्यावी. जलाशयांतून अनधिकृत उपसा रोखण्यासाठी पथकांनी सजगता बाळगावी. अवैध उपसा सिंचनाबाबत जारी आदेशांचे काटेकोर पालन व्हावे, असे निर्देश त्यांनी दिले. शहराची व गावाची गरज लक्षात घेऊन विहीर अधिग्रहण करावे. विहीर अधिग्रहणाचा यापूर्वी प्रलंबित निधी असल्यास तो अदा करण्याची कार्यवाही व्हावी. जलसंधारणाचे कृती आराखडे शासन स्तरावर पाठवावेत. पेनटाकळी प्रकल्पाच्या पाणीवाटपाबाबत लोकप्रतिनिधींची सूचना लक्षात घेऊन पालकमंत्र्यांनी तत्काळ जलसंपदा मंत्र्यांसमवेत भ्रमणध्वनीवरून चर्चा केली व याबाबत तोडगा काढण्याची विनंती केली. या संदर्भात शासन स्तरावर लवकरच बैठक होणार आहे.

वाशिम आकांक्षित जिल्हा आहे. अधिकाधिक जलसंधारण कामे राबविण्यासाठी शासन स्तरावर, तसेच नीती आयोगाकडेही प्रस्ताव द्यावेत. सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या माध्यमातूनही कामांना चालना द्यावी.जिल्ह्यातील पशुधनाची आवश्यकता लक्षात घेऊन चारासाठा उपलब्धता ठेवावी, असेही निर्देश यावेळी देण्यात आले. सर्वसाधारण योजनेत ३४१ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेत ७६ कोटी व आदिवासी उपयोजनेत १५ कोटी ८ लक्ष रू. मंजूर नियतव्यय आहे. सर्वसाधारण योजनेत १९० कोटी ६४ लक्ष रू., अनुसूचित जाती उपयोजनेत २२ कोटी १८ लक्ष रू. व आदिवासी उपयोजनेत ७ कोटी ५१ लक्ष रू. आदी प्रशासकीय मान्यता झाल्या असून, इतरही मान्यतांची कार्यवाही सुरू आहे. तांत्रिक व प्रशासकीय मान्यता तत्काळ पूर्ण करण्याचे जिल्ह्यातील नगरपरिषद अध्यक्ष, समिती सदस्यांनी मांडलेल्या अडचणी लक्षात घेऊन त्यांचे तत्काळ निराकरण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. उपलब्ध पाणीस्त्रोत, प्रत्यक्ष पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची सद्यस्थिती, अपूर्ण योजना, सुरू असलेली कामे आवश्यक अतिरिक्त निधी, नवीन कामे आदींचा आढावा घेण्यात आला. सुरुवातीला संविधानदिनानिमित्त सभागृहात शपथ घेण्यात आली. त्याचप्रमाणे, २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

भाजपच्या वतीने २६/११ वीर शहीदांना अभिवादन ; संविधान दिन साजरा

■ प्रतिनिधी | वाशिम ■



राष्ट्रभक्तीचा जागर आणि संविधानिक मूल्यांचा गौरव अशा दुहेरी भावनेतून भारतीय जनता पार्टी, वाशिम शहराच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी मुंबईवरील २६/११ च्या भीषण दहशतवादी हल्ल्यात हौतात्म्य पत्करलेल्या वीर जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्याचबरोबर भारतीय संविधान दिनानिमित्त संविधानाच्या लोकशाही मूल्यांचे स्मरण करून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मनीष मंत्री भाजपा शहराध्यक्ष यांच्या जनसेवा कार्यालय, मंत्री पार्क येथे आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमात मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात देशाच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीरांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष अनिल केंदळे, नगरसेविका सौ जयश्री कपिल सारडा, सौ. जयश्री संतोष वानखेडे, नगरसेवक नितेश राठी, गणेश खंडाळकर, सुनिल तापडिया, बंटी सेठी, नितीन उचितकर, संतोष वानखेडे, उमेश मोहोळे, राहुल वसमतकर, राजू कालवार, योगेश लोणसुने, अमोल जाधव, माधुरी वानखेडे, ज्योती इंगोले, अशा भांदुर्गे, शुभांगी साखरकर, भावना सरनाईक, गिरीश शर्मा तसेच भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते. यानंतर नालंदा नगर येथील त्रिरत्न बुद्ध विहारात संविधान दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी वाशिम-मंगरूळनाथ मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे, शहराध्यक्ष मनीष मंत्री नगरसेवक अनिल ताजने, नगरसेवक गणेश खंडाळकर, डॉ जयश्री गुट्टे, संगीता इंगोले, वनमाला ढगे, सुनील तापडिया आणि परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या सामूहिक वाचनाने करण्यात आली.

त्यानंतर तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस वंदन करून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संविधानाने देशाला प्रदान केलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूलभूत तत्त्वांचा जागर यावेळी करण्यात आला.

वेदांत पब्लिक स्कूलमध्ये संविधान दिन साजरा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

येथील वेदांत पब्लिक स्कूलमध्ये गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि उत्स्फूर्त वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.

यानिमित्त आयोजित प्रार्थना सभेत विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचे महत्त्व, संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार, लोकशाहीची मूल्ये, समानता, स्वातंत्र्य, बंधुता तसेच प्रत्येक नागरिकाची कर्तव्ये याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. संविधान हे केवळ देशाचा कायदा नसून प्रत्येक भारतीयाला न्याय, स्वातंत्र्य आणि समानतेचा अधिकार देणारा लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ आहे, याची विद्यार्थ्यांना जाणीव करून देण्यात आली.

संविधानातील मूल्यांचा अंगीकार करून जबाबदार, जागरूक आणि कर्तव्यदक्ष नागरिक बनण्याचा संदेश यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आला.

संविधानाची जपणूक हीच खरी देशभक्ती!

■ प्रतिनिधी | वाशिम ■



भारतीय संविधानाची जपणूक व त्यातील मूल्यांचे संवर्धन करणे हीच खरी देशभक्ती आहे, असा संदेश देत वाशिम येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात २६ नोव्हेंबर रोजी ७७वा संविधान गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्रिदीप आजी-माजी सैनिक बहुउद्देशीय संघटनेच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात आजी-माजी सैनिक, समता सैनिक दलाचे जवान, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सकाळी ८.३० वाजता पूज्य भंते प्रज्ञापाल महाथेरो यांच्या हस्ते संविधान ग्रंथाचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आयु. दिलीप गवई यांच्या नेतृत्वाखाली उपस्थितांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून संविधानाचे रक्षण व जतन करण्याची शपथ घेतली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे आजी-माजी सैनिक आणि समता सैनिक दलाच्या जवानांनी बिगुलच्या सुरांत दिलेली शिस्तबद्ध सैनिक सलामी व संचलन. या वेळी उपस्थितांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना दिली. चौकातील संविधानाच्या प्रास्ताविकेचा भव्य फलक आणि उंच तिरंगी ध्वजांनी कार्यक्रमाला विशेष शोभा आणली.

संविधान तज्ज्ञ ॲड. पी. पी. अंभोरे यांनी संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत मूल्ये आणि नागरिकांची कर्तव्ये याविषयी मार्गदर्शन केले. आयु. अभिमान लगड आणि आयु. दशरथ खडसे यांनी संविधानावर आधारित गीते सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ?ड. पी. पी. अंभोरे आणि आयु. दीपक ढोले यांनी केले.

या सोहळ्याला जिल्हा सैनिक कार्यालयाचे प्रतिनिधी कॅप्टन संजय येलमकर, जिल्हा बार कौन्सिलचे वकील, रेखाताई कन्या शाळा व नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी, संघमित्रा धम्मसेवा महिला मंडळाच्या अध्यक्षा प्रतिभाताई सोनोने, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, समता सैनिक दलाचे अधिकारी व जवान तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि आंबेडकरी विचारवंत उपस्थित होते.

प्रा. मुकुंद वानखडे, मेजर जनरल अश्विन खिल्लारे, गोपाळराव आटोटे, रामप्रभू सोनोने, डॉ. मंजुश्री जांभरुणकर, ज्योतीताई इंगळे, कवी अनिल कांबळे, ?ड. मोहन गवई यांच्यासह अनेक नागरिकांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संघटनेचे अध्यक्ष सुभेदार दीपक ढोले, कार्याध्यक्ष सुभेदार वैजनाथ बनसोड, संघटक सुभेदार शिवदास वानखडे, सचिव काशिनाथ भिसे, सहसचिव प्रदीप वाकोडे, कोषाध्यक्ष गजानन वैद्य तसेच संघटनेचे विश्वस्त व सदस्यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. अध्यक्ष सुभेदार दीपक ढोले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

अन्यायाविरुद्ध लढण्याची भारतीय संविधानात मोठी ताकद -तेजराव वानखेडे

■ प्रतिनिधी | वाशिम ■



महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे भारतातील प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचा घटनात्मक अधिकार प्राप्त झाला आहे . मतदानाचा अत्यंत महत्त्वाचा अधिकार आपल्याला संविधानाने दिलेला आहे. भारतीय संविधान हे आपल्या लोकशाहीचा पाया आणि देशाचा आत्मा आहे . संविधान प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करणारी ढाल, प्रत्येक आवाजाची ताकद व न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुतेचे रक्षक आहे.संविधान अन्याय विरुद्ध लढण्याचे सर्वात मोठे शस्त्र आहे .त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत संविधानाचे रक्षण करणे हे सर्व नागरिकांचे कर्तव्य आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे आठवले जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांनी दिनांक २६. नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त रिपाइं च्या वतीने आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले. याप्रसंगी रिपब्लिकन युवा जिल्हाध्यक्ष गजानन वानखेडे तालुका उपाध्यक्ष संतोष वानखेडे, तालुका सचिव सचिन गुडदे, सर्कल प्रमुख सचिन भालेराव ,दिलीप कांबळे, महेंद्र जाधव,तालुका अध्यक्ष प्रकाश गवई ,हिरामण साबळे, रामदास भगत, रवींद्र भगत ,सदानंद गवई ,सदाशिव गवई यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित आभार संतोष वानखेडे यांनी मानले.

स्वखर्चातून बुद्ध विहार उभारणीचा वानखेडे दाम्पत्याचा स्तुत्य संकल्प!



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील कळंबेश्वर येथे बौद्ध धम्माच्या प्रसारासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने भव्य बुद्ध विहाराचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे, हे बुद्ध विहार स्वतःच्या खर्चातून उभारून देण्याचा संकल्प डॉ. मधुसूदन वानखेडे आणि त्यांच्या धम्मपत्नी प्रमिला मधुसूदन वानखेडे यांनी केला आहे. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कळंबेश्वरसह संपूर्ण मालेगाव तालुक्यातून कौतुक होत आहे. बुद्ध विहाराच्या बांधकामाला वेगाने सुरुवात झाली असून, बांधकाम कंत्राटदार बाळासाहेब ढाले यांच्या मार्गदर्शनाखाली अवघ्या तीन दिवसांत विहाराचे १६ कॉलम उभारण्यात आले आहेत. या कामात गावातील बुद्ध उपासक आणि उपासिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी सर्व उपासक-उपासिकांनी एकत्रित येत त्रिशरण व पंचशील ग्रहण करून तथागत गौतम बुद्धांना वंदना अर्पण केली. तसेच प्रत्येकाने दोन-दोन टोपल्या काँक्रीट कॉलममध्ये टाकून श्रमदानातून या कार्यात आपला सहभाग दिला. या उपक्रमामुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, गावकरी मंडळीनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून बांधकामाला सहकार्य केले. बुद्ध विहार हे केवळ धार्मिक स्थळ नसून ते सामाजिक एकोपा, समता, बंधुता आणि धम्मविचारांचे प्रेरणाकेंद्र ठरणार आहे. स्वतःच्या खर्चातून बुद्ध विहार उभारण्याचा संकल्प करून तो प्रत्यक्षात साकारण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या डॉ. मधुसूदन वानखेडे व प्रमिला मधुसूदन वानखेडे या दाम्पत्यासह बांधकामाची जबाबदारी पार पाडणारे बांधकाम कंत्राटदार बाळासाहेब ढाले यांचे नागरिकांकडून विशेष कौतुक होत आहे.

संविधान दिनानिमित्त जनजागृती रॅली



■ प्रतिनिधी | कारंजा ■

संविधान दिनानिमित्त गोविंद इंग्लिश स्कूलच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत संविधानाचे महत्त्व, मूलभूत अधिकार व कर्तव्ये तसेच न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला. विद्यार्थ्यांच्या हातात संविधानाची उद्देशिका व जनजागृतीपर फलक होते.

यावेळी शाळेच्या परिसरात संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व आणि जबाबदार नागरिक म्हणून आपली कर्तव्ये याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला शाळेचे संचालक, मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद उपस्थित होते. संविधानातील मूल्ये आचरणात आणण्याचा संदेश देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

तक्षशिला आयुर्वेद महाविद्यालयामध्ये संविधान दिन उत्साहात

■ प्रतिनिधी | कारंजा ■



श्री.दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट,अमरावती द्वारा संचालित तक्षशिला आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, खेडी येथे गुरुवार दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आयुर्वेदाचे आद्यदैवत भगवान धन्वंतरी तसेच संस्थेचे प्रेरणास्थान श्री.दादासाहेब गवई यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर व्यासपीठावर भारतीय संविधानाची प्रत सन्मानपूर्वक ठेवून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संविधानाच्या प्रतीचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी संविधानाप्रती आदर व निष्ठा व्यक्त करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवर,प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.संविधानाच्या उद्देशिकेतील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रदीप पांडव यांनी आपल्या मनोगतातून भारतीय संविधानाचे महत्त्व विशद केले. भारतीय संविधान हे आपल्या देशाचा सर्वोच्च कायदा असून प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य व न्याय प्रदान करते, असे त्यांनी सांगितले. संविधानाने दिलेले अधिकार जाणून घेण्याबरोबरच प्रत्येक नागरिकाने आपल्या कर्तव्यांचेही प्रामाणिकपणे पालन करावे. विद्यार्थ्यांनी संविधानातील मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणून एक आदर्श नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे स्मरण करून संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्याभारती शाळेत संविधान दिन साजरा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील विद्याभारती शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला. तसेच शौर्य दिनानिमित्त या दिवशीच्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नितेश मिटकरी तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे संचालक सुमित मिटकरी तसेच पर्यवेक्षक विजय गोटे कांचन कापसे तसेच माधुरी मिटकरी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस तसेच संविधान उद्देशिकेस पुष्पहार अर्पण करून व संविधान वाचन करून करण्यात आली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या रक्ताची शाई करून दिवसराञ एक करून भारतातील प्रत्येक नागरीकाचा विचार करून संविधान लिहिले आहे. संविधान लिहून पूर्ण करण्यासाठी २ वर्ष २२ महिने १८ दिवस इतका कालावधी लागला. त्यांनी हे संविधान राष्ट्राला अर्पण केले. २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी स्विकार करण्यात आले. म्हणून २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. संविधान म्हणजे आपली आचार संहिता आहे.

तांडा विकासासाठी स्वतंत्र प्राधिकरणासह '१३ सवलतीं'चा मुद्दा ऐरणीवर

■ प्रतिनिधी | मानोरा ■



संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसह बंजारा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात मुंबई येथील मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक २६ नोव्हेंबर ला पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत धर्मगुरू तथा आमदार बाबुसिंग महाराज यांनी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि घटनात्मक हक्कांचा लेखाजोखा मांडला. यावेळी तांडा विकासासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करणे आणि तीन वर्षांचा कालबद्ध आराखडा तयार करण्याबाबत महसूलमंत्र्यांनी प्रशासनाला सकारात्मक निर्देश दिले.

बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एऊ) प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी प्रदीर्घ काळापासून प्रलंबित आहे. यावर घटनात्मक आणि कायदेशीर प्रक्रिया गतीने पूर्ण करावी, अशी भूमिका आ. बाबुसिंग महाराज यांनी मांडली. तसेच, या आरक्षणावर अंतिम निर्णय होईपर्यंत समाजातील विद्यार्थी, युवक आणि दुर्बल घटकांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान टाळण्यासाठी धनगर समाजाच्या धर्तीवर १३ समतुल्य सवलती लागू कराव्यात व त्यासाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

वन आणि महसूल विभागाच्या जमिनीवर पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असलेल्या तांडावासीयांचे सर्वेक्षण करून त्यांना कायदेशीर संरक्षण व मूलभूत सुविधा देण्यासाठी स्वतंत्र धोरण आखण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. त्याचबरोबर, जनगणनेनंतर ७०० लोकसंख्येचा निकष पूर्ण करणाऱ्या तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत आणि पात्र तांड्यांना महसुली गावाचा दर्जा देण्याची प्रक्रिया कालमर्यादेत पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रलंबित शिष्यवृत्तींचा निपटारा, वसतिगृह सुविधा, तसेच गोर बंजारा साहित्य अकादमीचे कामकाज गतिमान करून बोलीभाषा व संस्कृतीच्या जतनासाठी स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यावरही चर्चा झाली.

?प्रशासनाला महत्त्वाचे निर्देश

बैठकीतील मुद्द्यांची दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ग्रामविकास विभागामार्फत स्वतंत्र 'तांडा वस्ती विकास प्राधिकरण' स्थापन करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक तांड्याचा ग्रामसभेच्या मान्यतेने तीन वर्षांचा विकास आराखडा तयार करणे, पात्र तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत व महसुली गावाचा दर्जा देण्याची प्रक्रिया वेगवान करणे आणि पोहरादेवी व उमरीगड तीर्थक्षेत्राच्या विकासावर देखरेख ठेवण्यासाठी समिती नेमून देवस्थान व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कायद्याचा मसुदा तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १५ ■ अंक ३ ■ शनिवार, २८ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

सावकारीचा काळा धंदा की जमिनींचा मोठा खेळ, वंजारीच्या घरातून सातबारांचा खजिना

४० सातबारा, १० विक्रीपत्रे अन् ५० ग्रॅम सोन्याचा हार जप्त; १४० प्रकारच्या कागदपत्रे व वस्तू ताब्यात, अवैध सावकारीच्या जाळ्याने जिल्ह्यात खळबळ



वर्धा जनमाध्यम : वरकरणी सामान्य माणसासारखे दिसणारे वंजारी कुटुंब अवैध सावकारीच्या संशयित व्यवहारांमुळे आता चौकशीच्या फेऱ्यात आले आहे. सावकारीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जमिनींचे व्यवहार झाले का? कर्जाच्या बदल्यात जमिनी ताब्यात घेण्याचा खेळ सुरू होता का? असे अनेक गंभीर प्रश्न या कारवाईनंतर उपस्थित झाले आहेत. रामनगर पोलिस ठाण्याच्या शेजारी राहणाऱ्या वामन वंजारी व त्यांचा मुलगा राकेश यांच्या निवासस्थानी उपनिबंधक कार्यालयाच्या पथकाने गुरुवारी छापा टाकला. या कारवाईत तब्बल १४० प्रकारची कागदपत्रे व वस्तू जप्त करण्यात आल्या. त्यामध्ये सुमारे ४० सातबारा उतारे, १० विक्रीपत्रे आणि ५० ग्रॅम वजनाचा सोन्याचा हार आढळल्याची माहिती खात्रीदायक सूत्रांनी दिली. या कागदपत्रांच्या गठ्ठ्याने अवैध सावकारीच्या व्यवहारांचे धागेदोरे किती खोलवर गेले आहेत, याबाबतची उत्सुकता वाढली आहे.

जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अवैध सावकारीबाबत प्राप्त तक्रारीनंतर उपनिबंधक कार्यालयाच्या पथकाने संबंधितांच्या आर्थिक व्यवहारांची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली होती. चौकशीदरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्याचे सांगितले जाते. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या परिसरालगत वामन वंजारी यांची सुमारे २८ एकर शेती असून, त्याठिकाणी विटभट्टीचा व्यवसायही आहे. त्यांचा मुलगा राकेश याच्याकडे काही वाहने असून ती भाड्याने दिली जातात.

विशेष म्हणजे, आतापर्यंतच्या चौकशीत वंजारी यांनी पवनार, वाईतपूर आणि सुकळी परिसरातील सुमारे आठ व्यक्तींची शेती खरेदी केल्याची बाब पुढे आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. सुमारे ७० लाख रुपयांच्या शेतजमिनींचा व्यवहार झाल्याचीही चर्चा आहे. याशिवाय सहा लाख रुपयांची मुदत ठेव केल्याची माहिती समोर आली आहे. आता जप्त करण्यात आलेल्या ४० सातबारा उताऱ्यांमधून आणि १० विक्रीपत्रांमधून नेमके कोणते व्यवहार उघड होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जप्त केलेल्या कागदपत्रांची सखोल तपासणी सुरू असून, त्यातील जमिनींचे व्यवहार, संबंधित व्यक्ती आणि आर्थिक देवाणघेवाणीचे धागेदोरे तपासले जात आहेत. सामान्य शेतकऱ्यांच्या जमिनींचे व्यवहार आणि कोट्यवधींच्या मालमत्तेचा संशय यामुळे या प्रकरणाला आता गंभीर वळण मिळाले आहे. उपनिबंधक कार्यालयाच्या पुढील तपासातून सावकारीच्या या कथित साम्राज्याचे आणखी कोणते चेहरे समोर येतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

जावयाला १० ते १२ लाखांची कार भेट

प्रथमदर्शनी सामान्य दिसणाऱ्या वामन वंजारी यांची वर्धा शहर आणि परिसरात सुमारे तीन ठिकाणी घरे असल्याची माहिती चौकशीत पुढे आल्याचे सांगितले जाते. एवढेच नव्हे तर काही दिवसांपूर्वी त्यांनी आपल्या जावयाला सुमारे १० ते १२ लाख रुपये किमतीची महागडी कार भेट दिल्याची बाबही उपनिबंधक कार्यालयाच्या चौकशीत समोर आल्याचे सूत्रांनी सांगितले. या मालमत्ता आणि आर्थिक व्यवहारांचा अवैध सावकारी प्रकरणाशी काही संबंध आहे का, याची तपासणी होण्याची शक्यता आहे.

आधी माहिती गोळा केली, मग थेट छापा

वंजारी यांच्याविरुद्ध सुरुवातीला सेलू पोलिस ठाण्यात तक्रार प्राप्त झाली होती. मात्र अवैध सावकारीविरोधात थेट कारवाई करण्याचे अधिकार पोलिसांकडे नसल्याने हे प्रकरण सहाय्यक निबंधक कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले.

त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी गोपनीय माहिती संकलित केली. आवश्यक माहितीची पडताळणी केल्यानंतर 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेत गुरुवारी थेट वंजारी यांच्या निवासस्थानी छापा टाकण्यात आला. नियोजनबद्ध पद्धतीने केलेल्या या कारवाईत १४० प्रकारची कागदपत्रे व वस्तू जप्त करण्यात आल्याने अवैध सावकारीच्या प्रकरणाने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

बोरच्या जंगल सफारीची भुरळ सातासमुद्रापार

फ्रान्सच्या पर्यटकांसह आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू शार्दूल ठाकूर यांचीही कोअर सफारीला पसंती



वर्धा जनमाध्यम : घनदाट जंगल, समृद्ध जैवविविधता आणि मुक्तपणे संचार करणारे वन्यजीव यामुळे बोर व्याघ्र प्रकल्पाची जंगल सफारी पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. आता बोरच्या कोअर जंगल सफारीची भुरळ सातासमुद्रापार पोहोचली असून, परदेशी पर्यटकांसह नामांकित क्रिकेटपटूही या निसर्गानुभवासाठी बोरकडे वळू लागले आहेत. शुक्रवारी फ्रान्स येथील हेलेइस मॅगॅले निकोल यांनी कोअर जंगल सफारीचा आनंद घेतला, तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू शार्दूल ठाकूर यांनीही आज बोर व्याघ्र प्रकल्पाला भेट देत सफारीचा अनुभव घेतला.

बोरच्या निसर्गरम्य वनसंपदेतून भ्रमंती करताना वन्यजीवांचे दर्शन, पक्ष्यांचा किलबिलाट आणि घनदाट जंगलाचे मनमोहक दृश्य पर्यटकांना आकर्षित करीत आहे. त्यामुळे बोरची ओळख आता वेगळा स्थानिक पर्यटनापुरती मर्यादित न राहता आंतरराष्ट्रीय पर्यटनाच्या नकाशावर विस्तारत असल्याचे चित्र आहे.

क्रिकेटपटू शार्दूल ठाकूर यांची वनाधिकाऱ्यांशी चर्चा

भारतीय क्रिकेटपटू शार्दूल ठाकूर यांनी बोर व्याघ्र प्रकल्पाला भेट देऊन कोअर जंगल सफारीचा आनंद घेतला. यावेळी त्यांनी प्रकल्पाचे उपसंचालक मंगेश ठेंगडी यांच्याशी संवाद साधला. वनसंवर्धन आणि वन्यजीव व्यवस्थापनाची माहितीही जाणून घेतली. यावेळी सहाय्यक वनसंरक्षक (कोअर) आशिष देशमुख, सहाय्यक वनसंरक्षक (बफर) दत्तात्रय लोंढे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन बोरकर उपस्थित होते.

पुणे, मुंबई, साताऱ्यातूनही पर्यटकांची गर्दी

बोरच्या जंगल सफारीसाठी पुणे, मुंबई आणि सातारा येथूनही पर्यटक मोठ्या संख्येने येत आहेत. देशी पर्यटकांसोबत परदेशी पर्यटकांचा वाढता प्रतिसाद बोरच्या पर्यटन क्षमतेवर शिक्कामोर्तब करणारा ठरत आहे. वन्यजीव संवर्धन आणि निसर्ग पर्यटनाची सांगड घालणाऱ्या बोर व्याघ्र प्रकल्पाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे.

विकासाच्या नावाखाली वडगावकरांची पाण्यासाठी वणवण

पाइपलाइन फोडून कंपनी मोकळी; १० दिवस पाणीपुरवठा ठप्प, संतप्त ग्रामस्थांचा रास्ता रोको



सेलू जनमाध्यम : रस्त्याचा विकास सुरू असताना गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याचीच सोय उद्ध्वस्त झाली आहे. वडगाव कला ते झडशी रस्त्याच्या कामादरम्यान कंत्राटदार कंपनीने गावाची पाणीपुरवठा करणारी पाइपलाइन फोडली. मात्र, तब्बल ८ ते १० दिवस उलटूनही पाइपलाइन दुरुस्त न झाल्याने वडगाव कला येथील ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. वारंवार दुर्लक्ष होत असल्याने संतप्त ग्रामस्थांनी अखेर रस्त्यावर उतरून रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे रस्त्याचे काम बंद पाडण्यात आले.

रस्त्याचे काम करताना गावाची जलवाहिनी फुटल्याने संपूर्ण पाणीपुरवठा विस्कळीत झाला. मात्र, पाइपलाइन तातडीने दुरुस्त करून देण्याऐवजी संबंधित कंपनीकडून टाळाटाळ होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. आठ ते दहा दिवसांपासून नळाला पाणी नसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दुसरीकडे धाव घ्यावी लागत आहे.

पाण्यासाठी दैनंदिन व्यवहारांवर परिणाम

पाणीटंचाईमुळे घरातील दैनंदिन कामांसह शेती आणि लहान-मोठ्या व्यवसायांवरही परिणाम झाला आहे. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी ग्रामस्थांना संघर्ष करावा लागत असताना संबंधित यंत्रणा नेमकी काय करत आहे, असा संतप्त प्रश्न उपस्थित होत आहे. पाइपलाइन फुटल्यानंतर दहा दिवसांपर्यंत पाणीपुरवठा पूर्ववत न होणे ही गंभीर बाब असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

अखेर संयम सुटल्याने ग्रामस्थांनी एकत्र येत रस्त्यावर ठिय्या दिला. आंदोलनस्थळी पोलिसांचे पथक दाखल झाले. पोलिसांनी ग्रामस्थांशी संवाद साधत परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करावा आणि निष्काळजीपणाला जबाबदार असलेल्या संबंधित कंपनीवर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

आज आणि उद्या जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर मतदार नोंदणी शिबिर

वर्धा जनमाध्यम : भारत निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेदरम्यान अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार (एएसडीडी) प्रवर्गात नोंद झालेल्या मतदारांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आज २८ आणि उद्या २९ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधित मतदारांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वान्मथी सी. यांनी केले आहे.

एसआयआर प्रक्रियेदरम्यान अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार अशी नोंद झाल्याने आणि गणना प्रपत्र प्राप्त न झाल्यामुळे अनेक मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होऊ शकलेली नाहीत. अशा मतदारांना शिबिरात गणना प्रपत्र भरणे, सादर करणे तसेच मतदार यादीतील नावासंदर्भात आवश्यक मार्गदर्शन व मदत करण्यात येणार आहे.

मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत अर्जांचे वितरण व संकलन केले जाणार आहे. संकलित अर्जांचा निपटारा १० डिसेंबरपर्यंत करण्यात येईल. त्यानंतर १५ डिसेंबरपर्यंत नोटीस, दावे आणि हरकतींची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असून, २२ डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

ज्या मतदारांनी निवासस्थान बदललेले नाही, मात्र काही कारणास्तव गणना प्रपत्र सादर केले नाही, त्यांना स्वाक्षरी केलेले गणना प्रपत्र आणि कारण नमूद असलेले ?नेक्स बी विवरणपत्र सादर करता येईल. हे अर्ज संबंधित निवडणूक नोंदणी अधिकारी, सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी किंवा बीएलओ यांच्याकडे प्रत्यक्ष अथवा ऑनलाइन ई-साइनद्वारे सादर करण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

त्यामुळे एएसडीडी प्रवर्गातील मतदारांनी आज आणि उद्या होणाऱ्या विशेष शिबिरात सहभागी होऊन आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले आहे.

वर्ध्यात राज्य राखीव पोलीस दलाच्या नव्या प्रशिक्षण केंद्रासाठी २८.७५ हे. आर. जमीन मंजूर

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा महत्वपूर्ण निर्णय

मुंबई / वर्धा जनमाध्यम : वर्धा जिल्ह्यातील पांढरकवडा येथे राज्य राखीव पोलीस दलाचे (एसआरपीएफ) नवे प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी महसूल विभागाने २८.७५ हेक्टर आर शासकीय जमीन देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

मौजा पांढरकवडा (ता. व जि. वर्धा) येथील सर्व्हे क्रमांक ५५ मधील ही जमीन गृह विभागामार्फत समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ४ (हिंगणा रोड, नागपूर) यांना प्रदान करण्यात आली आहे. महसूल मुक्त, सारामाफीने तसेच भोगाधिकार मूल्यरहित किमतीने 'भोगवटादार वर्ग-२' या धारणाधिकाराने ही जमीन देण्यात आली आहे.

या जमिनीच्या वापरासाठी शासनाने काही अटी व शर्ती निश्चित केल्या आहेत. जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठीच करावा लागणार असून, ताबा मिळाल्यापासून तीन वर्षांच्या आत बांधकामास सुरुवात करणे बंधनकारक राहील.

तसेच शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय जमिनीची विक्री, हस्तांतरण किंवा पोटविभाजन करता येणार नाही आणि अटींचा भंग झाल्यास जमीन शासनजमा करण्याचा अधिकार शासनाकडे राहील.

याविषयी बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पोलीस दलाचे प्रशिक्षण अद्ययावत असणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा जिल्ह्यात राज्य राखीव पोलीस दलाच्या नव्या प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक ती जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या केंद्रामुळे जवानांना दर्जेदार प्रशिक्षण मिळून राज्याच्या सुरक्षेला अधिक बळकटी मिळेल. नव्या प्रशिक्षण केंद्रामुळे वर्धा जिल्ह्यासह विदर्भातील पोलीस प्रशिक्षणाच्या सुविधांमध्ये मोठी भर पडणार असून, आगामी काळात सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने हा निर्णय उपयुक्त ठरणार आहे.

बालविवाह निर्मूलनासाठी प्रशासन, शाळा, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम करावे-जिल्हाधिकारी वान्मथी सी

बालविवाहमुक्त भारत अभियानांतर्गत जनजागृती रॅलीला जिल्हाधिकाऱ्यांनी हिरवी झेंडी दाखवून केले रवाना



वर्धा जनमाध्यम : बालपण हे शिक्षणाचे, खेळण्याचे आणि स्वप्ने पाहण्याचे वय असताना अनेक बालकांना बालविवाहाच्या सामाजिक बेड्यांमध्ये अडकविले जाते. या कुप्रथेमुळे मुलांचे शिक्षण, आरोग्य, स्वातंत्र्य आणि उज्ज्वल भविष्य धोक्यात येते. बालकांचे बालपण सुरक्षित ठेवण्यासाठी आणि बालविवाहाची प्रथा हद्दपार करण्यासाठी प्रशासन, शाळा, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले.

बालविवाहमुक्त भारत अभियानांतर्गत आंतरराष्ट्रीय बालविवाह व सक्तीचे विवाह निर्मूलन दिनानिमित्त शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून जनजागृती रॅली काढण्यात आली. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीला रवाना केले. विशेष म्हणजे, त्यांनी केवळ शुभारंभापुरती उपस्थिती न ठेवता स्वतः रॅलीत सहभागी होऊन बालविवाह निर्मूलनाचा संदेश दिला.

या रॅलीत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजीव सरदार, उपजिल्हाधिकारी संजय जाधवर, श्रीपती मोरे, तहसीलदार बबिता आळंदे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तृप्ती चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान बालविवाहविरोधी जनजागृती करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी बालविवाह न करण्याची सामूहिक शपथ घेतली.

बालविवाहाची माहिती मिळाल्यास ती दडपून न ठेवता तातडीने १०९८ या बाल हेल्पलाइन क्रमांकावर किंवा संबंधित यंत्रणेला कळवावी. कोणत्याही बालकाचे शिक्षण खंडित होऊ देऊ नये. बालविवाह रोखण्यासाठी प्रत्येकाने जागरूक नागरिक म्हणून पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. या उपक्रमात जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइन, जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्र, सखी वन स्टॉप सेंटर, वर्धा ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि स्वयंसेवक सहभागी झाले होते. शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

बालविवाहमुक्त ग्रामपंचायतींचा संकल्पही

बालविवाहमुक्त ग्रामपंचायती निर्माण करण्यासाठी आणि नागरिकांना या अभियानाशी जोडण्यासाठी शासनाच्या https://stopchildmarriage.wcd.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन बालविवाह न करण्याची शपथ घेण्याचे आवाहन करण्यात आले. बालविवाहमुक्त वर्धा जिल्ह्याच्या निर्मितीसाठी प्रशासन कटिबद्ध असून, या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे जिल्हा महिला व बालविकास विभागाने स्पष्ट केले.

-९० वर्षांची सासूही अंथरुणाला खिळली -मजुरी करून तिघांचा सांभाळ करणाऱ्या मातेची मदतीसाठी आर्त हाक

बाप-लेक दहा वर्षांपासून अंथरुणावर; कुटुंबाचा भार एकट्या पत्नीच्या खांद्यावर

विरूळ आकाजी / जनमाध्यम : गरीबीने तरी किती अंत पाहावा आणि नियतीने तरी किती परीक्षा घ्यावी? एकीकडे दहा वर्षांपासून पक्षाघातामुळे अंथरुणाला खिळलेला पती, दुसरीकडे भीषण अपघातात गंभीर जखमी होऊन अंथरुणावर पडलेला तरुण मुलगा आणि तिसरीकडे वयोमानामुळे परावलंबी झालेली ९० वर्षांची सासू... अशा संकटांच्या डोंगराखाली दबलेल्या एका महिलेची जगण्यासाठीची धडपड काळीज पिळवटून टाकणारी आहे. ही व्यथा आहे विरूळ आकाजी येथील राजेंद्र वैतागे यांच्या कुटुंबाची.

एकेकाळी हसते-खेळते असलेले वैतागे कुटुंब आज संकटाच्या गर्तेत सापडले आहे. राजेंद्र वैतागे यांना अचानक पक्षाघाताचा झटका आला. उपचारासाठी अनेक रुग्णालयांचे उंबरठे झिजवले. जवळची पुंजी खर्च केली. मात्र प्रकृतीत सुधारणा झाली नाही. मागील दहा वर्षांपासून ते अंथरुणाला खिळून आहेत. अशा परिस्थितीत मुलगा सचिन हा मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता. त्याच्या कमाईवरच घराचा गाडा कसाबसा पुढे सरकत होता. मात्र नियतीला हेही मान्य नव्हते. सचिनचा भीषण अपघात झाला आणि कुटुंबाचा उरलेला आधारही कोसळला. रुग्णालयातील उपचारांचा खर्च परवडत नसल्याने त्याला घरी आणावे लागले. आज तोही वडिलांप्रमाणे अंथरुणावर पडून आहे.

एकाच घरात बाप आणि मुलगा दोघेही गंभीर अवस्थेत खाटेवर पडलेले, तर ९० वर्षांची वृद्ध आईही परावलंबी. अशा परिस्थितीत राजेंद्र यांची पत्नीच संपूर्ण कुटुंबाचा एकमेव आधार बनली आहे. दिवसभर मजुरी करून मिळेल तेवढ्या पैशांत ती पती, मुलगा आणि वृद्ध सासूचा सांभाळ करीत आहे. स्वतःच्या वेदना बाजूला ठेवून तिन्ही जीवांना जगविण्याची तिची धडपड सुरू आहे. या कुटुंबाची व्यथा सांगताना संबंधित महिलेचा अश्रूंचा बांध फुटला. तिच्या डोळ्यांतील वेदना आणि मदतीची आर्त विनवणी मन हेलावून टाकणारी आहे.

भोजराज खवसे यांचे निधन



वर्धा : पिपरी मेघे येथील गुरुकृपा कॉलनी परिसरातील रहिवासी तथा डाक विभागाचे सेवानिवृत्त कर्मचारी भोजराज महादेवराव खवसे (वय ६२) यांचे सावंगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर स्थानिक मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ असा आप्तपरिवार आहे.

जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार शुभम पद्माकर आकरे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा अल्लिपुर, मौजा नं. १६, प.ह.न. ३, ता. हिंगणघाट जि. वर्धा ग्राम पंचायत अल्लिपुर च्या हद्दितील शेत सर्वे कं. ५१८/२ मधील प्लॉट कं. १८ ज्याची एकूण आराजी ३२४५.७५ चौ. फुट म्हणजेच ३०१.६५ चौ. मी. असुन त्याची चतुर्सिमा :-

पुर्वेसः प्लॉट नं. २९
पश्चिमेसः आउट रोड,
उत्तरेसः आउट रोड
दक्षिणेसः प्लॉट नं. २९

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २०,०१,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

ॲड. सचिन एस. कुरझाडकर
साई नगर वर्धा
मो. नं. ९८६००४१३६१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

विदर्भात ११ महिन्यांत ७५० शेतक-यांच्या आत्महत्या

यवतमाळ /प्रतिनिधी- शेतक-यांना दिवाळीपूर्वी ५००० रुपये मदत देऊन तुम्ही त्यांना ५००० रुपयांत दिवाळी साजरी करा असे सांगता; प्रत्यक्षात अनेक शेतक-यांना ही मदतही मिळालेली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माझा थेट प्रश्न आहे की, तुमची दिवाळी ५००० रुपयांत साजरी होते का? असा सवाल कॉरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी केला आहे.महाराष्ट्रातील शेतक-यांची विदारक परिस्थिती जाणून घेण्यासाठी सुरू केलेल्या पब्लिक अभियानांतर्गत त्यांनी यवतमाळ जिल्ह्यात शेतक-यांशी संवाद साधला आणि जिल्हा परिषद शाळांची पाहणी करत सरकारच्या कारभाराचे वाभाडे काढले. विदर्भातील शेतकरी आत्महत्यांच्या गंभीर मुद्यावरून अभिजित दिपके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार निशाणा साधला. सरकार बड्या उद्योगपतींचे कोट्यवधी रुपयांचे कर्ज माफ करते, मात्र बळीराजाची कर्जमाफी करत नाही. एका बाजूला मदतीच्या नावाखाली शेतक-यांची चेष्टा केली जात आहे, तर दुसरीकडे कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकरी मृत्यूला कवटाळत आहेत.शहर शोधा

मुख्यमंत्र्यांनी अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारावी

गेल्या अवघ्या ११ महिन्यांत एकट्या विदर्भात ७५० शेतक-यांना आत्महत्या कराव्या लागल्या आहेत. राज्याचे मुख्यमंत्री स्वत: विदर्भाचे सुपुत्र असूनही त्यांचे लक्ष शेतक-यांचे जीव वाचवण्याऐवजी कोल्हापूरच्या गोकुळ दूध डेअरीवर कब्जा कसा करता येईल याकडे आहे. एका शेतक-याच्या आत्महत्येनंतरही मुख्यमंत्र्यांना आपले अपयश जाणवायला हवे. जर तुम्हाला गोकुळची दूध डेअरीच सांभाळायची असेल आणि गोकुळचे दूधच विकायचे असेल, तर तात्काळ मुख्यमंत्रीपदाचा



राजीनामा देऊन खुर्ची खाली करा आणि शेतक-यांच्या हिताचे निर्णय घेणा-या नेत्याला मुख्यमंत्री होऊ द्या, असे आव्हान दिपके यांनी दिले.

स्वातंत्र्याच्या ८० वर्षांनंतरही पत्र्याच्या शाळा- पब्लिक अभियानांतर्गत अभिजित दिपके यांनी यवतमाळ जिल्ह्यातील धोत्रा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी शाळेची दुरवस्था पाहून त्यांनी प्रशासनावर संताप व्यक्त केला. धोत्रा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची कोणतीही शिस्त राहिलेली नाही; शिक्षक दुपारी १२ वाजता शाळेत येतात आणि वेळ होण्यापूर्वीच केव्हाही निघून जातात.

वर्गात बांबू, स्वच्छतागृहांची दुरवस्था- शाळेत विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ बाथरूमची सोय नाही; बाथरूमला ना छत आहे, ना दरवाजे. वर्गात चक्क बांबू ठेवलेले आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण होत आली तरी आजही ग्रामीण भागात पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरवाव्या लागत आहेत. ना शेतक-यांसाठी काही होत आहे, ना शेतक-यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी काही केले जात आहे. हे सरकार नेमके कोणासाठी काम करत आहे, याचे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना द्यावेच लागेल, असा इशाराही अभिजित दिपके यांनी दिला.

बीडीडी चाळ देशातील सर्वात मोठा अर्बन प्रकल्प

मुंबई : मुंबईतील मराठी माणूस हा मुंबईतच राहिला पाहिजे आणि त्याला हक्काचे मोठे घर मिळाले पाहिजे, यासाठी आमचे सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. पूर्वीच्या धोरणांमुळे दक्षिण मुंबईतील गिरणी कामगार वसई, विरार आणि कर्जतपर्यंत फेकला गेल्याची माहिती देत बीडीडी चाळ हा देशातील सर्वात मोठा अर्बन प्रकल्प असल्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी म्हटले आहे. नागरी निवारा परिषद अंतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्थांचे वर्ग-



१ रूपांतरण आदेश वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प आणि आगामी काळातील घरांच्या भव्य मोहिमेबाबत महत्त्वाची घोषणा केली. नागरी निवारा परिषदेच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहनिर्माण क्षेत्रातील बदलांचा आढावा घेतला. गरीब आणि सर्वसामान्य नागरिकांना हक्काचे घर मिळावे या उद्देशाने नागरी निवारा परिषदेचा कायदा करण्यात आला होता. मध्यंतरीच्या काळात त्याचा काही प्रमाणात गैरवापर झाला असला, तरी अनेक आदर्श उदाहरणेही घडली आणि त्याअंतर्गत ६२५ कुटुंबांना हक्काची घरे मिळाली, हे आमचे एक मोठे स्वप्न होते.

थेट १२०० चौरस फुटांचे घर- आमच्या सरकारने सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाला चालना देणारे निर्णय घेतल्यानंतर मुंबईत तब्बल १६०० प्रकल्प मार्गी लागले आहेत. ज्या मुंबईतील सामान्य माणसाला पूर्वी केवळ ३०० ते ३५० चौरस फुटांच्या छोट्या घरात दाटीवाटीने राहावे लागत होते, त्याला आज १२०० चौरस फुटांचे हक्काचे घर मिळाले आहे. मी स्वत: घरांच्या चाव्या देताना ही घरे प्रत्यक्ष पाहिली, तेव्हा या परिवर्तनाची प्रचिती आली असेही फडणवीस म्हणाले.

आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाला काँग्रेसचा विरोध

मुंबई /प्रतिनिधी- आयडीबीआय बँकेची परकीय भांडवलदारांना विक्री करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाविरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. या निर्णयाला विरोध करण्यासाठी बँकेचे अधिकारी, कर्मचारी आणि विविध बँकांमधील कर्मचारी संघटनांची संयुक्त सभा शनिवार, २८ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता दादर येथील टिळक भवनात आयोजित करण्यात आली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी खासदार कुमार केतकर, वरिष्ठ आर्थिक पत्रकार राजीव रंजन सिंग, ऑल इंडिया बँक ऑफिसर्स



असोसिएशनचे सरचिटणीस एस. नागराजन आणि ऑल इंडिया आयडीबीआय ऑफिसर्स असोसिएशन'चे सरचिटणीस विठ्ठल कोटेश्वर राव या सभेला मार्गदर्शन करणार आहेत. काँग्रेसचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आयडीबीआय बँकेचा कॅनडास्थित फेअरफॅक्स फायनान्शिअल होल्डिंग्ज लिमिटेड सोबतच्या कराराला विरोध दर्शवला आहे. भारतीय वित्तीय क्षेत्रावरील परकीय भांडवलदारांचा वाढता प्रभाव रोखण्याची गरज असून बँक अधिकारी व कर्मचा-यांच्या संघर्षाला काँग्रेसचा पाठिंबा असल्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे. प्रदेश काँग्रेसच्या अर्थ विभागाचे प्रमुख विश्वास उटगी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या काही महिन्यांपासून या मुद्द्यावर जनजागृती मोहीम राबवली जात आहे. त्याचाच भाग म्हणून बँक अधिकारी, कर्मचारी तसेच प्रदेश काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते यांची ही संयुक्त सभा होणार असल्याची माहिती विश्वास उटगी यांनी दिली.

थकीत वाहतूक ई-चलन भरण्यासाठी २० टक्के सवलत

मुंबई /प्रतिनिधी- राज्यातील वाहनचालकांना थकीत वाहतूक दंडातून दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र वाहतूक पोलिस चलान अभय योजना-२०२६ लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेंतर्गत पात्र प्रलंबित ई-चलनांच्या दंडाच्या रकमेत २० टक्के सवलत देण्यात येणार आहे. येत्या १ डिसेंबर २०२६ पासून मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात ही योजना लागू होणार आहे. गृह विभागाने २७ नोव्हेंबर रोजी यासंदर्भातील शासन आदेश जारी केला आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यानंतर मोठ्या प्रमाणावर ई-चलन जारी केले जात असले, तरी त्यापोटी आकारण्यात आलेल्या दंडाची प्रत्यक्ष वसुली होत नसल्याची बाब सर्वोच्च न्यायालयानेही निदर्शनास आणून दिली आहे. सुरक्षित रस्ते आणि अपघातांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने दंडवसुली प्रभावी करण्याची गरज



लक्षात घेऊन राज्य सरकारने ही अभय योजना आणली आहे. ४ नोव्हेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या योजनेला तीन टप्प्यांत मान्यता देण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात २१ जानेवारी २०२६ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जारी झालेल्या आणि १ डिसेंबर रोजी वसुलीसाठी प्रलंबित असलेल्या पात्र ई-चलनांवर २० टक्के सवलत मिळणार आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी वाहनचालकांना योजना सुरू झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दंडाची रक्कम शासनाच्या खात्यात जमा करावी लागणार आहे. दुस-या टप्प्यात १ डिसेंबर २०२६ पासून जारी होणा-या पात्र ई-चलनांवरही २० टक्के सवलत मिळणार आहे. मात्र, या टप्प्यात चलन बजावल्याच्या तारखेपासून ४५ दिवसांच्या आत दंड भरल्यासच सवलतीचा लाभ घेता येईल. ही सवलत ३० नोव्हेंबर २०२७ पर्यंत उपलब्ध राहणार आहे. तिस-या टप्प्यात ३० जानेवारी २०१९ ते २० जानेवारी २०२६ या कालावधीत जारी झालेल्या आणि अभय योजना सुरू होताना सक्षम न्यायालय किंवा आभासी न्यायालयात प्रलंबित असलेल्या पात्र चलनांवर २० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

पुणे गोळीबार प्रकरणाचा तपास फास्टट्रॅकवर

पुणे /प्रतिनिधी- पुण्यातील शिवाजीनगर जिल्हा कोर्ट परिसरात आरोपीवर गोळीबार आणि कोयत्याने वार केल्याचा थरार घडला. या घटनेने पुण्यातील वाढती गुन्हेगारीवरून विरोधकांनी एकच हल्लाबोल केला. कायदा आणि सुव्यवस्थेवर मोठा सवाल उपस्थित करण्यात आला. सातत्याने गुन्हेगारी घटना घडत असल्याने नेते चिंता व्यक्त करत असतानाच ही भयावह घटना घडली. या घटनेनंतर उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार ॲक्शन मोडवर आल्या आहेत. त्यांनी याप्रकरणाचा तपास फास्टट्रॅकवर करण्याचे आदेश दिल्याची माहिती दिली आहे.

विरोधकांनीच नाही तर शरदचंद्र पवार राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार त्यांच्यावर तिखट प्रतिक्रिया दिली होती. पुण्यातील शिवाजीनगर कोर्ट बाहेर झालेल्या गोळीबार आणि हल्ला प्रकरणानंतर सुनेत्रा पवार ॲक्शन मोडवर आल्या आहेत. पुणे पोलिसांची तातडीने बैठक बोलावली आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्यासह सर्व वरिष्ठ



पोलिस अधिकारी उपस्थित होते.

प्रकरणाची फास्टट्रॅकवर तपास

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पोलिसांसोबतच्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधला. आपल्याला माहिती आहे की काही दिवसापूर्वी दुर्दैवी घटना घडली. त्यासाठी मी पुण्यात आले आहे. पुणे पोलिस आयुक्त, पिंपरी-चिंचवड विभाग पोलिस आयुक्त आणि पोलिस यांची आढावा बैठक घेतली आहे. या गुन्ह्यासंदर्भात आणि इतर संबंधात विचारणा केली. सहा आरोपींना पकडले आहे. तीन आरोपींचा शोध सुरू आहे. फास्टट्रॅकवरती या घटनेचा तपास करण्याचे आदेश दिले आहे अशी प्रतिक्रिया सुनेत्रा पवार यांनी दिली.

अगोदर टीका नंतर माफी

पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीवरून आमदार रोहित पवार यांनी सुनेत्रा पवार यांचावर काल टीका केली होती. सुनेत्रा वहिनींना अजितदादांसारखे काम येत नाही. सुनेत्रा पवारांना पुणेकरांच्या अपेक्षा पूर्ण करता येईल असे वाटत नाही. पुण्याला कठोर पालकमंत्री द्या अशी मागणी रोहित पवार यांनी केली होती. त्यानंतर त्यांनी व्यक्तिगत दिलगिरीही व्यक्त केली. तर दुसरीकडे सुप्रिया सुळे यांनी पुण्याचा पालकमंत्री बदलण्याची मागणी केली होती. आज माध्यमांशी बोलताना हा वाद न वाढवण्याची भूमिका घेत त्यांनी सुनेत्रा पवार यांची माफी मागते असे म्हटले. तर पुण्यातील गुन्हेगारीविषयी मोठ्या कारवाईची मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेनंतर पुणे पोलिसांवर नाराजी व्यक्त केल्याचेही समोर आले. तर आज सुनेत्रा पवार यांनी पोलिसांची बैठक घेत जलद तपासाचे आदेश दिले.

... तर उरली सुरली लोकशाहीही संपुष्टात येईल

नवी दिल्ली : भारतीय जनता पक्ष नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत आल्यानंतर देशाची घटनात्मक रचना मोडीत काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. २०१४ पासूनच या दिशेने प्रयत्न सुरू झाले असून २०२६ मध्ये लोकशाहीचे जे काही अवशेष शिल्लक आहेत, तेही ३० नोव्हेंबरला संपुष्टात येऊ शकतात, असा गंभीर इशारा माजी केंद्रीय मंत्री आणि राज्यसभा खासदार कपिल सिब्बल यांनी दिला आहे. मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाच्या पार्श्वभूमीवर कपिल सिब्बल यांनी ही प्रतिक्रिया दिली



आहे. १३१ वी घटनादुरुस्ती विधेयक ३० नोव्हेंबर रोजी मंजूर झाल्यास भारतातील घटनात्मक लोकशाहीसमोर मोठे संकट निर्माण होईल, असे मत सिब्बल यांनी व्यक्त केले. हा दिवस देशाच्या घटनात्मक लोकशाहीसाठी निर्णायक ठरू शकतो, असेही त्यांनी म्हटले आहे. सिब्बल यांनी पुढे इशारा दिला की, घटनादुरुस्ती विधेयक मंजूर झाल्यास देश हळूहळू हुकूमशाही स्वरूपाच्या शासनव्यवस्थेकडे वाटचाल करू शकतो. भविष्यात संविधानात आणखी बदल करून कार्यकारी यंत्रणेच्या मनमानीनुसार निर्णय घेतले जातील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. सिब्बल यांच्या मते, अशा परिस्थितीत संसदेचे महत्त्व कमी होईल आणि संसद केवळ नावापुरती संस्था उरेल. न्यायालयांमधील नियुक्त्याही सरकारच्या पसंतीनुसार केल्या जातील, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.देशातील घटनात्मक संस्था आणि लोकशाही व्यवस्थेच्या भवितव्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. माझा हा अंदाज आहे. आजची तारीख लक्षात ठेवा असे आवाहनही सिब्बल यांनी केले. ३० नोव्हेंबर हा दिवस हिंदुस्थानातील घटनात्मक लोकशाहीसाठी निर्णायक ठरू शकतो, असे त्यांनी म्हटले. दरम्यान, ३० नोव्हेंबरला संसदेचे कामकाज पुन्हा सुरू होणार असून या विधेयकाबाबत केंद्र सरकार काय भूमिका घेते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. मात्र, या अधिवेशनात नेमके कोणते विधेयक मांडले जाणार आहे? याबाबत सरकारकडून अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही.१३१ वी घटनादुरुस्ती विधेयक हे मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षणाशी संबंधित आहे. या विधेयकाद्वारे लोकसभेची सदस्यसंख्या ८५० पर्यंत वाढवणे आणि महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी करण्याचा प्रस्ताव होता. यापूर्वी १७ एप्रिल २०२६ रोजी लोकसभेत आवश्यक दोन तृतीयांश बहुमत न मिळाल्याने हे विधेयक मंजूर होऊ शकले नव्हते. त्यावेळी विधेयकाच्या बाजूने २९८, तर विरोधात २३० मते पडली होती.

सोशल मीडिया कंटेंटवर सरकारी कारवाईचा वेग वाढला

नवी दिल्ली : भारतात सोशल मीडिया आणि इंटरनेटवरील कंटेंटवर सरकारी यंत्रणा, पोलिस आणि न्यायालयांकडून होणा-या कारवाईचा वेग मोठ्या प्रमाणात वाढल्याचे समोर आले आहे. जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीत मेटाने भारतात ५४.३९ लाखांहून अधिक कंटेंट आणि अकाउंट्सवर निर्बंध घातले आहेत. याच काळात गुगललाही भारतात सरकारी यंत्रणा आणि न्यायालयांकडून हजारो कंटेंट हटवण्याच्या विनंत्या प्राप्त झाल्या. मेटा आणि गुगलच्या ट्रान्सपरन्सी अहवालातून ही माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, मेटाच्या आकडेवारीनुसार भारतातील कंटेंटवरील निर्बंधांमध्ये मागील सहा महिन्यांच्या तुलनेत तब्बल १३,००० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे.

जानेवारी ते जून २०२६ या कालावधीत मेटाने स्थानिक कायद्यांच्या आधारे भारतातील ५४.३९ लाख कंटेंट आणि अकाउंट्सवर कारवाई केली. यापूर्वीच्या सहा महिन्यांत म्हणजे जुलै ते डिसेंबर २०२५ या कालावधीत हा आकडा सुमारे ४१,४०० इतका होता. म्हणजेच अवघ्या सहा महिन्यांत निर्बंध घालण्यात आलेल्या कंटेंट आणि अकाउंट्सच्या संख्येत १३१ पटींपेक्षा अधिक वाढ झाली आहे. विशेष म्हणजे, याच कालावधीत जगभरातील मेटाच्या कंटेंट निर्बंधांमध्ये २.७ टक्क्यांची घट झाली. जगभरात एकूण २.७१ कोटी कंटेंटवर निर्बंध घालण्यात आले. त्यापैकी २० टक्क्यांहून अधिक वाटा एकट्या भारताचा होता. या यादीत इंडोनेशिया पहिल्या क्रमांकावर असून भारताचा दुस-या क्रमांकावर आहे. जुलै ते डिसेंबर २०२५ या कालावधीत जागतिक निर्बंधांमधील भारताचा वाटा केवळ ०.१५ टक्के होता.

फेसबुक आणि इन्स्टाग्रामवरील कारवाईत मोठी वाढ

फेसबुक आणि इन्स्टाग्रामवरील कारवाईची आकडेवारी पाहिल्यास ही वाढ अधिक स्पष्ट होते. भारतात फेसबुक पोस्टवरील निर्बंधांची संख्या सुमारे २३,००० वरून वाढून २८.०२ लाखांवर पोहोचली. तर इन्स्टाग्रामवरील कंटेंटवरील निर्बंध सुमारे



१०,५०० वरून वाढून २६ लाखांहून अधिक झाले. याशिवाय फेसबुकवरील ११,१८२ प्रोफाइल्स आणि इन्स्टाग्रामवरील १२,९८९ अकाउंट्सचा प्रवेशही रोखण्यात आला. या आकडेवारीनुसार, जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यांत मेटाने दररोज सरासरी ३० हजारांहून अधिक कंटेंट आणि अकाउंट्सवर निर्बंध घातले. म्हणजेच दर तीन सेकंदाला सरासरी एका कंटेंट किंवा अकाउंटवर कारवाई करण्यात आली.

आकडेवारीत तफावत- मेटा आणि गुगलच्या आकडेवारीत एवढी तफावत का आहे, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. याचे एक कारण म्हणजे दोन्ही कंपन्यांची आकडेवारी मोजण्याची पद्धत वेगवेगळी आहे. गुगल सरकारी नोटीसच्या आधारे हटवण्यात आलेल्या विशिष्ट लिंकची नोंद करते. याउलट मेटाच्या स्थानिक कायद्यांशी संबंधित आकडेवारीत एखाद्या कंटेंटच्या हुबेहूब डुप्लिकेट प्रतींचाही समावेश होतो. अशा प्रतींवर स्वयंचलित यंत्रणेद्वारे भौगोलिक निर्बंध लावले जातात.मेटाच्या म्हणण्यानुसार, भारतातील कंटेंटवरील कारवाई विविध सरकारी विभाग आणि तपास यंत्रणांकडून मिळालेल्या तक्रारी आणि अहवालांच्या आधारे करण्यात आली. यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटर तसेच विविध राज्यांतील कायद्याची अंमलबजावणी करणा-या यंत्रणांचा समावेश आहे. याशिवाय स्वयंचलित यंत्रणा आणि अन्य कायदेशीर विनंत्यांच्या आधारेही कारवाई करण्यात आली. मेटाने विशेषत: स्पष्ट केले की, केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटरकडून आलेल्या विनंत्या माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मधील कलम ७९(३)बी) अंतर्गत जारी करण्यात आल्या होत्या.

कंटेंट रोखल्याची माहिती यूजर्सना नाही- मेटाच्या ट्रान्सपरन्सी व्यवस्थेबाबतही महत्त्वाची बाब समोर आली आहे. मेटाने काही देशांमध्ये अधिक पारदर्शक यंत्रणा लागू केली आहे. या व्यवस्थेअंतर्गत एखाद्या यूजरचा कंटेंट सरकारी यंत्रणेच्या विनंतीवरून रोखला गेल्यास संबंधित यूजरला कोणत्या सरकारी प्राधिकरणाच्या आदेशावरून ही कारवाई झाली, याची माहिती दिली जाते.

महाआयटी च्या कारभारामुळे पशुसंवर्धन ची नाचक्की

मुंबई /प्रतिनिधी- राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता विकास योजनेला तब्बल नऊ महिन्यांनंतर मुहूर्त मिळाला. संविधान दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्र्यांनी उद्घाटन केले. पण, उद्घाटनानंतर काही मिनिटांतच महाडीबीटी संकेतस्थळ विस्कळीत झाले. त्यामुळे अनेक महिन्यांपासून प्रतिक्षेत असलेले शेतकरी आणि पशुपालकांचा भ्रमनिरास झाला आहे.एकीकडे माहिती तंत्रज्ञानाचा, कृत्रिम बुद्धिमत्तेचा गप्पा मारायच्या आणि दुसरीकडे महाडीबीटी सारखे महत्त्वाचे संकेतस्थळही व्यवस्थितीत चालत नाही, अशी दयनीय अवस्था आहे. सुरुवातीला योजना सुरू करण्यासाठी आवश्यक तांत्रिक बदल करण्यासाठी एजन्सीची नेमणूक करण्यात आली. एजन्सीला अपेक्षित काम करता आले नाही त्यामुळे महाआयटीचे कर्मचारी, अधिकारी संकेतस्थळावर आवश्यक बदलांसाठी काम करू लागले. पण, कामात अपेक्षित प्रगती झाली नाही. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाचे सचिव, आयुक्तांनी लक्ष घालून आपले दोन अधिकारी महाआयटीकडे तैनात केले.तरीही अपेक्षित वेगाने महाडीबीटी संकेतस्थळावर बदल झाले नाहीत, त्यामुळे योजना लांबणीवर पडली. पहिल्यांदा मार्चमध्ये योजना सुरू करण्याची घोषणा केली होती, त्यानंतर १५ ऑगस्ट रोजी उद्घाटनाची घोषणा करण्यात आली, अखेर २६ नोव्हेंबर रोजी योजनचे उद्घाटन झाले. प्रत्यक्षात अद्यापही योजनेसाठी अर्ज करता येत नाहीत.

फक्त प्रचार, प्रसिद्धी, अंमलबजावणी शून्य

या योजनेची पशुसंवर्धन विभागाकडून



योजनेची जोरदार प्रचार, प्रसिद्धी करण्यात आली. खुद्द पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, सचिव, आयुक्तांनी चित्रफिती तयार करून सोशल मिडियाद्वारे जाहिरात करून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. पण, प्रत्यक्षात अद्यापपर्यंत योजनेची अंमलबजावणी सुरू झालेली नाही. त्यामुळे ग्रामीण भागात कार्यरत कर्मचारी, अधिका-यांना शेतकरी, पशुपालकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

प्रथम येणा-याला प्रथम प्राधान्य मुळे गोंधळ- योजनेतील गैरव्यवहार, अनियमितता टाळण्यासाठी प्रथम अर्ज करणा-याला प्रथम प्राधान्य देण्याचे धोरण जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी उद्घाटन केल्यानंतर काही मिनिटांतच २५ लाखांहून अधिक लाभार्थ्यांनी अर्ज भरण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महाडीबीटीची संपूर्ण यंत्रणाच विस्कळीत झाली असल्याची माहिती पशुसंवर्धन विभागातील एका अधिका-यांने दिली.

अर्थ विभागाकडे २,४०० कोटी रुपयांची मागणी- अर्थसंकल्पात योजनेची घोषणा करण्यात आली असली तरीही योजनेसाठी ठोस आर्थिक तरतूद करण्यात आली नव्हती. त्यामुळे जुन्या वैयक्तिक लाभाच्या योजना वगळता अन्य योजनांसाठी नव्याने लेखाशिर्ष मंजूर करण्याची गरज होती, हे लेखाशिर्ष मे महिन्यात मंजूर करण्यात आले आहे. दुधाळ गायी म्हशी, अंडी देणारे आणि मांसल कुक्कुट, शेळी झ मेंढी, मुरघास प्रकल्प. कृत्रिम रेतन, पशुधन विकासात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, व्याज सवलत योजना आदींसाठी पशुसंवर्धन विभागाने सुमारे २,४०० कोटी रुपयांच्या निधीची मागणी पुरवणी मागण्यांद्वारे केली आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचे उद्घाटन झाल्यानंतर काही वेळातच महाडीबीटीचे संकेतस्थळ विस्कळीत झाले आहे. पशुसंवर्धन विभाग माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या संपर्कात आहे. लवकरच सर्व प्रक्रिया सुरळीत होईल अशी माहिती पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली.

कदम-जरांगे यांच्यात बिनसले

मुंबई /प्रतिनिधी- मनोज जरांगे पाटील यांनी दोन वर्षांपूर्वीच्या कथित ५०० कोटींच्या ऑडिओ बॉम्बने खळबळ उडवून दिली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत भाजपकडून जरांगे पाटील यांच्यासाठी ५०० कोटी रुपये घेतल्याचा कथित दावा होता. त्याने एकच खळबळ उडाली. या कथित ऑडिओ क्लिपमधील नावेही पुढे समोर आली. त्यानंतर एसआयटी पथकाने परवा जरांगे पाटील यांची भेट घेतली. त्यांच्याकडून पेन ड्राईव्हसह इतर मुद्देमाल हस्तगत केला. पंचनाम्यावर त्यांची स्वाक्षरी घेतली. तर आता याचप्रकरणात कदम विरुद्ध जरांगे असा सामना उभा महाराष्ट्र पाहत आहे. जरांगे पाटील यांनी एसआयटी पथक आल्यानंतरही कदम यांच्या नावाचा धोशा लावला होता. आता गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी जरांगे पाटील यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप केल्याने खळबळ उडाली आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी मनोज जरांगे सुपारी घेऊन काम करत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. मराठा समाजासाठी आमच्या सरकारने घेतलेले निर्णय इतिहासात कधीही घेतले गेले नाहीत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बदनाम करण्याचा जरांगेंचा प्रयत्न आहे. आता त्यांची दिशा भरकटली आहे. जरांगेंचा उद्देश मराठा समाजाच्या हिताचा दिसत नाही, असेही कदम म्हणाले. जरांगेंनी दिलेल्या पेनड्राइव्ह प्रकरणी एसआयटी चौकशी सुरू, दीड महिन्यात त्यांनी नावे जाहीर देखील केले तरी चौकशीत सत्य समोर येणारच असल्याचे योगेश कदम म्हणाले.कथित ऑडिओ क्लिप प्रकरणात मनोज जरांगे पाटील यांनी शिवसेना नेते रामदास कदम यांचीही चौकशी करण्याची मागणी केल्यानंतर आता रामदास कदम यांनी जोरदार पलटवार केला आहे. मनोज जरांगे घाबरले आहेत, म्हणूनच माझ्याकडे बोट दाखवत आहेत अशा शब्दांत कदम यांनी जरांगेंना प्रत्युत्तर दिले आहे. तुमच्या पत्रकार परिषद होण्याआधीच बीडमध्ये ही ऑडिओ क्लिप वाजली होती. ती माझ्याकडे दुस-या दिवशी आली, तेव्हा मी त्यावर बोललो असेही कदम यांनी स्पष्ट केले. दरम्यान, एकनाथ शिंदे यांच्यावर ५०० कोटींचे कथित आरोप करण्यात आले असून मुख्यमंत्र्यांनी आता चौकशी लावली आहे. त्यामुळे सर्व सत्य बाहेर येईल असा विश्वास रामदास कदम यांनी व्यक्त केला. माझ्याकडे खूप काही मसाला आहे, मात्र सध्या मला काही बोलायचे नाही. चौकशीत जे काही आहे ते निष्पन्न होईल असे सूचक विधान करत रामदास कदम यांनी या प्रकरणातील सस्पेन्स आणखी वाढवला आहे.

अनैतिक संबंधातून झालेल्या हत्येचा पर्दाफाश

परभणी : शहरातील सुलताना बेगम शेख युसूफ यांनी नानलपेठ पोलिस स्टेशनला त्यांचा मुलगा शेख युनूस शेख युसूफ हा दि.२४ नोव्हेंबर रोजी रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास घरातून ऑटो घेऊन गेला असून तो परत न आल्याची तक्रार दिली होती. सदरील नवा मोंढा पोलिस स्टेशन हद्दीतील बलसा शिवारात आढळून आला आहे. या प्रकरणी एका महिलेसह तिच्या विधीसंघर्षग्रस्त २ बालकांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता अनैतिक संबंधातून हत्या करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने खळबळ उडाली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, बेपत्ता शेख युनुस गायब असल्याने या प्रकरणी गुन्हा नोंदवून तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे नोंदविण्यात आला होता. पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, अपर पोलिस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान अपहृत व्यक्तीचा ऑटो दर्गा परिसरातील कॅनॉलमध्ये आढळून आला. तसेच बलसा शिवारात अपहृत इसमाचा मृतदेह पाण्यात तरंगताना आढळून आला. याप्रकरणी आरोपी महिला व तिचे दोन विधिसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, तिचे व मयत इसमाचे मागील २ वर्षांपासून अनैतिक संबंध असल्याचे निष्पन्न झाले. याच अनैतिक संबंधातून सदर हत्या करण्यात आल्याचे तपासात समोर आले. सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे, पोलिस उपनिरीक्षक गणेश सवंडकर, पोहेकॉ. रणजित आगळे, मुकेश बुधवंत, विलास सातपुते, पांडुरंग तु

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

विरोधकांसमोर आव्हान

पुढील वर्षी होणाऱ्या उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, गोवा आणि मणिपूर या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचा आराखडा लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. देशातील विरोधी पक्षांची राजकीय विश्वासार्हता, भाजपच्या संघटनात्मक ताकदीची व्याप्ती आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी तयार होणारे राजकीय वातावरण यांची लिटमस टेस्ट म्हणून हे निकाल महत्त्वाचे ठरणार आहेत. उत्तर प्रदेशातील ४०३ जागा, पंजाबमधील ११७, उत्तराखंडमधील ७०, मणिपूरमधील ६० आणि गोव्यातील ४० जागा अशा एकूण ६९० जागांसाठी हा सामना होईल. या पाचपैकी चार राज्यांत भाजप सरकार आहे. पंजाबमध्ये आम आदमी पक्ष सत्तेत आहे. त्यामुळे विरोधकांसमोर एक सक्षम राजकीय पर्याय उभा करण्याचे आव्हान आहे. सत्ताधाऱ्यांविरोधातील नाराजीचा मुद्दा हाती घेतला, तरी त्याचे मतांमध्ये रूपांतर करण्यासाठी आवश्यक संघटनात्मक ताकद, नेतृत्व आणि एकजूट विरोधकांत कितपत आहे, हा खरा प्रश्न आहे. सर्वांत महत्त्वाची लढत उत्तर प्रदेशात असेल. देशाच्या लोकसभेत सर्वाधिक ८० खासदार पाठवणाऱ्या या राज्यातील निकालांचा राष्ट्रीय सत्तेच्या समीकरणांवर थेट परिणाम होतो. उत्तर प्रदेशच्या राजकारणात मायावती, मुलायमसिंह यादव आणि अखिलेश यादव यांनी वेगवेगळ्या सामाजिक समीकरणांच्या आधारे सत्ता मिळवली. १९९० च्या दशकात मंडल आणि कमंडल राजकारणाने राज्याचे राजकीय चित्र बदलले. बहुजन समाज पक्षाने दलित मतांचे संघटन केले, तर समाजवादी पक्षाने यादव-मुस्लिम मतांच्या समीकरणातून प्रभाव निर्माण केला. भाजपने मात्र या पारंपरिक समीकरणांच्या पलीकडे जाऊन व्यापक हिंदुत्व, विकास आणि लाभार्थी वर्गाचे राजकारण उभे केले. नरेंद्र मोदी आणि योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाने या राजकीय विस्ताराला बळ दिले. २०२२ मध्ये भाजपने २५५ जागा जिंकल्या होत्या. मित्रपक्षांसह राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा आकडा २७३ वर पोहोचला होता. समाजवादी पक्षाला १११ जागा मिळाल्या होत्या. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाने ३७ जागा जिंकल्यामुळे अखिलेश यादव यांना राजकीय पुनरागमनाची आशा वाटते. तथापि, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचे राजकीय गणित वेगळे असते. विधानसभा निवडणुकीत स्थानिक उमेदवार, जातीय समीकरणे, प्रशासन, कायदा-सुव्यवस्था आणि मुख्यमंत्रिपदाचा चेहरा अधिक निर्णायक ठरतो. योगी आदित्यनाथ यांची विकासाभिमुख प्रशासकीय प्रतिमा, कायदा-सुव्यवस्थेबाबतची भूमिका, पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक, एक्स्प्रेस वे, विमानतळ आणि धार्मिक पर्यटनाचा विस्तार यांसह अनेक जमेच्या बाजू आहेत. अयोध्येतील राममंदिर, काशी विश्वनाथ धाम आणि धार्मिक पर्यटनाच्या विकासामुळे उत्तर प्रदेशच्या सांस्कृतिक राजकारणाला नवे परिमाण मिळाले आहे. दुसरीकडे अखिलेश यादव यांच्याकडे विरोधी मतांचे ध्रुवीकरण करण्याची क्षमता आहे; मात्र काँग्रेसबरोबरची आघाडी, जागावाटप आणि उमेदवार निवडीतील समन्वय ही आव्हाने कायम आहेत. उत्तर प्रदेशात दलितांचे प्रमाण सुमारे २१ टक्के, तर मुस्लिमांचे प्रमाण १९ टक्के आहे. बहुजन समाज पक्षाची भूमिका आणि मायावतींच्या स्वतंत्र राजकीय रणनीतीचाही निकालावर कितपत परिणाम होईल हे पहावे लागेल. असदुद्दीन ओवैसी यांच्या 'एमआयएम'ने आणि खासदार चंद्रशेखर आझाद यांच्या आझाद समाज पक्षाने 'सामाजिक परिवर्तन मोर्चा'ची स्थापना केली आहे. मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून आझाद यांच्या नावाची घोषणा ओवैसी यांनी केली. या आघाडीमुळे विरोधकांच्या मतांचे विभाजन होणार आहे. विशेषतः समाजवादी पक्षापुढील अडचणी वाढू शकतात. सपा, बसपा आणि सामाजिक परिवर्तन मोर्चा यांच्यात स्पर्धा होईल. कमी मताधिक्याने निकाल लागणाऱ्या मतदारसंघांमध्ये दोन-तीन टक्के मतांचे विभाजनही निर्णायक ठरू शकते. पंजाबमध्येही राजकारण ढवळू लागले आहे. दिल्लीतील यशाच्या जोरावर आम आदमी पक्षाने पंजाबात गतनिवडणुकीत ११७ पैकी ९२ जागा जिंकल्या. काँग्रेसला १८, अकाली दलाला तीन आणि भाजपला दोन जागा मिळाल्या. मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या सरकारची आता कसोटी असेल. पंजाबची आर्थिक स्थिती, शेतीवर अवलंबित्व, अमली पदार्थांचा प्रश्न, औद्योगिक गुंतवणूक या प्रश्नांवर सरकारची कामगिरी तपासली जाईल. काँग्रेससाठी ही संधी असली तरी नेतृत्वाचा निर्णय घेण्यात होणारा विलंब आणि अंतर्गत गटबाजीमुळे मतदारांत संभ्रम निर्माण होतो. दिल्लीतील आपचा पराभव, ओसरलेला केजरीवालांचा करिष्मा आणि भाजप-अकाली दल युती पंजाबचा निकाल पालटणार का हे पाहणे महत्त्वाचे आहे. अकाली दलाच्या पारंपरिक ग्रामीण आधाराचा आणि भाजपच्या शहरी संघटनात्मक प्रभावाचा योग्य मेळ बसला, तर पंजाबच्या राजकारणात नवे समीकरण तयार होऊ शकते. उत्तराखंडमध्ये २०२२ मध्ये भाजपने ७० पैकी ४७ जागा जिंकून सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवली. पुष्करसिंह धामी यांच्यासमोर आता तिसऱ्यांदा विजय मिळवण्याचे आव्हान असेल. राष्ट्रीय सुरक्षा, रस्ते, पर्यटन, धार्मिक तीर्थक्षेत्रांचा विकास आणि पायाभूत सुविधा हे भाजपचे महत्त्वाचे मुद्दे ठरू शकतात. समान नागरी कायद्याची अंमलबजावणी ही प्रचाराचा विषय असेल. काँग्रेस बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, स्थलांतर, प्रशासनातील त्रुटी यांवरून सरकारला घेरण्याच्या तयारीत आहे; मात्र मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आणि संघटनात्मक एकजूट याबाबत गोंधळाची स्थिती आहे. मणिपूरची निवडणूक वेगळ्या पार्श्वभूमीवर होईल. २०२३ पासून मैतेई-कुकी संघर्षाने राज्याच्या सामाजिक रचनेला धक्का दिला. हजारो नागरिकांचे विस्थापन, जीवितहानी, सामाजिक दरी यामुळे प्रशासनासमोर कठीण प्रश्न उभे राहिले. फेब्रुवारीत राष्ट्रपती राजवट संपून युमनाम खेमचंद सिंह यांच्या नेतृत्वाखाली भाजप सरकार पुन्हा स्थापन झाले. त्यामुळे भाजपला शांतता, पुनर्वसन, सुरक्षितता आणि सर्व समुदायांचा विश्वास संपादन करण्याच्या कसोटीवर उतरावे लागेल. काँग्रेसला सरकारविरोधी नाराजीचा फायदा घेता येऊ शकतो. गोव्यात २०२२ मध्ये भाजपने २० जागा जिंकल्या होत्या. बहुमतासाठी एक जागा कमी असूनही मित्रपक्ष आणि अपक्षांच्या मदतीने सरकार स्थापन केले. त्यानंतर काँग्रेसमधील आठ आमदार भाजपमध्ये दाखल झाल्याने विधानसभेतील भाजपचे संख्याबळ वाढले. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या सरकारविषयी मतदारांमध्ये समाधान आहे. काँग्रेस, आप आणि इतर प्रादेशिक पक्षांमुळे पुन्हा विरोधी मतांचे विभाजन होऊ शकते. एकुणात, आजघडीला भाजपकडे नेतृत्व, संघटना आणि सत्तेतील चार राज्यांचा अनुभव अशी महत्त्वाची राजकीय ताकद आहे. विरोधकांनी ही दरी भरून काढली नाही, तर भाजपला रोखणे त्यांच्यासाठी कठीण ठरू शकते.

कष्ट सारे त्याच्या हाती...

महात्मा जोतीराव फुले यांचे २०० वे जन्मशताब्दी वर्ष सुरू आहे. २८ नोव्हेंबरला त्यांचा स्मृतिदिन आहे. बालविवाह प्रथा असो, शेतीमालास रास्त भाव असो, की बंधारे घालून पाणी अडविणे असो, त्यांनी त्या काळी केलेल्या सूचना आजही तेवढ्याच उपयुक्त ठरतात.

विद्येविना मति गेली;
मतिविना नीति गेली;
नीतिविना गति गेली;
गतिविना वित्त गेले;
वित्ताविना शूद्र खचले;
इतके अनर्थ एका अविद्येने केले

हे महात्मा जोतीराव फुले यांनी लिहून ठेवलेले सत्य समाजोद्धारक आहे. एकीकडे जगाचा अन्नदाता म्हणून शेतकऱ्यांचा उदो उदो केला जातो. दुसरीकडे फक्त 'रानगड्ये' समजून त्यांना 'अडाणी' नसतानाही 'अडाणी' म्हटले जायचे, ही वस्तुस्थिती जाणून शेतकऱ्यांचे शिक्षण जीवनोद्धारक केले ते महात्मा फुलेंनी ! महात्मा जोतीराव फुले यांचा 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ कालातीत आहे आणि म्हणूनच चाटोरी, ता. पालम, जि. परभणी येथे 'ग्रामजागर साहित्य संमेलन- २०२६' मध्ये महात्मा जोतीराव फुले यांच्या २०० व्या जन्मशताब्दीच्या

निमित्ताने त्यांच्या विचारांची कृतज्ञता म्हणून 'शेतकऱ्याचा आसूड व आजचा शेतकरी' या विषयावर ठेवलेला परिसंवाद महत्त्वाचा आहे. सर्वप्रथम महात्मा फुले यांनी १८ जुलै १८८३ रोजी 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात खेडे, शेतकरी, शेतीतील प्रश्न, शेतकऱ्यांची दुःखं मांडून, त्यांचा निपटारा करण्यासाठी, ग्रामीण भारताचा विकास करण्यासाठी जे काही प्रतिपादन केलेले आहे, ते शेतकऱ्यांसाठी जीवनदायी आहे. शेतीमध्ये अनेक संकटे आहेत. त्याकाळी दुष्काळामुळे आणि नव्या शेतसारा पद्धतीमुळे शेती तोट्याची झालेली होतीच. शेतकरी कर्जबाजारी झालेले होते. शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांकडे जात होत्या. सावकार शेतकऱ्यांच्या जमिनी हडपू लागले. याची दखल घेऊन, विचारविनिमय करून १८७९ मध्ये जमिनीचे हे हस्तांतर थांबविण्यासाठी इंग्रज सरकारने 'डेक्कन ॲग्रिकल्चरल रीलिफ ॲक्ट' मंजूर केला. हा कायदा शेतकऱ्यांसाठी उपयोगाचा होता. पण त्या काळातील पुढाऱ्यांनी सावकारांचीच बाजू घेतली. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची बाजू घेतली. कर्जबाजारी शेतकरी भूमिहीन होऊ नये म्हणून त्यांनी तत्कालीन पुढाऱ्यांवर कडाडून आसूड ओढला.

त्यांच्या धारदार आणि टोकदार विचारांनी समाज बदलायला सुरुवात झाली. शोषणाचे 'कडे' तुटले. महात्मा फुले यांच्याच भाषेत सांगायचे झाल्यास, ज्यांनी 'मतलबी धर्माचे लिगाड' शेतकऱ्यांच्या मागे लावून शेतकऱ्यांच्या शोषणाचा मार्ग अवलंबिला होता, त्यांचा मार्गच महात्मा फुले यांच्या विचारांमुळे बंद झाला. इंग्रजी सत्तेची फळे चाखत आपल्या मनाप्रमाणे आपल्या इथली अधिकारशाही शेतकऱ्यांना छळत होती, तेव्हा 'उंटावरून शेळ्या हाकी सरकार शहाणे' असे इंग्रजांना महात्मा फुले यांनी ठणकावून सांगितलेले होते. अन्यायशाहीचा बंदोबस्त महात्मा फुले यांचे विचार स्वीकारून शेतकऱ्यांनीच केला. त्या काळातील नोकरदारांच्या बेबंदशाहीला लगाम घालण्याचे काम महात्मा फुले यांनी करून ठेवले.

शेतकरी कुटुंबातील बालविवाहाची नोंद सुद्धा महात्मा

फुले यांनी करून ठेवलेली आहे. आज आपल्या महाराष्ट्रातील परभणी जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण ४८ टक्के असल्याचे सरकारी आकडेवारी सांगते. महाराष्ट्रातील इतर



जिल्ह्यांमध्येही या बालविवाहाचे प्रमाण आहेच. त्यामुळे महात्मा फुले यांचे बालविवाहाच्या संदर्भात आणि शेतकऱ्यांच्या मुलांच्या विवाहाच्या संदर्भात जे विचार आहेत ते नव्याने परत ध्यानात घेण्यासारखे आहेत. महात्मा फुले यांचे म्हणणे होते, की बालविवाहासारख्या घटना टाळून सामाजिक अभ्युदयासाठी लोकांनी नैतिकता पाळली पाहिजे. 'नैतिक आचरणावर लक्ष ठेवण्यासाठी डॉक्टरांच्या नेमणुका सरकारने कराव्यात', हा उपाय त्यांनी सुचविलेला आहे. बहुजन समाजातून शिक्षक निर्माण करून त्यांना (बहुजनांना) शिक्षण द्यावे. सरकारातील जागांवर बहुजन समाजातून माणसे घ्यावीत. व्यापाऱ्याच्या कुजक्या मालावर नजर ठेवावी. शेतीत सुधारणा करण्यासाठी शेतीसंबंधीचे अत्याधुनिक ज्ञान शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. त्यासंबंधीचे ग्रंथ शेतकऱ्यांना उपलब्ध झाले पाहिजेत. उत्तम बैल शेतकऱ्यांना असावेत. जनावरांसाठी जंगले मोकळी राहिली पाहिजेत. वाहणाऱ्या पाण्याला पोलिस व सैन्यमार्फत बंधारे घातले पाहिजेत. ठिकठिकाणी असणाऱ्या पाण्याचा शोध घेतला पाहिजे. पिकांचे संरक्षण होण्यासाठी पिकांवर पहारे बसविले पाहिजेत. शेतकऱ्यांना कष्टाचे योग्य श्रममूल्य मिळाले पाहिजे', अशा महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या संदर्भात केलेल्या अनेक सूचना आजही महत्त्वाच्या वाटतात.

शेतकऱ्याला सगळेच पोळवतात. आपल्या 'ग्रामजागर साहित्य संमेलन-२०२६'चे संमेलनाध्यक्ष कवी इंद्रजित भालेराव यांनी सुद्धा त्यांच्या कवितेत सांगितलेले आहे की

माझा बाप शेतकरी, उभ्या जगाचा पोशिंदा
त्याच्या भाळी लिहिलेला, रात दिस कामधंदा
'काबाडाचे धनी' असलेल्या शेतकऱ्यांना किती काळ पोळवायचे ?
'कष्ट सारे त्याच्या हाती, दुसऱ्याच्या हाती माप'

शेतकऱ्यांच्या बाबतीत हे असे का? असा कवी इंद्रजित भालेराव यांनी विचारलेला प्रश्न महात्मा फुले यांच्या विचारांशी बांधिलकी जपणारा आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाच्या मापात कारखानदारांनी आणि व्यापाऱ्यांनी पाप करू नये. आता तर निसर्गही दुष्काळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना लई पोळवत आहे. व्यवस्थेने आणि सरकारने शेतकऱ्यांप्रति ति-हाईताची भाषा न बोलता पोटतिडकीने शेतकऱ्यांच्या गरजा जाणून घेतल्या पाहिजेत. शेतकऱ्यांच्या कष्टाचा मोबदला आणि उत्पादित केलेल्या शेतीमालाला हमीभाव मिळाला पाहिजे. सरकारने समभावाने शेतकऱ्यांशी वागले पाहिजे. महात्मा फुले या महामानवाने शेतकऱ्यांचा दाखवून दिलेला 'आक्रोश' विचारकृतीने कमी केला पाहिजे. पूर्वीचा 'शेतकऱ्याचा असूड' आता वेळोवेळी 'शेतकरी आंदोलन असूड'मधून उमटतोय. तो आपल्या कृषिप्रधान भारत देशाला नकोय. महात्मा जोतीराव फुले यांना विनम्र अभिवादन.

अरुण चव्हाळ
७७७५८४१४२४
(लेखक रानमेवा शेती साहित्य मंडळाचे अध्यक्ष आहेत.)

महाराष्ट्रातील प्रमुख शहरात प्रदूषणाचा धोका

आजकाल शहरात रस्त्यावरून फिरताना अंधुक धुराचे वलय, धूसर वातावरण रस्त्यावरील बेसुमार धूळ तसेच धुळीमुळे पसरणारी धुरकट हवा याचा सामना आपणास करावा लागतो. हवेत तरंगणारे सूक्ष्म धुलीकण श्वासाद्वारे फुफुसात प्रवेश करतात ते फुफुसाची कार्यक्षमता कमी करतात. यामुळे खोकला, सूज, कफ इत्यादी विकार जडतात. यामुळे अलीकडच्या काळात क्रॉनिक ब्रॉंकायटिस चा धोका संभवतो . प्रदूषणाचा दिर्घकालीन संपर्क अनेक रोगांना आमंत्रण देतो . दिल्ली शहरात प्रदूषणाचा स्तर अतिशय मोठा असल्यामुळे तेथे प्रदूषणाची समस्या मोठी आहे . अशीच परिस्थिती मुंबई , बेंगळुरू हैद्राबाद शहरांची आहे . आता प्रदूषणाचे लोण पुणे व पिंपरी चिंचवड पर्यंत आले आहे . खोकला तसेच कफ या रोगाचे रुग्ण वाढत चालले असल्याचे चित्र उभे आहे . वेळीच यावर नियंत्रण आणले पाहिजे . नाहीतर भविष्यात अत्यंत अवघड परिस्थिती उद्भवणार आहे . भविष्य काळात आपणास शुद्ध हवेची व्यवस्था करावी लागेल . फटाक्याचा वापर कमी व्हावयास हवा . वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात व्हावयास हवी . हवे प्रमाणेच नद्या सुद्धा प्रदूषित झाल्या आहेत . साहजिकच हवा व पाणी यांचे मोठे संकट आपणापुढे उभे आहे . याची गंभीरता अजून आपल्या लक्षात आली नसल्याचे चित्र आहे . हे असेच चालू राहिल्यास पर्यावरणाचे मोठे संकट उभे राहणार आहे .

शांताराम वाघ

दुष्काळाची दाहकता आणि समाजमाध्यमांचे वास्तव

सध्या समाजमाध्यमांवर राजस्थान मधील सिरोही जिल्ह्यातील एका आंदोलनाची चित्रफीत मोठ्या प्रमाणावर प्रसारित होत असून त्यावरून देशभरात तीव्र भावनिक प्रतिक्रिया उमटत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जमा झालेल्या शेकडो गायी आणि हतबल पशुपालकांचे दृश्य पाहून अनेकांनी प्रशासनावर व राजकीय नेतृत्वावर टीकेची झोड उठवली आहे. या प्रसारित संदेशांमध्ये अनेकदा कोणत्याही एका गौशाळेतील गैरव्यवस्थेचा आरोप करत गायींच्या दयनीय अवस्थेचे चित्र रंगवले जात आहे. परंतु, या घटनेचा सखोल अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, समाजमाध्यमांवर दिसणारे अर्धवट चित्र आणि प्रत्यक्ष जमिनीवरील वास्तव यामध्ये मोठी तफावत आहे. ही घटना कोणत्याही एका संस्थेच्या हलगर्जीपणाची नसून, निसर्गाच्या अवकृपेमुळे निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी संकटाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वाच्या लढाईचा आविष्कार आहे.

या संवेदनशील घटनेची प्रत्यक्ष सुरुवात २३ आणि २४ नोव्हेंबर २०२६ रोजी राजस्थानमधील सिरोही येथे झाली. सिरोही-शिवगंज विधानसभा क्षेत्रातील गोल मांडवा, माकरोडा, पालडी यांसह परिसरातील अनेक गावांतील पशुपालकांचा संयम अखेरीस सुटला. गेल्या अनेक दिवसांपासून जनावरांसाठी पुरेसा चारा



आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला होता. पशुधन जगवण्यासाठी हतबल झालेल्या या ग्रामस्थांनी सुमारे ७०० ते ८०० गायींना सोबत घेत थेट सिरोही जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. या आंदोलनाचे सर्वात लक्षवेधी वैशिष्ट्य म्हणजे पशुपालकांनी 'गौमातेच्या वतीने' जिल्हा प्रशासनाला सादर केलेले भावनिक निवेदन. त्यामध्ये 'आम्हाला भाषण नको, चारा हवा; आश्वासन नको, पाणी हवे' अशी काळजाला भिडणारी मागणी करण्यात आली होती. जिल्ह्यात तातडीने चारा-पाण्याची व्यवस्था करणे आणि सिरोही जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करणे, या दोन प्रमुख मागण्यांसाठी हा अभूतपूर्व आक्रोश करण्यात आला होता.

या आंदोलनाच्या मुळाशी जाऊन पाहिल्यास २०२६ च्या खरीप हंगामातील निसर्गाचा लहरीपणा प्रकर्षाने समोर येतो. संपूर्ण राजस्थान राज्यात यंदा सरासरीपेक्षा सुमारे २० टक्के कमी पाऊस झाल्यामुळे शेती आणि पशुपालन व्यवसायावर मोठे संकट कोसळले आहे. अपुऱ्या पावसामुळे शेतातील पिके हातातून गेली असून जनावरांना खाण्यासाठी आवश्यक असणारा हिरवा आणि सुका चारा पूर्णपणे संपुष्टात आला आहे. या गंभीर परिस्थितीची दाहकता इतकी मोठी आहे की, यापूर्वीच राज्यातील १५ जिल्ह्यांतील ८७ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले आहेत.

सिरोहीतील या संपूर्ण घटनाक्रमातून दोन महत्त्वाचे धडे समोर येतात. पहिला म्हणजे, समाजमाध्यमांवरील एखादी भावनिक चित्रफीत जमिनीवरील संकटाची तीव्रता जगासमोर आणण्याचे काम निश्चितच करते, परंतु त्यातील अपूर्ण संदर्भामुळे अनेकदा मूळ समस्येऐवजी चुकीच्या राजकीय किंवा सामाजिक चर्चा रंगतात. दुसरा आणि सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे, हवामान बदलाच्या काळात दुष्काळ निवारणासाठी कायमस्वरूपी आणि वेगवान यंत्रणेची असलेली नितांत गरज. सरकारी घोषणा आणि अधिसूचना केवळ कागदावर न राहता, ग्रामपंचायत स्तरावर चारा-पाण्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती वेगाने होते, यावरच या पशुपालकांचे आणि त्यांच्या मुक्या जनावरांचे भवितव्य अवलंबून आहे.

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,
वर्धा
मो. ९५६१५९४३०६

संधीचे सोने करा

माझेही मत

काल परशुराम आर्थिक विकास महामंडळ यांचे शिबीर जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथील नियोजन भावनात पार पडले. हिंदी भाषिक आणि महाराष्ट्रीयन असे एकूण फक्त ४० सदस्य सदर कार्यक्रमाला उपस्थित होते. ब्राह्मण समाजातील मुलांना व्यवसाय करायचा असल्यास त्यांना व्याजावरचा परतावा कसा मिळू शकतो, त्याच्यासाठी तुम्ही कोणत्या प्रकारे लोन केस करायला हवी आणि कोणाकडून कोणकोणती कागदपत्र जमा करायला हवीत याबद्दल त्यांनी जुजबी माहिती दिली. सदर कार्यक्रमाला खरं म्हणजे ब्राह्मण तरुणांनी येणे अपेक्षित होते पण या ग्रुप वरती वारंवार मेसेज टाकून एखाद दुसराच तरुण वर्ग उपस्थित होता याची खंत वाटते. माननीय अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांनी आपल्या समाजासाठी बरेच प्रयत्न करून हे महामंडळ मिळवून दिलेले आहे. श्री. दामले यांना मंत्रिपदाचा दर्जा आहे हे आपल्यासाठी महत्वाचे आहे. आता तरी मुलांनी व्यवसायावर भर देऊन या आर्थिक योजनेचा आपल्याला कसा लाभ मिळेल याच्यासाठी प्रयत्न करावा असे वाटते. तसेच तिथे श्री. दामले यांच्या सोबत उपस्थित असलेल्या ब्राह्मण समाजातील अधिकाऱ्यांनी बरीच मदत करण्याची तयारी दर्शवलेली आहे. निदान माहिती घ्यायला तरी यायला हवे होते असे वाटते. इतक्या कमी उपस्थिती मुळे खरंच ब्राह्मण समाजाला अशा गोष्टींची आवश्यकता आहे का हा प्रश्न पडतो? जर या एक वर्षामध्ये किमान हजार अर्ज प्राप्त होऊन ते लोनच्या स्वरूपामध्ये परावर्तित होणे गरजेचे आहे, नाहीतर या विकास महामंडळाला टाळे लागण्याची शक्यता सुद्धा वाटते असे विचार त्यांनी मांडले. त्यामुळे याचा आपण फायदा नक्कीच घ्यायला हवा. आपल्याला काहीही अडचण असेल तर ते मदत देऊ शकतात. आपला समाज हा तसा कर्ज घेण्याच्या मानसिकतेत नसतो, परंतु आजच्या जगात कर्जाशिवाय आपण तग धरणे शक्य नसते. तरी निःशंकोचपणे कर्ज घ्यावे, मेहनत करून व्यवसाय करावा कर्जाची परतफेड करून आणि व्याज परताव्याचा फायदा घेतलाच पाहिजे. सरकारी आपल्यासाठी काहीही करत नाही असे आता तरी आपण म्हणू शकत नाही असे वाटते. तरी आपल्या तरुण व्यवसाय करणाऱ्या तरुणांना आग्रहाची विनंती आहे की, आपण या संधीचे सोने करावे.

प्रसाद खरे

शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

भुसार बाजारपेठेत महसूल बुडवेगिरीचा संशय, 'सुनामी कापसा'चा काळाबाजार चर्चेत!

शेतकऱ्यांची 'धारा कट्टी'च्या नावाखालीही लूट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

फुलसावंगी, दि. २७ : उमरखेड तालुक्यातील मोठी बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फुलसावंगीतील भुसार व्यापाऱ्यांच्या व्यवहारांवरून गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. सुमारे २५ ते ३० बड्या व्यापाऱ्यांकडून कापूस, तूर, सोयाबीन, चणा व तीळ यांची कोट्यवधींची उलाढाल होत असताना, व्यावसायिक वापर सुरू असलेले अनेक भूखंड मूळतः रहिवासी प्रयोजनासाठी मंजूर असल्याचा आरोप आहे.



त्यामुळे भूखंडांच्या वापरातील नियमभंग आणि शासनाच्या महसुलाचे नेमके काय, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, मागील २० वर्षांपासून संबंधित कर व महसूल थकित असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. हा आरोप खरा असल्यास शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, याबाबत अधिकृत तपासणी आणि थकबाकीची निश्चित आकडेवारी अद्याप समोर आलेली नाही. दुसरीकडे, आदिलाबाद परिसरातून आणला जाणारा निकृष्ट काळा कापूस चांगल्या प्रतीच्या कापसात मिसळून, कथित द्रावणाची फवारणी करून त्याला पांढरा रंग व झळाळी दिली जात असल्याची माहिती चर्चेत आहे. हा माल मिलमध्ये विकला जात असल्याचा आरोप असून, कापसाच्या दर्जाबाबत स्वतंत्र तपासणी होणे आवश्यक आहे.

'धारा कट्टी'च्या नावाखाली शेतकऱ्यांची कपात!

प्रति क्विंटल १ किलो ४०० ग्रॅम कट्टी घेतली जात असल्याचा आरोप शेतकरी देवानंद व्हडगीरे यांनी केला आहे. ही कपात तातडीने बंद न झाल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र उपोषण छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. उमरखेडचे उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी या प्रकरणाची दखल घेऊन व्यापाऱ्यांच्या भूखंडांचा वापर, कर आकारणी, कापसाचा दर्जा आणि वजनकाट्यांची तपासणी करावी. केवळ आरोपांपुरते प्रकरण मर्यादित न ठेवता चौकशीत दोष सिद्ध झाल्यास नियमानुसार कारवाई व थकीत महसूल वसूल करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

वजनकाट्यावर संशय, भरारी पथकाकडून सर्व वजन काट्याची पडताळणी..!

नॅचरल शुगरच्या तपासणीत तफावत नाही.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. २७ : गुंज-सवना येथील नॅचरल शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीज लिमिटेड, युनिट क्रमांक २ मधील ऊस वजन प्रक्रियेची शासनाच्या आदेशानुसार २६ नोव्हेंबर रोजी भरारी पथकाने तपासणी केली. कारखान्यातील सर्व वजनकाट्यांची तपासणी आणि ऊस वाहतूक वाहनांचे दुबार वजन करून पडताळणी करण्यात आली.

या संपूर्ण तपासणीत वजनामध्ये कोणतीही तफावत अथवा अनियमितता आढळून आली नसल्याची माहिती समोर आली आहे. साखर कारखान्यांमधील ऊस वजन हा शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताशी निगडित आणि संवेदनशील विषय असतो. त्यामुळे वजनकाट्यांच्या



अचूकतेबाबत पारदर्शकता असणे महत्त्वाचे आहे. याच पार्श्वभूमीवर भरारी पथकाने कारखान्यातील सर्व वजनकाट्यांची प्रत्यक्ष तपासणी केली. तसेच ऊस घेऊन आलेल्या वाहनांचे पुन्हा वजन करून आधीच्या वजनाशी पडताळणी करण्यात आली. या प्रक्रियेत कोणताही फरक आढळला नसल्याचे तपासणीत स्पष्ट झाले. या तपासणीवेळी तहसीलदार अभय मस्के, वैधमापनशास्त्र निरीक्षक एस. जी. घुमाळ (उमरखेड), साखर विभागाचे लेखापरीक्षक श्रेणी-१ जी. एस. गोगे, महागाव पोलीस ठाण्याचे कैलास नामदेव मुकाडे, शेतकरी प्रतिनिधी गोविंद आनंदाराव सरोशे, प्रदीप प्रकाश सुर्वे, पवार तसेच ऊस वाहतूक वाहनांचे चालक उपस्थित होते. भरारी पथकाच्या या पडताळणीत वजनकाटे योग्य असल्याचे निष्पन्न झाले असले, तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वास कायम राखण्यासाठी अशा तपासण्या नियमित आणि पारदर्शकपणे होणे गरजेचे आहे. कारण वजनातील प्रत्येक किलोचा संबंध थेट शेतकऱ्यांच्या उत्पन्नाशी आहे.

थोडक्यात



राजीव महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे सामूहिक वाचन..!

अधिकारांसोबत कर्तव्यांचीही जाणीव

झरी : राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, झरी-जामणी येथे २६ नोव्हेंबर रोजी सांस्कृतिक समितीच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून लोकशाही मूल्यांप्रती बांधिलकी व्यक्त केली. प्रमुख वक्ते प्रा. प्रणव भोयर यांनी संविधानाची निर्मिती, नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. आर. एन. देशमुख यांनी संविधान हा देशाचा आत्मा असून, केवळ अधिकारांची जाणीव पुरेशी नसून कर्तव्यांचे पालनही तितकेच आवश्यक असल्याचे सांगितले. संविधानातील मूल्ये प्रत्यक्ष आचरणात आणण्याचे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. आस्तिक गोवारकर यांनी केले. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिवंगत लोकनेते देवराव पाटील चोंढीकर स्मृतीदिनानिमित्त व्याख्यान पुष्प

श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद व विदर्भ साहित्य संघ शाखा पुसद च्या वतीने आयोजन!

पुसद : श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद व विदर्भ साहित्य संघ शाखा पुसद यांच्या संयुक्त विद्यमाने यवतमाळ जिल्हा परिषदेचे प्रथम अध्यक्ष माजी आमदार तथा श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद चे संस्थापक अध्यक्ष दिवंगत लोकनेते देवराव पाटील चोंढीकर यांच्या ४० व्या स्मृतिदिनानिमित्त व्याख्यानपुष्पाचे आयोजन सोमवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ ला सायंकाळी ६:३० वाजता श्री शिवाजी विद्यालयाच्या देवराव पाटील चोंढीकर सभागृहात करण्यात आले आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचा सामाजिक समन्वय या विषयावर प्रसिद्ध व्याख्याते,व्यासंगी वक्ते तथा इतिहासाचे गाढे अभ्यासक यवतमाळ येथील प्रवीण विनायकराव देशमुख हे व्याख्यान पुष्प गुंफणार आहेत. अविरत चालणाऱ्या व्याख्यान पुष्पाचे हे ३९ वे वर्ष आहे. पुसद शहर व परिसरातील रसिक श्रोते बंधू भगिनी यांनी या आत्यंतिक जिव्हाळ्याच्या विषयावरील अभ्यासपूर्ण व सुश्राव्य अशा व्याख्यानाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद चे अध्यक्ष अनिरुद्ध विजयराव पाटील चोंढीकर,विदर्भ साहित्य संघ पुसद चे अध्यक्ष डॉ.गणेश पाटील, कार्याध्यक्ष दीपक आसेगावकर, सचिव सुधाकर ठाकरे, कोषाध्यक्ष प्रा.गोविंद फुके यांनी केले आहे.



क्रांतिवीर शामादादा कोलाम यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा फलकाचे अनावरण!

घाटंजी : शहरात आदिम जमातीचे महान क्रांतिकारक, विदर्भाचे रॉबिनहूड,क्रांतिवीर शामादादा कोलाम यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचा फलक अनावरण सोहळा मोठ्या उत्साहात आमदार प्रा. राजू तोडसाम व समाजबांधवांच्या उपस्थितीत पार पडला. प्रतिमा फलकांचे अनावरण आ.प्रा. राजू तोडसाम आमदार आर्णी विधानसभा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. होमदेव किनाके (सामाजिक कार्यकर्ते, घाटंजी), विजय बैस (भाजपा ता.अध्यक्ष, घाटंजी), बंडूभाऊ तोडसाम (आदिवासी टायगर सेना जिल्हाध्यक्ष),अंबादास मेश्राम युवा जिल्हाध्यक्ष आदिवासी टायगर सेना,योगिता तोडसाम,संध्या मरापे, बुधाराम दडांजे, युवराज मरापे, हरिभाऊ पेंदोर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच या प्रसंगी उपस्थित समाजबांधवांमध्ये रंजनाताई बोबडे (चांदेकर) (कृषी अधिकारी, घाटंजी), संदीप कोवे (आदिम जमात कोलाम संघ, घाटंजी तथा जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा), दिनेश वाघदरे,राहुल वडदे, दामेकर,अर्जुन आत्राम, बाळू कासार,अक्षय आत्राम,रामलाल सुटकर, रजनी कोवे,कविता आत्राम, जोस्ना वाघदरे,अतुल आत्राम, राहुल चिचघाटे, शालिक आत्राम, विठ्ठल बोरकर, स्वप्नील मोकाशे, पवन आत्राम, शिवानी आत्रामजी, नरेश मेश्राम आदींची उपस्थिती होती. क्रांतिवीर शामादादा कोलाम यांचे जीवन, संघर्ष आणि समाजासाठी केलेले कार्य हे संपूर्ण आदिम कोलाम समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मृती जतन करण्याच्या आणि पुढील पिढीपर्यंत त्यांचे विचार पोहोचविण्याच्या उद्देशाने हा फलक उभारण्यात आला.

शिक्षणासाठी विद्यार्थिनींचा एसटी थांब्या करिता रास्ता रोको!

व्हिडिओ कॉलद्वारे पालकमंत्र्यांची मध्यस्थी बससेवा तातडीने मार्गी लावण्याच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २७ : शहरापासून अवघ्या सात किलोमीटर अंतरावर असलेल्या किन्ही गावातील विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी एसटी बसची प्रतीक्षा करूनही बस मिळत नसल्याने शुक्रवारी सकाळी संतप्त विद्यार्थिनी आणि ग्रामस्थांनी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले.

गावात एसटी बस थांबा सुरू करावा आणि बससेवा नियमित करावी, या मागणीसाठी करण्यात आलेल्या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प होऊन जड वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. किन्ही गावातील राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक वर्षांपासून रखडले असून



गावाला जोडणारे रस्तेही अपूर्ण आहेत. त्यामुळे एसटी बसेस गावात येत नसल्याने विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. सकाळी १० वाजताच बसथांब्यावर पोहोचूनही बस थांबत नसल्याने शाळेत पोहोचण्यास उशीर होतो. परिणामी महत्त्वाच्या तासिका बुडत असल्याची व्यथा आंबेकर कन्या शाळेतील विद्यार्थिनी पूनम ज्ञानेश्वर नाटकर हिने मांडली. माजी सरपंच प्रमोद नाटकर यांनीही गावाच्या रस्त्यांची समस्या प्रशासनासमोर मांडली. दरम्यान, आंदोलनाची माहिती मिळताच पालकमंत्री संजय राठोड यांनी व्हिडिओ कॉल द्वारे विद्यार्थिनी आणि ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. एसटी महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून बससेवेचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश देणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. पालकमंत्र्यांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन तूर्त स्थगित करण्यात आले. मात्र, एसटी बससेवा प्रत्यक्षात सुरू होऊन विद्यार्थिनींचा शैक्षणिक प्रवास सुकर होणार का, याकडे किन्ही ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळातही अवैध धंद्यांना सुगीचे दिवस

शहरात रस्त्याच्या कडेला अवैध दारूची खुलेआम विक्री आर्णी पोलीस यंत्रणा कुचकामी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

आर्णी, दि. २७ : ऐन दुष्काळात आर्णी तालुक्यात अवैध धंद्यांना सुगीचे दिवस आल्याने नवल व्यक्त करण्यात येत आहे. आर्णी पोलीस यंत्रणा मात्र अवैध धंद्यांना रोखण्यात सपशेल अपयशी ठरत असल्याची बोंबाबोंब तालुक्यातील नागरिकांतून उठत असल्याचे दिसून येत आहे.

मग आर्णी पोलिस यंत्रणा कशात व्यस्त आहे? असा प्रश्न तालुक्यातील नागरिक विचारत आहेत. आर्णी शहरातील व्यापारपेठेत मुख्य रस्त्याच्या दुतर्फा सोडा व लिंबू शरबत च्या नावाखाली खुलेआम बेधडक अवैध दारूची विक्री होत असल्याने नवयुवक व्यसनाच्या आहारी जाऊ लागल्याचे दिसून येत असल्याने तालुक्यातील पालकांना काळजी वाटू लागली असल्याचे बोलल्या जात आहे. दारूच्या अवैध व्यवसायाची जोरदार चर्चा सर्वश्रुत झाली असून, या प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अवैध धंदे सुरू असल्याच्या नागरिकांच्या चर्चानंतरही संबंधित पोलिस यंत्रणा नेमकी काय भूमिका घेत आहे, असा सवाल आता उपस्थित होत आहे. या परिसरातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी पोलीस प्रशासन,तथा यंत्रणेची असतांना हे धंदे सुरूच कसे राहतात? कारवाई होत नसेल तर त्यामागचे कारण काय? तसेच संबंधित बीट जमादारांच्या कार्यपद्धतीची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासणी होणार का, असे प्रश्न नागरिक विचारत आहेत. दरम्यान, अवैध धंदे आणि स्थानिक पोलीस यंत्रणा यांच्यात काही 'अर्थपूर्ण संबंध' आहेत का? असा गंभीर संशय काही सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे, त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी आता होत आहे. आर्णी सर्कलमधील वरली मटका, अवैध दारू व इतर कथित अवैध धंद्यांची स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार का? संबंधित बीट जमादारांच्या कार्यपद्धतीची तपासणी होणार का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उपविभागीय पोलिस अधिकारी या गंभीर प्रकाराची दखल घेऊन आर्णी सर्कलमध्ये पाहणी करून कारवाई करणार का? या प्रश्नांची उत्तरे आता नागरिकांना वरिष्ठ पोलीस प्रशासनाकडून अपेक्षित आहेत.

निविदेच्या शेवटच्या दिवशी नियम बदलण्याची घाई कशासाठी?

'टेंडर मॅनेज'च्या संशयाने नगरपालिका प्रशासन घेरले!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २७ : नगर परिषद यवतमाळच्या उद्यानांच्या देखभाल, दुरुस्ती व सुशोभीकरणाच्या निविदा प्रक्रियेत ऐनवेळी करण्यात आलेल्या नियम बदलामुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत असतानाच अचानक शुद्धिपत्रक काढून तांत्रिक अटी व पात्रतेचे निकष बदलण्यात आल्याने हा प्रकार नेमका कोणाच्या हितासाठी करण्यात आला, असा सवाल उपस्थित होत आहे. नगरपालिका कर्मचारी आणि नगरसेवकामध्ये ही या प्रक्रियेच्या हेतूबाबत उलटसुलट चर्चा सुरू असल्याची माहिती आहे. सार्वजनिक निधीतून होणाऱ्या कामांच्या निविदेत सर्व इच्छुक कंत्राटदारांना



समान संधी मिळणे अपेक्षित असताना अखेरच्या दिवशी अटी बदलण्याची घाई का करण्यात आली? या बदलांची आवश्यकता नेमकी काय होती? त्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात आली होती का? आणि नव्या अटींचा लाभ नेमका कोणाला होणार आहे? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. ऐनवेळी झालेल्या बदलांमुळे इतर इच्छुक कंत्राटदारांच्या स्पर्धात्मक संधीवर परिणाम होण्याची शक्यता असून, विशिष्ट कंत्राटदाराला अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न झाला का, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. शुद्धिपत्रक काढण्यामागील कारणे, तांत्रिक अभिप्राय, मंजुरी आणि संपूर्ण फाईल नोटिंग सार्वजनिक करण्याची मागणी होत आहे. मुख्याधिकारी आणि नियोजन विभागाने घेतलेल्या निर्णयांचीही जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. चौकशी होईपर्यंत निविदा प्रक्रिया स्थगित ठेवून सर्वांना समान संधी मिळण्यासाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी होत आहे. अखेर प्रश्न उद्यानांच्या कंत्राटाचा नसून जनतेच्या पैशांच्या विनियोगाचा आहे. नियम सर्वांसाठी समान आहेत की काहींच्या सोयीसाठी बदलले जातात, याचे उत्तर प्रशासनाने कागदपत्रांसह द्यावे.

परमेश्वर माध्यमिक विद्यालय लोहरा (ई.) येथे संविधान दिनानिमित्त रॅलीचे आयोजन!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. २७ : येथील युवक मंडळ द्वारा संचालित,परमेश्वर माध्यमिक विद्यालय लोहरा (ई) येथे संविधान दिनानिमित्त, संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत विद्यार्थ्यांनी,भारतीय संविधान हातात घेऊन, संविधानाबाबत,जनजागृती केली.संविधाना संबंधी विविध घोषणा देत गावातील परिसर दणाणून सोडला होता. त्यात, "संविधान दिन, चिरायू हो", कोण घडवते देश महान? भारतीय संविधान ! कशाचा करू सन्मान? भारतीय संविधान ! न्याय, समता, बंधुता - भारताची खरी एकता ! भारतीय संविधानाचा- विजय असो ! संविधान आमचा अभिमान-



भारत देश आमची शान ! ए. व्हि.राठोड यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार - डॉ.बाबासाहेब आंबेडकर ! संविधानावर प्रकाश टाकला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो,अशा आकर्षक घोषणा देत सदर रॅली संपन्न झाली. संविधान दिनानिमित्त आयोजित शालेय कार्यक्रमात , भारतीय संविधानाच्या शिल्पकाराला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यात विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानावर व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी भाषणे आणि गीते सादर केलीत. त्यानंतर मंत्र्यांच्या सुखसोयींसाठी लाखोंचा खर्च करण्याची तयारी कशी होते? असा सवाल करत त्यांनी सरकारच्या दुटप्पी खर्चनीतीवर टीका केली. हॉटेल मुक्कामासाठी किती मंत्री राहणार, एकूण किती खर्च होणार आणि हा खर्च सरकारी तिजोरीतून होणार की वैयक्तिक स्वरूपात, याचा तपशील सरकारने जाहीर करावा, अशी मागणी बुर्रेवार यांनी केली. शेतकऱ्यांच्या घामाची किंमत पाच हजार आणि सत्ताधाऱ्यांच्या आरामासाठी लाखो रुपये, हा कोणता न्याय? असा सवाल उपस्थित करत अनावश्यक खर्च टाळून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देण्याची मागणी त्यांनी केली.

सेतू केंद्रात 'जीव्हीपी'कडे नागरिकांची गैरसोय, कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २७ : यवतमाळ जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्रांचे कंत्राट 'जीव्हीपी' (GVP) कंपनीकडे सोपविल्यानंतर शासकीय नागरी सेवांचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. पूर्वी सुरळीत सुरू असलेली सेतू केंद्रे नवीन निविदा प्रक्रियेनंतर बंद पडली असून, नियोजनाअभावी नागरिकांची गैरसोय आणि जुन्या कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची वेळ आली आहे. कंत्राटदार बदलला; मात्र नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांचा दर्जा सुधारण्याऐवजी प्रश्न अधिकच गंभीर झाले आहेत.

नवीन कंपनीने आवश्यक मनुष्यबळ आणि पूर्वतयारीची व्यवस्था न करताच कामकाज सुरू केल्याचे चित्र आहे. जुन्या व्यवस्थेतील अनेक अनुभवी कर्मचाऱ्यांनी नवीन कंपनीत काम करण्यास नकार दिल्याने त्यांच्यावर रोजगार गमावण्याची वेळ आली. दुसरीकडे, काही कर्मचारी घेऊन सुरू केलेली केंद्रेही अद्याप बंद असल्याने नागरिकांना दाखले आणि विविध शासकीय कागदपत्रांसाठी वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी कार्यालयाने सुमारे १५ ते २० दिवसांपूर्वी कंपनीकडून खुलासा मागविला होता. मात्र, अद्याप ठोस उत्तर मिळाले नसल्याची माहिती आहे. प्रशासनाच्या नोटिशीलाही कंपनी प्रतिसाद देत नसेल, तर कंत्राटातील अटींची अंमलबजावणी कोण करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, सेतू केंद्रांवरील शुल्क ऑनलाइन स्वीकारण्याच्या पारदर्शक व्यवस्थेऐवजी काही ठिकाणी रोख रक्कम आकारली जात असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. यापूर्वी 'रिद्धी कॉर्पोरेट सर्व्हिसेस'कडे असलेल्या १८ केंद्रांमध्ये ऑनलाइन व्यवहार होत होते. राळेगाव येथील आदर्श सेतू केंद्राच्या उद्घाटना वेळी तत्कालीन जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनीही या पारदर्शक व्यवस्थेचे कौतुक केले होते. कंत्राटदाराच्या सोयीपेक्षा नागरिकांची सेवा महत्त्वाची नाही का? बंद केंद्रे तातडीने सुरू करणे, मनुष्यबळ व ऑनलाइन शुल्क व्यवस्थेची तपासणी करणे आणि अटींचे उल्लंघन झाल्यास कारवाई करणे, ही प्रशासनाची जबाबदारी आहे. अन्यथा, कंत्राट बदलले; पण नागरिकांच्या अडचणी कायम, अशीच परिस्थिती राहणार आहे.

शेतकऱ्यांना पाच हजार, मंत्र्यांच्या मुक्कामासाठी लाखोंची उधळपट्टी का? सरकारने जनतेला हिशेब द्यावा!

शासकीय निवासव्यवस्था असताना पंचतारांकित हॉटेलचा अट्टहास कशासाठी? संदीप बुर्रेवार यांचा भाजप सरकारला सवाल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि. २७ : राज्यातील शेतकरी दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि कर्जबाजारीपणामुळे आर्थिक संकटात सापडला असताना सरकारच्या खर्चाच्या प्राधान्यक्रमावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

शेतकऱ्यांना केवळ पाच हजार रुपयांची अग्रिम मदत देणाऱ्या सरकारकडून नागपूरच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मंत्र्यांच्या पंचतारांकित हॉटेलमधील मुक्कामासाठी एका रात्रीला ५० ते ८५ हजार रुपये खर्च होणार असल्याच्या वृत्ताने संताप व्यक्त होत आहे. काँग्रेसचे झरी तालुकाध्यक्ष संदीप



बुर्रेवार यांनी या मुद्द्यावरून भाजप सरकारला धारेवर धरले आहे. रविभवन सह शासकीय निवास व्यवस्था उपलब्ध असताना मंत्र्यासाठी महागड्या हॉटेलचा आग्रह कशासाठी, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई देताना सरकारी तिजोरीवर मर्यादा येतात; मात्र

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त



टोम्पे महाविद्यालयात संविधान दिन

चांदूर बाजार-गो.सी.टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार येथे राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना वतीने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके होते.यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. सुभाष सिरसाठ,डॉ सुमित इंगळे डॉ प्रशांत सातपुते डॉ अतुल सरोदे, डॉ मंजुषा पवार, डॉ उमेश कनेरकर उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये आणि संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार व कर्तव्ये याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी संविधानातील स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांचा आपल्या जीवनात अंगीकार करावा, असे आवाहन केले.डॉ. प्रशांत सातपुते यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे महत्त्व सांगितले.संचालन डॉ. अतुल सरोदे तर आभार प्रदर्शन डॉ. उमेश कनेरकर यांनी केले.



संजय खोडके यांनी घेतली मदने कुटुंबीयांची भेट

अमरावती-गणेश चिंतामण मदने यांच्या दीर्घ आजाराने झालेल्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच अमरावतीचे संजय खोडके यांनी मित्रमंडळींसह मदने कुटुंबीयांची भेट घेऊन शोकसंवेदना व्यक्त केल्या.यावेळी संजय खोडके व त्यांच्या मित्रमंडळींनी शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन करून या दुःखद प्रसंगी आपण त्यांच्या दुःखात सहभागी असल्याची भावना व्यक्त केली. स्व. गणेश मदने यांच्या निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या निधनाने परिसरातही शोककळा पसरली आहे.यावेळी उपस्थितांनी स्व. गणेश मदने यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी असल्याची भावना यावेळी व्यक्त केली.

राष्ट्रपिता महात्मा फुले स्मृतिदिनी जाहीर व्याख्यान

कुऱ्हा-राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांचा १३६ वा स्मृतिदिन आहे.हे महात्मा फुलेंचे जन्मशताब्दी वर्ष असून अमरावती जिल्ह्यामध्ये कर्जबाजारीपण,मायक्रो फायनान्स, सततची नापिकी ,खाजगी सावकारीला कंटाळून सातत्याने शेतकरी आत्महत्या होत आहेत. या पार्श्वभूमीवर महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य त्यांनी चालविलेली शेतकरी चळवळ याचा परिचय ग्रामीण जनविभागाला होणे परिस्थितीची गरज आहे. या अनुषंगाने शहीद भगतसिंग मेमोरियल ट्रस्ट द्वारा जाहीर व्याख्यानाचे आयोजन केले आहे. 'शेतकरी चळवळीत महात्मा फुले यांचे योगदान' या विषयावर प्रा. विजय रोडगे यांचे जाहीर व्याख्यान असून २८ नोव्हें.ला दु.१२ वा. मुळे भवन,कुऱ्हा येथे होईल.अध्यक्षस्थानी धर्मेंद्र कुरळकर असतील.कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. ओम पाखरे यांनी केले आहे.

विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षेत नांदगावपेठ येथील विद्यार्थिनींचे यश

अमरावती-संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२६ या सत्रातील परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झालेला असून त्यामध्ये स्थानिक एस. एस. एम. एम .बी एड. कॉलेज, नांदगावपेठ येथील विद्यार्थिनींचे अभूतपूर्व यश दिसून आले आहे. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये एस. एस. एम. एम. बी. एड. कॉलेज नांदगावपेठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी आकांक्षा मावस्कर हिने २ रे स्थान व प्रणल दिलीप कराळे हिने १० वे स्थान मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढवीला आहे. विद्यार्थिनींनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष उद्धव गरकल, सचिव डॉ. विजय गरकल, प्राचार्या डॉ. रुपाली मुंढे व सर्व प्राध्यापक वृंद यांना दिले. तसेच महाविद्यालयातील प्राचार्या प्रा.डॉ.मुंढे,प्रा.डॉ. मोहोड, प्रा.डॉ.खंडारे,प्रा.देशमुख,प्रा. दानापुरकर, प्रा. ढाकरे, प्रा. कांबळे, प्रा. छांगानी आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थिनींचे सर्वस्वी अभिनंदन करून पुढील आयुष्यासाठी व शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर रोहयो कामांचा बोजवारा

तुटके कालवे, वितरिका शेतकरी स्वखर्चाने दुरुस्ती करायला मजबूर

अमरावती/का.प्र

दुष्काळाने होरपळणाऱ्या अमरावती जिल्ह्यात रोहयो कामांचा जोरदार बोलबाला सुरू आहे. मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे आणि सर्वात उत्पादक काम दुर्लक्षितच राहिले आहे. ते म्हणजे सिंचन कालवे आणि वितरिकांची दुरुस्ती व साफसफाई! पाणी सुटले की शेतकरीच स्वखर्चाने, स्वबळावर कालवा दुरुस्त करतो. ही शासनाची जबाबदारी असताना प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याची भावना शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.आधीच दुष्काळी परिस्थितीने मेटाकुटीस आलेल्या शेतक-यांच्या मदतीकरीता आता तरी सरसावेल का?असा प्रश्न उपस्थीत होत आहे.

सध्या दुष्काळामुळे मजुरांच्या हाताला काम नाही, गावात मजूर बेरोजगार आहेत. अशा वेळी

आता तरी सरकार जागे होणार का?



तातडीने कालवे, वितरिका दुरुस्ती आणि साफसफाईची कामे रोहयोत घेतली तर दुहेरी फायदा होईल.यावर्षी पाण्याअभावी अनेक ठिकाणी सिंचनासाठी पाणी सोडलेच नाही, किंवा सोडले तरी अत्यल्प प्रमाणात. त्यामुळे शेती वाळून गेली. पण त्यापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे दरवर्षी कालवे आणि वितरिकांची काडीकचरा काढून साफसफाई केली जात नाही. तुटलेल्या, फुटलेल्या ठिकाणी दुरुस्ती होत नाही.एकीकडे गावातच मजुरांना काम मिळेल, दुसरीकडे पुढच्या हंगामात सिंचनाचे पाणी वाया न जाता शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पोहोचेल. हे काम केवळ खड्डे खणण्यासारखे अनुत्पादक नाही, तर शंभर टक्के उत्पादक काम आहे.सध्या बरीच शेती मोकळी होत आहे. पावसाळा आल्यावर किंवा पाणी सुटल्यावर कामे करण्याची घाई करण्यापेक्षा आत्ताच कामे हाती घेतली तरच उपयोग होईल. दरवर्षी दुरुस्तीअभावी पाणी वाया जाते, शेतकरी नुकसान सोसतो, आणि प्रत्येक विभागाच्या आमदारांनी आपापल्या मतदारसंघातील सिंचन योजना, कालवे आणि चारा प्रश्नाचा पाठपुरावा करावा.केवळ आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष कामे सुरू करून दाखवावीत.ही बाब सातत्याने वृत्तपत्र व समाज माध्यमातूनही पालकमंत्री, आमदार, खासदार यांच्यापर्यंत पोहोचवली जाणार आहे. असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.दुष्काळ ही केवळ नैसर्गिक आपत्ती नाही, तर नियोजनाच्या अभावाचीही परिणती असते. त्यामुळे वेळीच उपाययोजना केल्या नाहीत तर शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज, स्थलांतर आणि नैराश्याला सामोरे जावे लागेल.

शेतकरी

जिल्ह्यातील आशा सिंचन योजनांचे कालवे, त्यांची साफसफाई, दुरुस्तीची कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. पावसाळा संपण्यापूर्वीच कालव्यांची दुरुस्ती झाली नाही तर रब्बी हंगामही हातातून जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.प्रत्येक विभागाच्या आमदारांनी आपापल्या मतदारसंघातील सिंचन योजना, कालवे आणि चारा प्रश्नाचा पाठपुरावा करावा, अशीही आग्रही मागणी होत आहे. केवळ आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष कामे सुरू करून दाखवावीत.

मा.अ.वाघाडे

पिण्याच्या पाण्यापासून ते जनावरांच्या चाऱ्यापर्यंतचे प्रश्न ऐरणीवर आले असतानाही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नाही. शासनाच्या धोरणात दुष्काळ निवारणासाठी अनेक योजना अंतर्भूत आहेत. मात्र अमरावती जिल्ह्यात त्या योजनांची अंमलबजावणी कागदावरच राहिल्याचा आरोप होत आहे. प्रत्यक्षात शेतात कालव्यांना पाणी नाही, कालवे गाळाने भरले आहेत, चाऱ्याची टंचाई वाढत आहे.

शेतकरी

मग पुन्हा दुष्काळ, पुन्हा अनुदान, पुन्हा घोषणांचा खेळ सुरू होतो. हे दुष्टचक्र थांबवायचे असेल तर आत्ताच कालव्यांच्या कामांना प्राधान्य द्यावे लागेल.पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि प्रत्येक आमदाराने यात लक्ष घालून आपापल्या भागातील कालवे, वितरिका यांची कामे तातडीने रोहयोतून मंजूर करावीत, अशी जोरदार मागणी आता शेतकऱ्यांमधून होत आहे.

मानव जाधव याला आंतरराष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत रौप्यपदक; चीनमध्ये भारताचा गौरव!

अमरावती/का.प्र.

श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित तक्षशिला अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, दारापूर येथील प्रथम वर्ष सिव्हिल इंजिनिअरिंगचा विद्यार्थी मानव गणेशराव जाधव याने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयासह अमरावती जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. चीनमधील हांगझोऊ येथे १६ ते २१ नोव्हेंबर २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित आर्चरी आशिया कप तिरंदाजी स्टेज - ३ स्पर्धेत पुरुषांच्या कंपाउंड सांघिक प्रकारात त्याने रौप्यपदक पटकाविले आहे. त्याच्या या यशामुळे क्रीडा क्षेत्रात अमरावतीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या स्पर्धेत आशियातील विविध देशांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अशा



आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत मानवने आपल्या कौशल्य, जिद्द, मेहनत आणि अचूक लक्ष्यभेदाच्या जोरावर रौप्यपदक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मानवच्या या यशाबद्दल अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार अनिल बंडे, आमदार प्रवीण पोटे, श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट च्या अध्यक्षा किर्तीताई रा.अर्जुन, तसेच संस्थेचे उपाध्यक्ष श्री. धरम रा. अर्जुन, संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस, प्रशासकिय अधिकारी डॉ. सचिन पंडीत, महाविद्यालयाचे संचालक डॉ.डी.टी, इंगोले, प्रभारी प्राचार्य डॉ. एस. टी. वरघट, क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिकारी प्रा. भूषण मेश्राम, विभाग प्रमुख प्रा. अतुल चिंचमलातपुरे,प्रा. अपेक्षा इंगळे , प्रा.पी. एस. दंडे, प्रा. अतुल कौशल, डॉ. एन. एस. घोटकर, अर्पित काळमेघ, योगेश गोंडाने तसेच महाविद्यालयातील शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

आदिवासी बांधवांचे वनसंरक्षकांना निवेदन



कुऱ्हा- मेळघाटातील आडनदी व कामापूर वन क्षेत्रामध्ये अदानी समुहाच्या जलविद्युत प्रकल्पाचे करीता बोरींग करण्यात आले.त्यास परवानगी अथवा संमती वनखात्याने दिली आहे का? जर सदर बोरींग विना परवानगी असेल तर वनखात्याने काय कारवाई केली असे विचारणा करणारे निवेदन विभागीय वनसंरक्षक, अमरावती यांना मेळघाटातील आदिवासी बांधवांनी किसान सभेच्या नेतृत्वात देण्यात आले. सदर निवेदनात वृक्ष संवर्धन, जंगल संरक्षण, तथा आदिवासींचे कायदेशीर हक्क सांगणारे कायदे धाब्यावर ठेवले जाणार नाहीत याची हमी शिष्टमंडळाने मागितली.

सदर प्रतिनीधी मंडळामध्ये महाराष्ट्र राज्य किसान सभेचे राज्य सरचिटणीस अशोक सोनारकर, सुशील ढोले, अ.भा. आदिवासी महासभेचे निळकंठ ढोके, कामापूर येथील जनप्रतिनीधी किसन अखंडे, सुंदरलाल धिकार, सामाजिक कार्यकर्ते ॲड. साचिन गोरले,रामकिसन कासदेकर यांचा समावेश होता.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात श्री.शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाचे यश

अमरावती/का.प्र.

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा ,संचालनालय, पुणे मार्फत अमरावती जिल्हा क्रीडा अधिकारी तर्फे नशामुक्त युवा फॉर विकसित भारत या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे जिल्हा क्रीडा संकुल, अमरावती व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह , संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजन करण्यात आले होते. या युवा महोत्सवात श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, अमरावती च्या चमूने घवघवीत यश प्राप्त केले. या



महाविद्यालयीन चमूला

चित्रकला स्पर्धेत रूपाली घायाळ हिला द्वितीय तर नुपूर डोंगरे हिला तृतीय, कवितालेखन स्पर्धेत श्रद्धा चौधरी हिला द्वितीय बक्षीस प्राप्त झाले. लोकगीत स्पर्धेत जान्हवी धवणे,खुशी शुक्ला,प्रांजल इंगळे व दिव्या वानखडे ह्यांच्या चमूने तृतीय क्रमांक पटकाविला. पथनाट्य स्पर्धेत श्रेया वडुरकर,श्रावणी वडुरकर, वैष्णवी मुंदाणे, राम आगलावे, प्रतीक चौधरी, सार्थक कराळे, गोरक्ष राऊत, ऋषिकेश मार्डीकर व प्रज्वल गावंडे ह्यांच्या चमूने द्वितीय स्थान पटकाविले. या त्यांच्या यशाबद्दल त्यांना ट्रॉफी, प्रशस्तीपत्र व रोख बक्षीस देऊन गौरवीत करण्यात आले.श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनात प्रा. डॉ. शशांक देशमुख, प्रा. डॉ. अतुल बोंडे, प्रा. दिनेश देशमुख, प्रा.शीतल चितोडे व प्रा. जयश्री कडू यांनी परिश्रम घेतले.

संविधान दिनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ

रोग निदान व रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

संकल्प व्यसनमुक्ती केंद्र कारला व माऊली फाउंडेशन ग्रुप अंजनगाव सुर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमा दाळू होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणून समाज कल्याण विभाग अमरावतीच्या करुणा बोबडे व जिल्हा समाज कल्याण अमरावतीचे वरिष्ठ लिपिक अंकुश सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी संकल्प व्यसनमुक्ती केंद्रातील एम. एम. भांबेरे, डॉ. अरुणा दोड, श्रद्धा बोरसे, गजानन खडसे, गोपाल जांभेकर यांच्यासह परिसरातील नागरिक, लाभार्थी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची



सुरुवात सामूहिक संविधान उद्देशिका वाचनाने करण्यात आली. उपस्थित सर्वांनी संविधानातील मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प करत व्यसनमुक्तीची शपथ घेतली. यावेळी व्यसनमुक्तीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. व्यसनामुळे व्यक्ती, कुटुंब व समाजावर होणारे दुष्परिणाम, तसेच व्यसनमुक्त जीवनाचे महत्व यावर मान्यवरांनी प्रकाश टाकला. याच कार्यक्रमाच्या निमित्ताने स्व. सौ. कमलाबाई चंद्रसेन वानखडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त भव्य रोग निदान व उपचार शिबिर तसेच रक्तदान शिबिर संपन्न झाले. या शिबिरासाठी अंजनगाव व अकोट येथील तज्ञ डॉक्टर व त्यांची टीम तपासणीसाठी आली होती.शिबिरात परिसरातील बहुसंख्य लाभार्थ्यांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. कार्यक्रमाला डॉ. शोण देशमुख व अथर्व वानखडे यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

वैष्णवी शेळके हिची राष्ट्रकुल सांसदीय अभ्यास वर्गासह हिवाळी अधिवेशनासाठी निवड

अमरावती/का.प्र.

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालयाची एम. ए राज्यशास्त्र भाग २ ची विद्यार्थिनी वैष्णवी शेळके,हिची ५२ व्या राष्ट्रकुल संसदीय अभ्यास वर्ग किंवा प्रशिक्षण विधिमंडळ हिवाळी अधिवेशन डिसेंबर २०२६, नागपूर साठी संत गाडगे बाबा अम.विद्यापीठाच्या अभ्यास चमूत निवड झालेली आहे. ८ ते १५ डिसेंबर २०२६ या दरम्यान नागपूर विधान भवन येथे निवासी राहून प्रत्यक्ष अधिवेशन कामकाजाचा अभ्यास राज्यशास्त्र विषयाचे विद्यार्थी करणार आहेत.



दरवर्षी नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी विधिमंडळीय अधिवेशन दरम्यान राज्यशास्त्राच्या पदव्युत्तर विध्यार्थ्यांना सांसदीय कामकाजाचे धडे मिळावे म्हणून राष्ट्रकुल सांसदीय अभ्यास वर्गाचे आयोजन केले जाते.त्यासाठी महाराष्ट्रातील ११ विद्यापीठाच्या चमू या प्रशिक्षणात सहभागी होतात. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या चमूत महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या एम. ए.भाग २ राज्यशास्त्र ची विद्यार्थिनी वैष्णवी शेळके हीची निवड झाली असून त्याबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन केले जात आहे.ती आपल्या यशाचे श्रेय डॉ.राजीव बोरकर, समन्वयक, विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती,प्राचार्य डॉ.मीनल भोंडे, प्रा.डॉ. बबिता येवले,राज्यशास्त्र विभाग प्रमुख, प्रा.गजानन काळे, राज्यशास्त्र विभाग यांना देते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे चमू व्यवस्थापक प्रा.डॉ. प्रिया बोचे, राज्यशास्त्र विभाग, श्री भगवानबाबा महाविद्यालय सिंदखेड राजा, बुलढाणा यांचे मार्गदर्शनात सहभागी होणार आहे. महाविद्यालयातून प्रा.डॉ. बबिता येवले, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, प्रा.गजानन काळे, राज्यशास्त्र विभाग यांनी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर वर्गाने वैष्णवी हिचे अभिनंदन केले आहे.

मेळघाटातील समस्या कायमस्वरूपी संपवू-आ.बच्चू कडू

जामली (आर) येथील शंकरपटात ५१ बैलगाड्यांचा सहभाग, शिवसेना-युवासेना शाखेचे उद्घाटन

अचलपूर/वार्ताहर

मेळघाटातील समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी शिवसेना हा सक्षम पर्याय असून भगवान बिरसा मुंडा यांचे विचार आणि धनुष्यबाणाचा संदेश गावागावांत पोहोचवावा, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी शिवसैनिकांनी अहोरात्र मेहनत घ्यावी, असे आवाहन विधानपरिषद आमदार बच्चू कडू यांनी केले.

चिखलदरा तालुक्यातील जामली (आर) येथे शिवसेना व युवा सेनेच्या संयुक्त विद्यमाने भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य शंकरपटाला शेतकरी व



नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या हस्ते शंकरपटाचे तसेच शिवसेना व युवा सेना शाखेच्या फलकाचे उद्घाटन झाले.यावेळी पारंपरिक आदिवासी लोकनृत्याने त्यांचे स्वागत करण्यात आले. शंकरपटात ५१ बैलगाड्यांनी सहभाग नोंदवला. शंकरपटाच्या आठवणींना उजाळा देत कर्जमाफी हा शेतकरी आंदोलनाच्या संघर्षाचा विजय असल्याचे सांगितले. कार्यक्रमानंतर त्यांनी कुलंगणा व अंबापाटी गावांना भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख प्रितेश अवघड, शिवसेना उपजिल्हाप्रमुख भूषण नागे, प्रहार विधानसभा संपर्कप्रमुख जगत शनवारे, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश मालवीय, उपतालुकाप्रमुख अमित ठाकरे, युवा सेना विधानसभा संपर्कप्रमुख राकेश झारखंडे आदी उपस्थित होते. आयोजनासाठी उपतालुका प्रमुख रामकिसन सेलूकर, सोशल मीडिया विधानसभा प्रमुख प्रविण बेलसरे, माजी सरपंच रामकिसन कासदेकर, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख दीपक भुसुम, दिनेश दहिकर, मणिराम दहिकर, प्यारेलाल दहिकर, हिरु भाकरे, रामेश्वर धांडे, विकास दहिकर, रामचंद्र उमरकर, श्रीराम दहिकर, रवि सवलकर, रुपेश भुसुम, हिरालाल कासदेकर, रामलाल बेलसरे, रामलाल जामुनकार, सतीश बेलसरे, अनिल भुसूम, प्रविण जामुनकार, रमेश बेलसरे, संतोष बेलसरे, प्रकाश भूसुम, उमेश दहिकर यांनी सहकार्य केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

सोनिया गांधींचे आत्मवृत्त



सोनिया गांधींचे आत्मवृत्त 'Belonging' सध्या वाचतोय. यातील सुरुवातीची अर्धीअधिक पाने वाचून झाली. त्यांच्या माहेरच्या कुटुंबाचे वर्णन, राजीवची भेट व प्रेम बहरणे, राजीवचे इटलीत जाऊन सोनियांच्या पालकांना भेटणे, पुढे सोनियांचे भारतात येणे, विवाह, इथल्या चालीरीती शिकणे, अन्नाची सवय करून घेणे, इंदिरा गांधींना व्यक्तिगत कामात मदत करणे इत्यादी मजकूर या भागामध्ये आलेला आहे. तो वाचून जाणवलेले ठळक मुद्दे असे..

आता पुन्हा थोडे flashback मध्ये जाऊ. पंतप्रधान लाल बहादूर शास्त्रींचा जानेवारी १९६६ मध्ये अकस्मात मृत्यू झाला. त्यानंतर काँग्रेस संसदीय दलाच्या नेतृत्वपदासाठी जी निवडणूक झाली, त्यात इंदिरा गांधींनी मोरारजी देसाईंचा पराभव केला आणि त्या पंतप्रधान झाल्या. राजकारणात मुळीच रुची नसूनही आई एकाकी पडू नये या भावनेने राजीव गांधींनी भारतात परतण्याचा निर्णय घेतला व परतण्यापूर्वी विमानउड्डाणाचे प्रशिक्षण सुरु केले. सोनियाचा भाषांचा अभ्यासक्रम जून मध्ये पूर्ण झाला. लगेच परतण्याचा घरच्यांचा आग्रह असूनही तिने जुलै अखेरपर्यंत परतणे टाळले. तिला निरोप देताना राजीवने पुन्हा एकदा त्याला तिच्या घरी सर्वांना भेटायला यायचे आहे असे बजावून सांगितले. ऑगस्टमध्ये धीर गोळा करून सोनियाने एकांतात वडिलांना आपल्या प्रेमाची कबुली दिली. त्यांचा चेहरा लाल झाला, पण तो रागाने नव्हे तर बापासमोर मुलगी प्रेम-बिम बोलत असताना आलेल्या अवघडलेपणामुळे.बराच वेळ स्तब्ध राहून वडील म्हणाले 'ठीक आहे, यातून त्याचा सभ्यपणा दिसून येतो. त्याला यायचेच असेल तर मी अडवू शकत नाही. पण माझ्याकडून कोणतीही अपेक्षा ठेऊ नकोस.'

एक अडथळा तर दूर झाला पण पुढे काय, या विचाराने सोनिया गोठून गेली. तिला आपल्या पित्याला मिठी मारावी असे वाटले तरी मुली वयात आल्यापासून वडिलांनी त्यांना मिठीत घेणे बंद केले होते. औपचारिक हस्तांदोलन आणि दोन्ही गालांवर हलकासा मुका इतकीच त्यांची प्रेम व्यक्त करण्याची पद्धत होती. त्यामुळे सोनिया फक्त 'थँक्यू पापा' इतकेच पुटपुटली.

आधी ठरल्याप्रमाणे केम्ब्रिज मधल्या सोनियाच्या घरमालकिणीची मुलगी इटलीत त्यांच्या घरी काही काळ राहायला येणार होती. राजीवला संजयने त्याची एक जुनी जॅग्वार सेकंड हँड कार देऊ केली. इटली पर्यंत ती चालू शकेल असे संजयला वाटत होते. घरमालकिणीच्या मुलीला सोबत घेऊन राजीव नोव्हेंबर मध्ये इटलीला निघाला.वाटेत बर्फाळ भागात कार बिघडली. सोनियाला त्याने फोन केला. तिने वडिलांना पुन्हा गळ घातली. 'ठीक आहे. दोन तरुण मुलांना आपण बर्फात एकटे ठेऊ शकत नाही' असे म्हणून वडिलांनी त्यांना आणण्यासाठी सोनियाच्या भावी मेहुण्याला पाठविले.मदत येईपर्यंत राजीव कारच्या इंजिनशी झटापट करत होता. त्याला आणि संजयला यंत्रांशी खेळणे फार आवडत असे. दुरुस्त न होता कार टो करून आणावी लागली.

शेजारच्या एका गावात राजीवची राहण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली. दुसऱ्या दिवशी डिनरसाठी सोनियाकडे बोलावण्यात आले. तिच्या आईने डायनिंग टेबल सजवला.वडील कारखान्यातून परतण्याची सगळे वाट पाहू लागले.सगळ्यांनाच त्यांच्या प्रतिक्रियेची चिंता होती. कामावरून परतल्यानंतर आधी आंघोळ करून कपडे बदलण्याची त्यांची सवय होती. पण त्या दिवशी मात्र ते सरळ डायनिंग टेबलकडे आले आणि राजीवची ओळख करून घेतली.नंतर ते सोनियाच्या आईला बोलले,'डोळ्यात पाहिले की माणूस कळतो,या मुलाचे आपल्या सोनियावरील प्रेम सच्चे असणार, म्हणूनच तो इतक्या दूर प्रवास करून आला'. माणूस म्हणून राजीव त्यांना चांगला वाटला. वडिलांच्या बाह्यतः कठोर दिसणाऱ्या व्यक्तित्वाच्या आत एक हळवे हृदय दडले असेल का, असा सोनियाला प्रश्न पडला.

भाग- ४

काही दिवसांनी राजीवसाठी गावातलेच एक रिकामे घर मिळाले.त्यामुळे त्याचे सोनियाकडे जाणे-येणे वाढले.नाश्ता जेवणही तिथेच व्हायचे.आपली बिघडलेली कार स्वतःच दुरुस्त करण्याची राजीवची खटपट सुरूच होती. ती न बघवून सोनियाच्या वडिलांनी मेकॅनिकला बोलावले आणि दुरुस्ती साठी ती कार गॅरेज मध्ये पाठवली. ती पूर्वीपेक्षा अधिक चांगली करून मिळाली.

एक दिवस राजीवने सोनियाच्या वडिलांजवळ लग्नाचा विषय काढला.सोनियाने भारतात काही काळासाठी येऊन राहावे आणि नंतर पालकांच्या परवानगीने विवाह करू असे राजीवने सुचविले. राजीवच्या हेतूविषयी तिच्या वडिलांना शंका नव्हती. पण सोनियाचे वय असे आहे की खरंच तिला काय हवं आहे हे कळण्यासाठी ती अजून अज्ञान आहे. दोघांचीही पार्श्वभूमी आणि संस्कृती पूर्णतः भिन्न आहे, भौगोलिक अंतरही खूप मोठे आहे. आपल्या मुलीने एकटीने एकटीने इतक्या लांबचा प्रवास करावा हे त्यांना पटत नव्हते. राजीवने त्याच्या आईशी बोलणे केले काय, अशी विचारणा त्यांनी केली. आईचा होकार असल्याचे राजीवने सांगितल्यानंतर देखील ते म्हणाले की एक वर्ष आणखी थांबा.त्यानंतरच ते तिला भारतात जाण्याची परवानगी देऊ शकतील. तिथे तिने सर्व परिस्थिती समजून घ्यावी व योग्य निर्णय घ्यावा. हे ऐकून सोनियाला पुन्हा एकदा वडिलांना घट्ट मिठी मारावीशी वाटली.

९ डिसेंबरला सोनियाचा जन्मदिन होता. तो तिच्या कुटुंबासोबत साजरा करून आणि नाताळचा सण आटोपल्यावर राजीव परतला. निरोप घेताना दोघांच्याही डोळ्यात अश्रूधार होती.लंडनला कार सुखरूप पोहोचली.नववर्षदिन संजय सोबत साजरा करून राजीव दिल्लीला आईजवळ परतला.पुन्हा दोघांचा दीर्घ पत्रव्यवहार सुरु झाला. अधूनमधून फोनही होत असत. परंतु त्या काळात फोन करणे सोपे नव्हते. कॉल बुक करून बरीच वाट पहावी लागायची. मात्र एकमेकांचा आवाज ऐकल्याचा आनंद मोठा असायचा. टेलिफोन ऑपरेटर किंवा राजीवच्या आईच्या कार्यालयातील कर्मचारी आपले बोलणे ऐकत असतील याचेही भान असायचे.सोनियाला जवळच्याच टोरीनो शहरात दुभाषकाचे काम मिळाले. पगार चांगला होता. इटालियन भाषेचा इंग्रजी किंवा फ्रेंच भाषेत अनुवाद करणे,हे तिचे काम होते. राजीवला तिच्या या कामाविषयी खूप उत्सुकता होती.तिथे कोणी मुलगे सुद्धा आहेत का,असे तो विचारत असे.सोनिया सुद्धा त्याला कोणी नवीन मुलगी मिळाली का असे विचारायची. दोघांनाही आतून धाकधूक होती. 'इथली जी परिस्थती आहे ती पूर्णपणे समजून घेतल्याशिवाय तू निर्णय घेऊ नयेस आणि आधी इथे येऊन सर्व पाहून घ्यावे' असा राजीवचा आग्रह असायचा.

२१ व्या जन्मदिनाच्या एक दिवस आधी सोनियाने वडिलांजवळ भारतात जाण्याचा विषय काढला. 'शब्द दिला तर मी माघार घेत नसतो' असे म्हणून पण चिंतातूर चेहऱ्याने वडिलांनी तिला परवानगी दिली आणि परतीचे तिकीट देखील काढून दिले. 'जर तुला तो देश आवडला नाही किंवा तिथले लोक तुझ्याप्रती दयाळू नसले तर तत्काळ घरी परत ये' असे ते म्हणाले. आई वडिलांशी सल्लामसलत केल्यानंतरच ती निर्णय घेईल असे वचन त्यांनी सोनियाकडून घेतले.तसे तिने न केले तर तिला कधीही क्षमा करणार नाही असे वडिलांनी बजावले.आईसुद्धा दुःखी आणि चिंतातूर होती. नातेवाईकांना, मित्रांना अथवा गावकऱ्यांना न कळवता सोनिया गुपचूप दिल्लीसाठी रवाना झाली. वाटेत बैरुतला विमान थांबले असता तिने आईला फोन केला तेव्हा आईने सांगितले की लहान बहिणीच्या जन्मानंतर तिने प्रथमच सोनियाच्या वडिलांना ती निघाल्यावर रडताना पाहिले. क्रमशः

किशोर देशपांडे
मो.९८८१५७४९५४







सौंदर्यदृष्टी आणि अंतर्वेदना!

सौंदर्यदृष्टी आणि प्रकाश-छायेच्या विरोधाभासातून शेतकऱ्यांच्या जीवनातील वास्तव टिपणारा संवेदनशील, सर्जनशील व कृतिशील प्रकाशचित्रकार म्हणून नानू नेवरेंनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. नेवरेंनी टिपलेल्या प्रकाशचित्रांत कथानकासोबतच एक सशक्त दृश्यभाषाही आहे. ही चित्रे केवळ कलाकृतीपुरती मर्यादित न राहता त्यांतून सौंदर्याभिरुचीचे 'आक्रंदन' प्रकट होते. या आक्रंदनातून एक मूलभूत व मूलगामी मूल्यसंघर्ष अधोरेखित होतो. हा संघर्ष अस्वस्थतेचा वेध घेतो. ही अस्वस्थता माणसाला जागे करते आणि सत्य, संघर्ष व विवेकाकडे पाहायला शिकवते.

कुणावरही, कुठेही अन्याय झाला, तरी नेवरेंच्या संवेदनशील कलामनाला दुःखाच्या हाका ऐकायला येतात. त्या यातनांतून निर्माण झालेली उद्विग्नता आणि कोलाहल प्रकाशचित्रांच्या माध्यमातून नाट्यमयरीत्या प्रकट होऊ लागते.त्यासाठी नेवरे आपल्या कलाकृतींमध्ये नव्या प्रतीकांचा प्रभावी वापर करून, पारंपरिक मिथकांची आधुनिक काळाशी सुसंगत अशी पुनर्मांडणी करतात. जुन्या मिथकांना समकालीन वास्तवाशी जोडून नवा आशय, नवी दिशा आणि व्यापक संदर्भ उपलब्ध करून देतात.

शेतकऱ्यांचे विषण्ण करणारे जगणे आणि त्यांच्या प्रश्नांतून व्यक्त होणारा उद्रेक नेवरेंनी 'माझा शेतकरी' या वास्तववादाकडून अतिवास्तववादाकडे जाणाऱ्या 'कृष्ण-धवल' प्रकाशचित्र मालिकेतून उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या कलाकृतींचे प्रदर्शन नागपूर येथील शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाच्या कलादालनात भरविण्यात आले आहे.

मदर इंडिया-मातृत्व, त्याग, नीतिमूल्ये आणि स्त्रीशक्ती यांचे प्रतीक असलेल्या मदर 'इंडिया' या कलाकृतीतून स्त्रीच्या जीवनातील अस्थिरता आणि प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देण्याची तिची जिद्द प्रभावीपणे







व्यक्त होते. कलाकृतीत स्त्रीची संघर्षशील वृत्ती दर्शविण्यासाठी नांगराची प्रतिमा आणि पाण्याच्या लाटांवर बैलगाडीचे चाक एक्स्पोज केले आहे. स्त्री प्रतिमा लो-कॉन्ट्रास्ट ॲम्बियंट प्रकाशयोजनेत टिपल्यामुळे टोनल बॅलन्स नियंत्रित आहे. लो-ॲंगल सिल्हूट आणि पर्सपेक्टिव्ह रचना असलेली ही कलाकृती 'कन्सेप्च्युअल आर्ट फोटोग्राफी'चा उत्तम नमुना आहे.

दुभंग-शेतकऱ्यांच्या जीवनातील आव्हानांचे प्रतीक म्हणून दुष्काळ आणि महापुराचे प्रभावी चित्रण 'दुभंग' या कलाकृतीत करण्यात आले आहे. यातील विस्कटलेल्या जीवनाच्या अर्धवट रेषा, अपूर्ण आकृती आणि छाया-प्रकाशातील ताणतणाव हे शेतकऱ्यांच्या अस्वस्थ वर्तमानामागील आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय घटक कारणीभूत असल्याचे सूचित करतात. विशेषतः शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर ओव्हरलॅप केलेले कोरड्या जमिनीच्या भेगांचे टेक्स्चर, डोळ्यांखालील तीक्ष्ण सावल्या, त्वचेचा पोत आणि पार्श्वभूमीतील पाण्याच्या लहरी यांमुळे प्रतिमेत प्रभावी दृश्यात्मक परिणाम साधता आला. उच्च कॉन्ट्रास्ट आणि डबल एक्स्पोजर या तंत्राच्या साहाय्याने साकारलेली ही पोर्ट्रेट प्रतिमा आशयपूर्ण व आकर्षक आहे.

पीस-सन २०२० मध्ये लागू करण्यात आलेल्या तीन कृषी कायद्यांविरोधात पंजाब आणि हरियाणातील हजारो शेतकऱ्यांनी दिल्ली येथे दीर्घकाळ आंदोलन केले. संघर्ष कितीही मोठा असला, तरी शांतता आणि सामंजस्याच्या माध्यमातून विजय मिळवता येऊ शकतो, हा विचार नेवरेंनी दृश्यस्वरूपातून मांडताना शेतकऱ्यांचे जीवन, परंपरा, श्रम आणि संघर्ष यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बैलगाडीच्या चाकावर शांतता, आशा आणि अहिंसेचे प्रतीक असलेले कबुतर चित्रित केले आहे. कलात्मक गुणवत्ता आणि अभिनव दृश्यात्मक मांडणी यांचा सुरेख संगम असलेली 'पीस' ही प्रतीकात्मक कलाकृती लक्ष वेधून घेते.

बाप माझा कर्जबाजारी-नैसर्गिक आपत्ती, कर्जबाजारीपणा आणि सततच्या अपमानास्पद जगण्यामुळे हवालदिल झालेला शेतकरी अखेर जीवन संपविण्याचा मार्ग निवडतो. याच आशयाला अनुरूप नेवरेंनी साकारलेली बाप 'माझा शेतकरी' ही दृश्य अभिव्यक्ती मन सुन्न करणारी आहे. या कलाकृतीत बुजगावण्याच्या प्रतीकातून शेतकरी बापाचे चित्रण केले आहे. बाप जिवंत असूनही मानसिकदृष्ट्या खचलेल्या जन्मदात्याला मृत्यूच्या मार्गापासून परावृत्त करण्यासाठी चिमुकल्या लेकीने बुजगावण्याला घट्ट कवटाळले आहे. भावनिक, कौटुंबिक आणि सामाजिक आशयाचा प्रत्यय देणारी ही हृदयस्पर्शी कलाकृती तंत्रदृष्ट्याही परिपूर्ण आहे.

'मरणाने केली सुटका,
जगण्याने छळले होते...'

कवी सुरेश भट यांच्या रचनेतील ओळींचा संदर्भ घेऊन साकारलेली ही प्रदर्शनातील एकमेव रंगीत कलाकृती आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्यास भाग पाडणारी ही कलाकृती जीवन आणि मृत्यू यांच्या सीमारेषेवरील धूसर अवस्था सूचित करते. या कलाकृतीतील रचना व मांडणीच्या दृष्टीने केंद्रस्थानी असलेले सरण, जळालेली लाकडे, राख आणि पायांची प्रतिमा विषयाच्या गाभ्यापर्यंत पोहचण्यास प्रवृत्त करते. उबदार नारिंगी-लाल रंगछटा, गडद पार्श्वभूमी आणि प्रकाश-छायांतील विरोधाभास यांमुळे वेदना, निराशा, अग्नी आणि अंधार यातील संघर्षाची तीव्रता अधिक प्रभावीपणे व्यक्त होते. सामाजिक वास्तवाचे दाहक प्रतिबिंब दर्शविणारी ही कलाकृती अत्यंत प्रभावी आणि भावगर्भ आहे. या प्रदर्शनात सर्व कलाकृतींतून शेतकऱ्यांविषयीच्या नेवरेंच्या अंतर्मनातील संवेदना, सामाजिक जाणीवा आणि वास्तवाचे भान ठळकपणे व्यक्त झाले आहे.

एकूणच, नेवरेंनी साकारलेल्या सर्वच कलाकृतींमधील प्रतीकात्मक घटक, वास्तववादी प्रतिमा, आकारमान, अवकाशविभाजन, पोत, रचनात्मक मांडणी आणि नैसर्गिकता यांच्या प्रभावी समन्वयातून छाया-प्रकाशाचा नियंत्रित आणि कलात्मक वापर केल्यामुळे या कलाकृती केवळ दृश्यदृष्ट्याच नव्हे, तर भावनिकदृष्ट्याही अंतर्मुख करतात.

आशिष यावले
नागपूर
मो. ९९२२२९००२२

'ओंजळीतील शब्दफुले' : संवेदनांचा सुगंध आणि समाजभान यांचा संगम

समीक्षण

शब्दांच्या ओंजळीत आयुष्याचे नानाविध भाव,अनुभव आणि संस्कार गुंफत फुलणारा एक हळवा,अर्थपूर्ण काव्यसंग्रह म्हणजे 'ओंजळीतील शब्दफुले'.या संग्रहाच्या कवयित्री डॉ. शोभा गायकवाड या केवळ एका संवेदनशील कवयित्रीच नाहीत,तर सेवानिवृत्त शिक्षिका, व्यासंगी लेखिका आणि माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित झालेल्या एक ध्येयवेड्या कार्यकर्त्याही आहेत.त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यिक प्रवासाची सखोल जाणीव या संग्रहातील प्रत्येक रचनेतून प्रत्ययास येते.

कविता आणि तिच्या निर्मितीप्रक्रियेबाबत डॉ. शोभा गायकवाड यांच्या लेखनात एक हळवे,तरीही ठाम चिंतन जाणवते. 'काव्य चांदणे माझ्या मनात रोज पडते, शब्दांच्या दुधात भावनांची साखर विरघळते'असे म्हणत त्या कविता जन्माची सहज आणि उत्कट प्रक्रिया उलगडतात. कवितेला त्या केवळ कागदावरच्या ओळी मानत नाहीत; ती मनाची हाक आणि काळजाचा खोल ठाव असते.

'ऋणानुबंध शाळेचा' आणि 'शिक्षक' या कवितांमधून डॉ. शोभा गायकवाड यांच्यातील शिक्षिकेचे अंतरंग अत्यंत आत्मीयतेने उलगडते.'विद्यार्थी म्हणजे कच्ची माती, स्वप्नांच्या ओळी शिक्षकाच्या हातून घडते, त्याची मूर्ती आगळी तसेच 'रागातही त्याच्या खूप माया असे, शिक्षणातून दिसे सुसंस्कार' या ओळींमधून विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील जिव्हाळ्याचा, मायेचा आणि संस्कारांचा धागा सहज उलगडतो.

'ओंजळीतील शब्दफुले' या संग्रहातील मायबोली मराठीचा अभिमान, अभिजात भाषेचे लेणे आणि



वऱ्हाडी बोलीचा गोडवा जपणाऱ्या रचनांमधून भाषिक अस्मिता आणि मातीशी असलेली नाळ अधिक घट्ट होते. महात्मा फुले,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,छत्रपती शिवाजी महाराज, संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर-मुक्ताई या थोर विभूतींच्या कार्याला वंदन करताना कवयित्रीची लेखणी समता, स्त्री-शिक्षण, भक्ती आणि निर्भयतेचा संदेश देते. 'क्रांतीज्योती सावित्री आई' या कवितेत..

'आज जेव्हा एखादी मुलगी शाळेत जाते,
तेव्हा तिच्या पावलात सावित्रीच चालते'..

ही ओळ सावित्रीबाईंच्या संघर्षाला दिलेली मानवंदना आजच्या प्रत्येक शिकणाऱ्या लेकीसाठी प्रेरणादायी ठरते. 'ती फुलत नाही, ती जळते, सुगंधाचा दिवा होऊन'

असे रातराणीचे रूप रेखाटताना कवयित्री निःस्वार्थ जगण्याचा अर्थ सांगतात. दुष्काळाचे दुःख, बळीराजाचा संघर्ष,सर्जा-बैलपोळा, निसर्ग व धरा वाचवण्याचा आक्रोश आणि'इको-फ्रेंडली बाप्पा' यांसारख्या कवितांमधून कवयित्रीचे सामाजिक व पर्यावरणीय भान ठळक होते. तर 'भाकरीचे चित्र' मधील..



'कागदालाच भाकर समजून त्याने घास गिळला, निरागसतेने भुकेचा अर्थ नव्याने लिहिला'..ही ओळ भुकेच्या व्यथेची आणि निरागसतेची काळीज पिळवटून टाकणारी प्रचिती देते. यासोबतच 'मनातली ती','शेवटचे पत्र','रात्रजागी उशाला', 'जगणे नवे वाटे मला' यांसारख्या भावकवितांतून हळव्या मनाचे पदर,विरह, आठवणी आणि प्रेमाची तरल स्पंदने उमटतात. 'ज्येष्ठांची गमतीदार सहल' आणि 'मोदकाची किमया' यांसारख्या रचनांमधून हलकाफुलका आनंद, विनोद आणि जगण्यातील गोडवा वाचकांना प्रसन्न करतो.'शब्द हे शस्त्र, शब्द हे शास्त्र, शब्दच आहे जादू' असे म्हणत शब्दांची ताकद जाणणाऱ्या डॉ. शोभा गायकवाड यांच्या लेखणीत कधी बोलीभाषेचा जिवंतपणा, तर कधी अभंग व गेयतापूर्ण रचनेचा गोडवा वाचकांना सहज आपलेसे करतो. परंपरा आणि आधुनिकता, भक्ती आणि समाजप्रबोधन, निसर्गप्रेम आणि मानवी नात्यांची वीण घट्ट करणारा 'ओंजळीतील शब्दफुले' हा संग्रह वाचकांच्या मनात नक्कीच सुगंध आणि सकारात्मकतेचा प्रकाश पेरेल. या सारस्वत सेवेसाठी आणि डॉ. शोभा गायकवाड यांच्या पुढील लेखनप्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

डॉ. लीना निकम,
नागपूर

■ शनिवार, २८ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

पाणीप्रश्नावर आवाज उठविल्याने निलेश देव यांना गोवण्याचा प्रयत्न ?

टँकर व हायड्रंट प्रकरणातील तक्रारीची निष्पक्ष चौकशी करा

वंचित बहुजन आघाडीची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

४८ तासांत प्राथमिक चौकशीचा अहवाल देण्याची मागणी; अन्यथा धरणे आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■



शहरात तीव्र पाणीटंचाई असताना जलतरण तलावासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा केल्याचा मुद्दा उपस्थित करून प्रशासनाला जाब विचारणारे वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक निलेश देव यांना आता खोट्या तक्रारीत गोवून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. या प्रकरणातील तक्रारीची सखोल व निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अकोला शहरात नागरिकांना पाण्यासाठी अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत असताना जलतरण तलावासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा कसा करण्यात आला, असा सवाल नगरसेवक निलेश देव यांनी उपस्थित केला होता. सार्वजनिक हिताच्या या प्रश्नावरून प्रशासनाला जाब विचारल्यानंतरच त्यांच्याविरोधात तक्रारीचे प्रकरण पुढे आल्याने यामागे राजकीय हेतू असल्याचा संशय वंचित बहुजन आघाडीने व्यक्त केला आहे.

२६ नोव्हेंबर रोजी सुनील मालुराम साकला (रा. साकला हायड्रंट, खेडकर नगर, अकोला) यांनी सिव्हिल लाईन्स पोलीस ठाण्यासह संबंधित कार्यालयांकडे तक्रार दाखल केल्याची माहिती आहे. या तक्रारीत नगरसेवक निलेश देव यांचे नाव नमूद करून अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाला पाठविणे, घरात अनधिकृत प्रवेश आणि अन्य गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, या कथित घटनेशी आपला कोणताही संबंध नसल्याची भूमिका निलेश देव यांनी घेतली असून, अनधिकृत प्रवेश, धक्काबुक्की अथवा गैरवर्तनाच्या आरोपांचेही त्यांनी खंडन केले आहे.

केवळ तक्रारीत नाव आल्याने कोणालाही दोषी ठरविता येणार नाही. आरोपांची सत्यता पुराव्यांच्या आधारे तपासली गेली पाहिजे. तक्रारीमागील पार्श्वभूमी, संभाव्य राजकीय हस्तक्षेप आणि संपूर्ण घटनाक्रमाची स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. यासाठी संबंधित दिवसाचे सीसीटीव्ही फुटेज तपासावे, प्रत्यक्षदर्शीचे जबाब नोंदवावेत, अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची भूमिका तसेच संबंधित आदेशांची पडताळणी करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जाणीवपूर्वक खोटी माहिती देऊन पोलीस व प्रशासकीय यंत्रणेची दिशाभूल केल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

४८ तासांचा अल्टिमेटम

जनतेच्या मूलभूत पाणीप्रश्नावर आवाज उठविणे हा लोकप्रतिनिधींचा लोकशाही अधिकार आहे. या अधिकाराचा वापर केल्यामुळे लोकप्रतिनिधींवर दबाव आणण्यासाठी पोलीस तक्रारींचा वापर होऊ नये. चौकशी पूर्ण होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरविणे योग्य नाही, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीने मांडली आहे. या प्रकरणाची ४८ तासांच्या आत प्राथमिक चौकशी करून कार्यवाहीचा अहवाल द्यावा, अन्यथा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे, माजी प्रदेश उपाध्यक्ष डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, विरोधी पक्षनेते डॉ. झिशान हुसेन, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मनपा गटनेते विजय इंगळे, नगरसेवक अजय खुमकर, शंकरराव लंगोटे, वंचितचे गटनेते तथा नगरसेवक निलेश देव, महानगराध्यक्ष (पश्चिम) हाजी मजहर खान, नगरसेविका जयश्री बहादुरकर, उज्ज्वला पातोडे, नगरसेवक सुनील इन्नानी, शेख शमसु शेख साबीर, महानगर महासचिव गजानन गवई, राजकुमार दामोदर, प्रविण पातोडे, पुरुषोत्तम वानखडे, नितीन सपकाळ, आकाश जंजाळ, सूरज दामोदर, विकास सदांशिव, आशिष सोनोने, संतोष गवई आदी उपस्थित होते.

रविवारी जिल्हा परिषद कर्मचारी भवनात भव्य कुणबी समाज युवक युवती परिचय संमेलन



■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक सेवेत सक्रिय असणाऱ्या विठ्ठल कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे यावर्षी ही रविवार दिनांक २९ नोव्हेंबर रोजी स १० वाजता सिविल लाईन परिसरातील जिल्हा परिषद कर्मचारी भवनात कुणबी समाजाचा उपवर युवक युवती परिचय सोहळा आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री एड आकाश फुंडकर, शिर्डी संस्थानचे माजी अध्यक्ष डॉ सुरेश हावरे, माजी मंत्री संजय कुटे, आ.श्वेताताई महाले,माजी आ ज्ञानदेवराव ठाकरे,माजी आ नारायणराव गव्हाणकर आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष अनिल गावंडे यांनी शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. जिल्ह्यात दुष्काळ व पाण्याचे भीषण दुर्भिक्ष बघता मार्च, एप्रिल मध्ये होणारा हा परिचय उपक्रम यावर्षी नोव्हेंबर महिन्यात घेण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या राज्यस्तरीय उपवर युवक, युवती परिचय संमेलनात उपवर युवक युवतींची माहिती असणारी परिचय पुस्तिका सोयरीक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात येणार असून त्यांची संपूर्ण माहिती मंडळाच्या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या राज्यस्तरीय कुणबी समाज उपवर युवक युवती परिचय संमेलनात राज्यातील समाजाच्या अनेक उपवर युवक,युवतीनी नोंदणी केली असून त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. या उपवर युवक युवती परिचय संमेलनात पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन यावेळी करण्यात आले. या पत्रकार परिषदेत यावेळी विठ्ठल कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र काळणे, सचिव सुरेश फाळके, कोषाध्यक्ष देविदास म्हैसने, सहसचिव प्रा रवी किरण हेलगे, संचालक गजानन थोरात,विनोद तळोकार, ज्ञानेश्वर साबळे, दीपक गावंडे,योगेश नागले, निलेश तायडे, अमित मानकर, सचिन वडतकर, सुयोग उगले, संतोष भोरे समवेत कार्यकर्ते उपस्थित होते.

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१९५८/२०२६ प्रोसेस नं.१४७२७/२०२६
चौ.ता. ०७/०१/२०२७ दिनांक : २३/११/२०२६

अर्जदार : १. श्रीमती राधाबाई रामलाल परियाल २. गणेशलाल रामलाल परियाल दोन्ही रा. गणेश भवन, रणपिसे नगर, अकोला, ता. जि. अकोला ३. श्रीमती लता दीपक जोशी रा. गुरूकुल कॉलोनी, कोदरिया, मंहू, ता. मंहू, जि. इंदौर म. प्र.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.
मयताचा पत्ता :- मयत : १. रामलाल बिहारीलाल परियाल
पत्ता :- रा. गणेश भवन, रणपिसे नगर, अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, रामलाल बिहारीलाल परियाल यांचे दि. २६/०९/२००५ रोजी रणपिसे नगर, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०१/२०२७ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

योगायोग स्वयंसहायता महिला समूह, सुकळी ता बार्शीटाकळी जिल्हा अकोला

मोबाईल क्रमांक : 9022654485
ई- मेल :
जा.क्र. ००१/११/२०२६ दिनांक : २८/११/२०२६

दरपत्रक सूचना (Request for Quotation)

महाराष्ट्र शासनाने राज्यातील २१ जिल्ह्यांसाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा -II) ला मान्यता दिली आहे. सदर महिला बचत गट यांना गावस्तरावरील कृषि औजारे बँक केंद्राची निर्मिती या व्यावसायिक प्रस्तावासाठी पूर्व-मंजुरी प्राप्त झाली आहे. या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यासाठी सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

सदर दरपत्रके (Request for Quotation) योगायोग स्वयंसहायता महिला समूह, सुकळी ता. बार्शीटाकळी जिल्हा अकोला कार्यालयात उपलब्ध आहेत.

दरपत्रके सादर करण्याची दिनांक - २८/११/२०२६ ते ०७/१२/२०२६ पर्यंत राहील.

टीप :- कोणत्याही प्रकारची खाडाखोड, ओव्हररायटिंग, दुरुस्ती किंवा व्हाईटनरचा वापर केलेले सीलबंद दरपत्रक विचारार्थ घेतले जाणार नाही.

स्वाक्षरी
अध्यक्ष - योगायोग स्वयंसहायता
महिला समूह, सुकळी ता. बार्शीटाकळी जिल्हा अकोला

कार्यालयाचा पत्ता : योगायोग स्वयंसहायता महिला समूह, सुकळी ता बार्शीटाकळी जिल्हा अकोला
संपर्क अधिकारी : - श्री/ श्रीमती उमाताई दिनकर दांडळे
संपर्क क्रमांक : -9022654485

मा चंडिका स्वयं सहाय्यता समूह, कोठारी, ता जिल्हा अकोला

मोबाईल क्रमांक : 9922828613
ई- मेल : dhoreganesh0@gmail.com
जा.क्र. ००१/११/२०२६ दिनांक : २८/११/२०२६

दरपत्रक सूचना (Request for Quotation)

महाराष्ट्र शासनाने राज्यातील २१ जिल्ह्यांसाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा-II) ला मान्यता दिली आहे. सदर महिला बचत गट यांना गावस्तरावरील कृषि औजारे बँक केंद्राची निर्मिती या व्यावसायिक प्रस्तावासाठी पूर्व-मंजुरी प्राप्त झाली आहे. या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यासाठी सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

सदर दरपत्रके (Request for Quotation) मा चंडिका स्वयं सहाय्यता समूह, कोठारी, ता जिल्हा अकोला कार्यालयात उपलब्ध आहेत. दरपत्रके सादर करण्याची दिनांक - २८/११/२०२६ ते ०७/१२/२०२६ पर्यंत राहील.

टीप :- कोणत्याही प्रकारची खाडाखोड, ओव्हररायटिंग, दुरुस्ती किंवा व्हाईटनरचा वापर केलेले सीलबंद दरपत्रक विचारार्थ घेतले जाणार नाही.

स्वाक्षरी
अध्यक्ष - मा चंडिका स्वयं
सहाय्यता समूह, कोठारी, ता जिल्हा अकोला

कार्यालयाचा पत्ता: मा चंडिका स्वयं सहाय्यता समूह, कोठारी, ता जिल्हा अकोला
संपर्क अधिकारी : श्री. / श्रीमती उषाबाई श्रीराम ढोरे
संपर्क क्रमांक : ९९२२८२८६१३

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३४२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

महाबीज मुख्यालयात कामकाजाचा सविस्तर आढावा

अकोला : बदलत्या हवामानाच्या आव्हानात्मक परिस्थितीत शेतकऱ्यांना अधिक अनुकूल, उत्पादनक्षम आणि गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीमध्ये महाबीजची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असून, महाबीजने आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करीत आपल्या कार्याचा विस्तार राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या बांधापर्यंत करावा, असे प्रतिपादन राज्याचे कृषी सचिव तथा महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे अध्यक्ष परिमल सिंह यांनी केले.

अकोला येथील महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या (महाबीज) मुख्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी, संचालक डॉ. रणजीत सपकाळ तसेच विविध विभागांचे महाव्यवस्थापक उपस्थित होते. सिंह म्हणाले की, शेतकऱ्यांना आधुनिक शेतीसाठी आवश्यक असलेल्या निविष्ठा सहज उपलब्ध व्हाव्यात, महाबीजद्वारे उत्पादित प्रमाणित व सुधारित बियाणे, जैविक खते, जैविक बुरशीनाशके तसेच सेंद्रिय शेतीसाठी उपयुक्त विविध कृषी निविष्ठा ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून उपाययोजना कराव्यात.

जाहीर सुचना

दि. २७.११.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, राजकुमार मोहनलाल कोठारी रा अकोला, ता.जि. अकोला यांनी मौजे मलकापुर, ता. जि. अकोला येथील सर्व्हे नं ५/१, नझूल शिट क्र ८२, नझूल प्लॉट क्र २/१/६८, लेआऊट प्लॉट नं २, सब- डिव्हिजन प्लॉट नं २-ए २-बी, वर बांधलेल्या 'केडिया कॉम्प्लेक्स' या इमारतीमधील तळमजल्यावरील दुकान क्र जी-१, व जी-२, बाबतचे आधीचे दोन मुळ खरेदीखत दि. १३.९.२०१०, दस्त क्र ३६७९ व १२.२.२००७, दस्त क्र ४३४, हे दोन्ही मूळ खरेदी खत हरवले/अनावधानाने गहाळ झाले आहे, व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत रीतसर पो स्टे येथे कार्यवाही केली आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्तेबाबत वा दस्ताबाबत, वा कागदपत्रांबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन चौदा(१४)दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

शिशिर अरविंद देशपांडे
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो. ९८२३०९१३७७

विद्यार्थ्यांना हक्क, कर्तव्ये अन् लोकशाही मूल्यांचे धडे

सत्यशील ग्रुपचा पुढाकार : सामान्य ज्ञान परीक्षेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■



भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधत विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी येथील प्रभूसिंग नाईक विद्यालयात सत्यशील ग्रुपच्या वतीने सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले. संविधानातील हक्क, कर्तव्ये, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, तसेच संविधानाविषयीची जिज्ञासा वाढावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

सत्यशील ग्रुपचे अध्यक्ष अमोल नवघरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या परीक्षेचे नियोजन उपाध्यक्ष धम्मपाल कांबळे, सचिव ज्ञानेश्वर जामणीक, कोषाध्यक्ष जितेंद्र खंडारे, सदस्य सुमंत नवघरे आणि वंश कांबळे यांनी केले.यावेळी संविधानाचे अभ्यासक ॲड. सुमित नाजूक (मोहोड) आणि प्राचार्य नरेंद्र इंगळकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. भारतीय संविधानाची निर्मिती, त्यामागील विचारधारा, नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्ये यांचे महत्त्व त्यांनी विविध उदाहरणांतून स्पष्ट केले. संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा आणि सामाजिक समतेचा आधार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. याप्रसंगी शिक्षिका जामनिक, विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सत्यशील ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांसह शाळेच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

कृषी सचिवांकडून फळबाग, शेततळे, शेती पिकांची पाहणी

अकोला : जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करण्यासाठी विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी अभियान (व्हीबी-जी राम जी) अंतर्गत अधिकाधिक कामे हाती घ्यावीत. चारा लागवड आणि जल संचयनावर विशेष लक्ष केंद्रित करून जिल्ह्यात कायमस्वरूपी मत्ता व पायाभूत संरचना उभारण्याचे दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे निर्देश कृषी विभागाचे सचिव तथा पालक सचिव परीमल सिंह यांनी आज येथे दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत जिल्ह्यातील दुष्काळ स्थिती व उपाययोजनांचा श्री.सिंह यांनी आज सविस्तर आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा मीना, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने, उपवनसंरक्षक सुमंत सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्यासह विविध विभागांचे जिल्हाप्रमुख उपस्थित होते. श्री. सिंह म्हणाले की, जिल्ह्यातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी जल संचयन व चारा लागवडीचे प्रभावी नियोजन करावे.

अकोला महानगरपालिका, अकोला
पाणी पुरवठा विभाग
निविदा सुचना क्र. १०, सन २०२६-२७

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मार्फत १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. ०७ मध्ये गौरक्षण भागातील तपे हनुमान मंदीर समोरील विहीरीमध्ये सबमर्सिबल पंप टाकणे व गौरक्षण भागात ९० मीमी व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे या कामाची ई-निविदा दि. २७-११-२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(संपर्क- ७७०९०४९३५१)
Portal https://mahatenders.in

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/पापु/ ३४८/२०२६, पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : २७/११/२०२६

जाहीर नोटीस

वि. ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१९१६/२०२६ प्रोसेस नं.१४७०७/२०२६
चौ.ता. १९/१२/२०२६ दिनांक : २३/११/२०२६

अर्जदार : १. रेखा गोपालन चरकोलु २. शिल्पा सचिन इंगळे रा. गड्डम वाडा, गड्डम प्लॉट, व्हि. टी. सी. अकोला, ता. जि. अकोला ३. पायल प्रसाद महलवार ४. धनश्री गोपालन चरकोलु क. १. ३ व ४ रा. चांडक मंगल कार्यालयाच्या जवळ, गड्डम प्लॉट, जठारपेठ, अकोला ता. जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.
मयताचा पत्ता :- मयत : १. गोपालन महेश चरकोलु
पत्ता :- रा. गड्डम वाडा, गड्डम प्लॉट, व्हि. टी. सी. अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, गोपालन महेश चरकोलु यांचे दि. ११/०५/२०२६ रोजी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/११/ २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोला

चौकशीची जाहिर नोटीस
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- १५/२०२६ कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : हनुमान मंदीर मळसूर, ता. पातुर, जि. अकोला.

अर्जदार : श्रभ्. अशोकराव सुखदेव देवकते, रा. पातुर, जि. अकोला.

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्दावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- काही नाही.

आ)स्थावर मिळकत (वर्णन) :- मौजे मळसूर, ता. पातुर, जि. अकोला. येथिल मालमत्ता क्र.170, एकुण जागेचे क्षेत्रफळ - 10x10=100चौ. फुट, या वर बांधकाम केलेले हनुमान मंदिर आहे

जागेची चतु:सिमा : पुर्वेस- डीगांबर देवकते यांचे घर, पश्चिमेस - मुख्य चौक, उत्तरेस - अशोक देवकते यांचे घर, दक्षिणेस - मुख्य रस्ता. प्रत्येक स्थावर मालमत्तेची व बांधकामाची किंमत १५,००,०००/- पंधरा लाख रुपये

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक २७/११/ २०२६ रोजी दिली.

अधिक्षक
शिक्का — सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

चौकशीची जाहिर नोटीस
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- ३९/२०२६ कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नाव : त्रिरत्न बुध्द विहार ट्रस्ट, म्हैसपुर ता. जि. अकोला
अर्जदार :- श्री दिलीप संपत इंगळे, रा. सिध्दार्थ नगर, तारफैल अकोला ता.जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्दावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- विश्वस्त व्यवस्था निधी रु. १०००/- अध्यक्षांच्या ताब्यात जमा आहेत.

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १५/१०/२०२६ रोजी दिली.

अधिक्षक
शिक्का — सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

चौकशीची जाहिर नोटीस
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- ६०/२०२६ कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : जय हनुमान मंदीर ट्रस्ट आरिफ नगर शिर्ला (पातुर), ता. पातुर, जि. अकोला.

अर्जदार : सौ.सोनाली संदिप चव्हान, रा.अकोला.

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्दावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- रु.१०००/- अध्यक्षांच्या ताब्यात जमा आहे.

आ)स्थावर मिळकत (वर्णन) :- काही नाही..

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक २६/ ११/ २०२६ रोजी दिली.

अधिक्षक
शिक्का — सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

चौकशीची जाहिर नोटीस
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- ६०२/२०२६ कलम २२ नेमता तारिख : १८/१२/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- शहिद विनोद मोहोड बहुउदेशिय व व्यायाम मंडळ, कुरणखेड, ता.जि. अकोला. अकोला. एफ -१०६७६ नोदणी क्रमांक एफ - १०६७६ - बाबत

अर्जदार :- १) श्री. दिलीप मारोती मोहोड रा.जि. अकोला.

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की,

धर्मादाय उप आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्दावर चौकशी करणार आहेत.

~~१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?~~

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- काहि नाहि

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- मौजे कुरणखेड,ता.जि. अकोला. येथील मालमत्ता क.2155 एकुण जागेचे क्षेत्रफळ 2091.07 चौ.फुट त्यावर केलेले बांधकाम 23x33=759 चौ.फुट 18x41=738 चौ. फुट 22500 खुली जागा. त्या जागेचे चतुसिमा खालीलप्रमाणे.

मालमत्तेची चतुसिमा : पुर्वेस खुली जागा, पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस - खुली जागा दक्षिणेस :

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

हजारो बांधकाम कामगारांचे हक्क रोखणाऱ्या अधिकाऱ्यांची हकालपट्टी करा

किशोर दहिफळकर यांच्यावर किसान सभेचा गंभीर आरोप
मुख्यमंत्र्यांकडे यशवंत झाडे यांची थेट मागणी, हिवाळी अधिवेशनात आंदोलनाचा इशारा

वर्धा/जनमाध्यम

जिल्ह्यातील हजारो बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नूतनीकरण आणि शासकीय कल्याणकारी योजनांचे अनुदान प्रशासकीय दिरंगाईच्या विळख्यात अडकले आहे. कामगारांच्या हक्काचे अनुदान मंजूर होऊनही रोखण्यात आल्याचा आरोप करीत अपर कामगार आयुक्त, नागपूर विभागाचे किशोर दहिफळकर यांची तातडीने हकालपट्टी करण्याची मागणी अखिल भारतीय किसान सभेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यशवंत ना. झाडे यांनी केली आहे. यासंदर्भात २४ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह कामगार विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना तक्रार निवेदन देण्यात आले आहे.



वर्धेच्या कामगारांनाच सापत्न वागणूक का

जानेवारी २०२५ पासून वर्धा जिल्ह्यातील पात्र बांधकाम कामगारांचे नोंदणी, नूतनीकरण आणि विविध अनुदान योजनांचे अर्ज मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. नागपूर विभागातील अन्य जिल्ह्यांमध्ये कामगारांच्या अर्जांवर कार्यवाही होत असताना वर्धेतील कामगारांना मात्र लाभासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. स्थानिक पातळीवर अर्ज निकाली काढण्याची व्यवस्था असताना ती अडथळ्यात आणली कोणी, असा प्रश्न झाडे यांनी उपस्थित केला आहे.

स्थानिक अधिकाऱ्यांचे अधिकार बाहेरच्या जिल्ह्यांना

वर्धेतील स्थानिक नोंदणी अधिकाऱ्यांचे लॉगिन अधिकार बदलून ते बाहेरील जिल्ह्यांकडे हस्तांतरित करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सहनियंत्रण समितीचे लॉगिन अधिकारदेखील बाहेरील अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. हे निर्णय कोणत्या शासन आदेशानुसार घेण्यात आले, सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी होती का? याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मंजूर अनुदानही रोखले; कामगारांनी न्याय मागायचा कुणाकडे

१७ फेब्रुवारी २०२६ रोजी काही बांधकाम कामगारांचे कल्याणकारी योजनांचे अर्ज मंजूर झाले होते. मात्र मंजुरीनंतरही अनुदानाची रक्कम होल्ड करण्यात आल्याची तक्रार किसान सभेने केली आहे.पात्र कामगारांच्या खात्यात हक्काची मदत जमा होण्याऐवजी ती रोखण्यामागील कारण काय, याचा खुलासा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

डिजिटल ऑडिट करा, दोषींवर कारवाई करा

केवळ बदली करून प्रश्न सुटणार नाही. लॉगिन अधिकार हस्तांतरण, आदेश, ई-मेल व्यवहार, अर्जांची मंजुरी-नामंजुरी आणि अनुदानाच्या आर्थिक नोंदींचे स्वतंत्र डिजिटल ऑडिट करावे. नियमबाह्य निर्णय आढळल्यास संबंधितांची वैयक्तिक जबाबदारी निश्चित करून कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कामगारांना न्याय न दिल्यास नागपूर हिवाळी अधिवेशनात बांधकाम कामगारांना सोबत घेऊन तीव्र लोकशाही आंदोलन छेडण्याचा इशारा यशवंत झाडे यांनी दिला आहे. हजारो कामगारांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह आणि मुलांचे शिक्षण या कल्याणकारी योजनांवर अवलंबून असताना प्रशासकीय दिरंगाईमुळे त्यांना वंचित ठेवू नये. कामगारांचे अर्ज तातडीने निकाली काढून अनुदान वितरित करावे, हीच आता कामगारांची अपेक्षा आहे.

संक्षिप्त

कामावर गेलेला तरुण बेपत्ता

आर्वी - तालुक्यातील कासारखेडा येथील सागर विनोद बावणे (२५) हा तरुण कामावर जाण्याचे सांगून घराबाहेर पडला; मात्र अद्याप घरी परतला नाही. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता तो नेहमीप्रमाणे कामासाठी वर्ध्याकडे गेला होता. रात्री त्याचा मोबाईल बंद आढळल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध केली. नातेवाइकांसह कामाच्या ठिकाणीही चौकशी करूनही तो मिळून आला नाही. त्याची उंची पाच फूट, अंगाने सडपातळ असून अंगात काळ्या रंगाचे टी-शर्ट, निळ्या रंगाची जीन्स व पायात चॉकलेटी सँडल असे वर्णन आहे. याप्रकरणी खरांगणा पोलिसांत बेपत्ता असल्याची नोंद करण्यात आली असून पोलीस शोध घेत आहेत.

गोवंश वाहतूक रोखताना बोलेरोची धडक

तळेगाव - गोवंशाची वाहतूक करणारे वाहन अडविण्याच्या प्रयत्नात बोलेरो पिकअप चालकाने धडक दिल्याने बजरंग दलाचा कार्यकर्ता सुनील वाधा गंभीर जखमी झाला. तळेगाव परिसरातील वर्धमनेरी गावाजवळ ही घटना घडली. गोवंशाने भरलेली पिकअप गाडी पंचर झाल्याची माहिती मिळाल्यानंतर सुनील मदतीसाठी घटनास्थळी गेला होता. दरम्यान, पिकअप चालकाने वाहन जोरात अंगावर घातल्याने तो बोनेटवर आदळून रस्त्यावर पडला. वाहनाचे चाक त्याच्या उजव्या मांडीवरून गेल्याने हाड फ्रॅक्चर झाले. त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलविण्यात आले. याप्रकरणी तळेगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वडिलांच्या हल्ल्यात मुलगा जखमी

सेलू - घरगुती वादातून वडिलांनी मुलाच्या कपाळावर वासल्याने वार करून जखमी केल्याची घटना सेलू येथे घडली. योगेश शंभरकर (२५) असे जखमी मुलाचे नाव आहे. २४ नोव्हेंबर रोजी वडिलांसोबत झालेल्या वादानंतर योगेश बकऱ्या बांधण्यासाठी जुन्या घरी गेला होता. परत आल्यानंतर घराचा दरवाजा आतून बंद असल्याने त्याने दगडाने काच फोडून कडी उघडली. यावेळी वडील भुजंग शंभरकर यांनी घरातील वासल्याने त्याच्या कपाळावर वार केला. यात त्याला जखम होऊन रक्तस्राव झाला. याप्रकरणी योगेशने भावासह सेलू पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी नोंद घेतली आहे.

बुद्धविहारातील १५ किलोची पितळी बुद्धमूर्ती चोरीला

वर्धा - शहरातील बापटवाडी परिसरातील बुद्धविहाराला लागून असलेल्या संस्थेच्या कार्यालयाचे कुलूप तोडून चोरट्यांनी ४४ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला. ही घटना २५ नोव्हेंबरच्या सायंकाळपासून २६ नोव्हेंबरच्या सकाळदरम्यान उघडकीस आली. श्रीरत्न बौद्ध महासंघाचे कार्यालय महेंद्र कांबळे यांच्या घरात भाड्याने असून तेथे संस्थेचे साहित्य ठेवण्यात येते. २६ नोव्हेंबर रोजी पदाधिकारी कार्यालयात पोहोचले असता कुलूप तुटलेले दिसले. पाहणी केली असता सुमारे १५ किलो वजनाची पितळी बुद्धमूर्ती, पितळी बाऊल, अगरबत्ती स्टँड, पानपात्र आणि भिक्षापात्राच्या आकाराची पितळी घंटा असा ४४ हजारांचा ऐवज गायब होता. याप्रकरणी रामनगर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

लग्नासाठी गेलेल्या कुटुंबाचे घर फोडले

हिंगणघाट - घरातील सदस्य लग्नासाठी बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी संत तुकडोजी वार्डातील घर फोडून लाखोंचा ऐवज लंपास केला. अजय लांडगे यांच्या कुटुंबातील सदस्य २५ नोव्हेंबर रोजी अकोला येथे लग्नासाठी गेले होते. दरम्यान, चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. देवघरातील दोन आलमारींचे दरवाजे आणि लॉकर फोडून सोन्याचे कानातील दागिने, अंगठ्या, लॉकेट, चांदीचे पैंजण, पायपट्ट्या, गोफ आणि साखळी असा ऐवज चोरून नेला. याशिवाय घरातील १ लाख ३० हजारांची रोकड आणि १६ हजार ४०० रुपये किमतीचा मोबाईलही लंपास केला. एकूण २ लाख ६१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याची तक्रार हिंगणघाट पोलिसांत दाखल करण्यात आली असून अज्ञात चोरट्याचा शोध सुरू आहे.

आंजी मोठीत शिवसेनेची शाखा स्थापन

शाखाप्रमुखपदी प्रफुल कोठे, तर उपशाखाप्रमुखपदी तिघांची निवड

आंजी मोठी/जनमाध्यम

आंजी मोठी येथे २२ नोव्हेंबर रोजी शिवसेना (शिंदे गट) शाखेची स्थापना उत्साहात करण्यात आली. यावेळी सुमारे ५५ ते ६० तरुणांनी शिवसेनेत प्रवेश घेतला. शाखाप्रमुखपदी प्रफुल कोठे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



कार्यक्रमाच्या प्रारंभी संत नारायण महाराज, प्रभू श्रीरामचंद्र, छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी लोकसभा संघटक रविकांत बालपांडे, जिल्हाप्रमुख प्रशांत (बाळा) शहागडकर, उपजिल्हाप्रमुख संजय गिरी, अविनाश भांडे, गजानन नेवारे, गौतम गजबे व बंडू मुळे उपस्थित होते.उपशाखाप्रमुखपदी अक्षय पेटकर, चेतन नागपुरे व रितेश चंदनखेडे, शाखा सचिवपदी महादेव पवार, प्रसिद्धीप्रमुखपदी तुषार पांडे, तर संघटकप्रमुखपदी गुणवंत पचारे यांची नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तिपत्र व शिवसेनेचा दुपट्टा देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी बालपांडे, शहागडकर व गिरी यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.संचालन संकेत वैद्य यांनी केले, तर आभार प्रफुल कोठे यांनी मानले.

कांचन रघाटाटेचा नागपूर विद्यापीठ हॉलीबॉल संघात चौथ्यांदा निवड

पवनार/जनमाध्यम

जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर ग्रामीण भागातील खेळाडूही मोठी भरारी घेऊ शकतात, हे पवनारच्या कांचन दीपकराव रघाटाटे हिने सिद्ध करून दाखविले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हॉलीबॉल संघात सलग चौथ्यांदा निवड होण्याचा बहुमान मिळविणाऱ्या कांचनने यंदा संघाच्या नेतृत्वाची जबाबदारीही समर्थपणे सांभाळली. गुजरात येथे झालेल्या पश्चिम विभागीय हॉलीबॉल



स्पर्धेत तिने विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधित्व केले.

कांचन ही गांधीग्राम विद्यालय, वर्धा येथील विद्यार्थिनी असून चैतन्य स्पोर्टिंग क्लब, पवनारची खेळाडू आहे. नियमित सराव, खेळाप्रती असलेली निष्ठा आणि जिद्दीच्या जोरावर तिने विद्यापीठाच्या संघातील आपले स्थान सलग चार वर्षे कायम राखले.या यशामागे दीपक उमाटे आणि विनोद चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. आई-वडिलांचे पाठबळ आणि चैतन्य स्पोर्टिंग क्लबमधील सरावानेही तिच्या यशाला बळ दिले. कांचनच्या यशाबद्दल क्लबचे अध्यक्ष मुरलीधर वैद्य, मनीष ठाकरे, अनिल वाघमारे, किशोर वैद्य, सतीश हिंगे, मुकेश वाघमारे यांच्यासह पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले. ग्रामीण भागातील मुलींसाठी कांचनची कामगिरी प्रेरणादायी ठरत आहे.

संविधानाचे संरक्षण, संवर्धन प्रत्येक भारतीयाची जबाबदारी

ॲड.अविनाश काकडे यांचे प्रतिपादन

वर्धा/जनमाध्यम

भारतीय संविधान हा देशाचा सर्वोच्च कायदा असून संविधानापेक्षा मोठे कोणतेही पद, व्यक्ती किंवा संस्था नाही. संविधानाने प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार दिले असून त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन किसान अधिकार अभियानचे प्रेरक ॲड. अविनाश काकडे यांनी केले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जिल्हा व शहर शाखेच्या पुढाकाराने तलमले आयटीआय येथे संविधान स्वीकार दिनानिमित्त प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. मंचावर समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, प्राचार्य बिजेकर आणि ॲड. काकडे उपस्थित होते.अधिकारांसोबत नागरिकांची कर्तव्येही महत्त्वाची असून प्रत्येकाने संविधान समजून घेऊन जागरूक व जबाबदार नागरिक बनले पाहिजे, असे आवाहन काकडे यांनी केले.प्रास्ताविकात गजेंद्र सुरकार यांनी संविधान महोत्सवाची संकल्पना मांडली. संचालन व आभारप्रदर्शन प्रा. तिवारी यांनी केले. कार्यक्रमासाठी प्राध्यापकवृंदाने परिश्रम घेतले.

वक्फ दरगाहच्या कारभारावर संशयाचे सावट

पवनारमध्ये नवीन योजनेविरोधात ट्रस्ट आक्रमक

पवनार/जनमाध्यम

वक्फ दरगाह सय्यद अहमद कबीर (र.अ.) ट्रस्टच्या व्यवस्थापनावरून पवनारमध्ये वाद चिघळला आहे. पूर्वीपासून नोंदणीकृत असलेल्या ट्रस्टची मंजूर योजना आणि शासकीय राजपत्रातील नोंद अस्तित्वात असताना नवीन वक्फ योजना लागू करण्याच्या हालचालींना ट्रस्टने तीव्र विरोध दर्शविला आहे. खोटे प्रतिज्ञापत्र, कागदपत्रांमध्ये फेरफार आणि आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करीत ट्रस्टचे अध्यक्ष इंजि. अल्ताफ अली यांनी स्वतंत्र चौकशीची मागणी केली आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे MSWB/२५/२००७ या क्रमांकाने नोंदणीकृत असलेल्या संस्थेच्या मूळ अभिलेखांची पडताळणी न करता नवीन योजना पुढे रेटली जात असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. संबंधित कार्यालयातील दरगाह प्रकरणाच्या फाइलमधील महत्त्वाची कागदपत्रे गहाळ झाल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. तत्कालीन मोहम्मद आबिद आणि कनिष्ठ लिपिक यांच्या भूमिकेची चौकशी करून आवक-जावक रजिस्टरसह संपूर्ण अभिलेख तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, ट्रस्ट अध्यक्षांना आठ दिवसांची नोटीस बजावण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत विद्यमान समितीविरुद्ध एकतर्फी कारवाई करू नये, अशी भूमिका ट्रस्टने घेतली आहे.विशेष म्हणजे, अधिसूचना प्रसिद्ध करण्यासाठी एका व्यक्तीने ५० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप ट्रस्टच्या उपाध्यक्षांनी मंत्र्यांकडे केलेल्या तक्रारीत केल्याचे निवेदनात म्हटले आहे. तत्कालीन जिल्हा वक्फ अधिकारी मोहम्मद रेहान यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.मुख्यमंत्री कार्यालय आणि अल्पसंख्याक आयोगाकडे केलेल्या पत्रव्यवहारावर प्रशासनाने काय कारवाई केली, याचा अहवाल जाहीर करावा. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अल्ताफ अली यांनी केली आहे.

रा.सुं. बिडकर महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात; उद्देशिकेचे सामूहिक वाचन

हिंगणघाट/जनमाध्यम

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेने आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये केवळ पुस्तकापुरती मर्यादित न ठेवता दैनंदिन जीवनात आचरणात आणली पाहिजेत, असे प्रतिपादन ॲड. सपना मधान यांनी केले.

येथील रा. सुं. बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान



महाविद्यालयात २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बालाजी राजुरकर होते. प्रमुख मार्गदर्शक ॲड. सपना मधान, तर प्रमुख अतिथी म्हणून ध्येय समन्वयक डॉ. शरद विहिरकर उपस्थित होते.यावेळी मधान यांनी नागरिकांचे मूलभूत अधिकार, कर्तव्ये, महिलांचे अधिकार आणि सामाजिक न्याय याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. विहिरकर यांनी लोकशाही मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले, तर प्राचार्य डॉ. राजुरकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचे महत्त्व विशद केले. विद्यार्थिनी पूजा कुमारी आंदे हिने संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून उपस्थितांना शपथ दिली. संचालन सौरभ सराटे यांनी केले. अभिषेक वनकर यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

रानडुकरांचा तीन एकरांतील पऱ्हाटी पिकावर हल्ला

विरूळ आकाजी/जनमाध्यम

जंगली जनावरांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी पुरता त्रस्त झाला असून, शेती करावी तरी कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. कर्ज काढून, पदरमोड करून आणि अहोरात्र मेहनत घेऊन उभे केलेले पीक जंगली जनावरांच्या धुमाकुळामुळे क्षणात उद्ध्वस्त होत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

विरूळ आकाजी येथील संदीप चाफले आणि गुड्डू चाफले यांच्या शेतातील तब्बल तीन एकरांवरील पऱ्हाटी पिकाचा रानडुकरांनी फडशा पाडला. रानडुकरांच्या कळपाने संपूर्ण पिकाची नासधूस केल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. मोठ्या मेहनतीने आणि खर्च करून पिकविलेले पीक डोळ्यादेखत उद्ध्वस्त झाल्याने दोन्ही शेतकरी हतबल झाले आहेत.

एकीकडे नैसर्गिक संकटे, वाढता शेतीचा खर्च आणि दुसरीकडे जंगली जनावरांचा उपद्रव, अशा दुहेरी संकटात शेतकरी भरडला जात आहे. आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांचे पीक वन्यप्राण्यांकडून उद्ध्वस्त होत असल्याने आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत शेतीचा खर्च कसा भरून काढायचा, कर्जाची



परतफेड कशी करायची, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक स्विकारणार ५ डिसेंबरला पदभार

वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक होणार आर्थिक सक्षम

वर्धा/जनमाध्यम

वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सक्षमतेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्यानुसार दिवाळीच्या मुर्हतावर सहकार पणन व वस्त्रोद्योग मंत्रालयाने शासन आदेश निर्गमित केला होता.त्या अनुषंगाने राज्य सहकारी बँकेचे प्रशासक ५ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हा सहकारी बँकेचा पदभार स्विकारणार आहे.

२१ ऑगस्ट २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी निवेदन देऊन वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वर्तमान सद्यस्थितीकडे लक्ष वेधले होते. बँकेची स्थापना २१ ऑक्टोबर १९१२ रोजी झाली असून तिला ११४ वर्षांचा प्रदीर्घ इतिहास आहे. सन २००२ पासून बँक आर्थिक अडचणीत आली होती. सन २०१४ मध्ये बँकेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. पालकमंत्री तथा सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या प्रयत्नामुळे बँकेला सक्षम करण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर मार्च २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर ही महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी, अशी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे. ही नियुक्ती झाल्यास बँकेच्या प्रशासकीय व आर्थिक कारभाराला अधिक सक्षम दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली होती.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या मागणीची मुख्यमंत्री फडणवीस यांनी गांभीर्याने दखल घेत सहकार विभागाचे प्रधान सचिव यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.त्याअनुषंगाने सहकार पणन व वस्त्रोद्योग मंत्रालयाने शासन आदेश निर्गमित करीत वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप दिघे यांनी २१ नोव्हेंबर रोजी वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्राधिकृत अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे यांना पत्र निर्गमित करून राज्य सहकारी बँकेचे प्रशासक ५ डिसेंबर रोजी पदभार स्विकारणार असल्याचे कळविले आहे. याप्रसंगी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, खा. अमर काळे, आ. समीर कुणावार, सुमित वानखेडे, राजेश बकाने, अरुण लखाणी, सुधाकर आडबैले, अभिजीत वंजारी, जिल्हाधिकारी वानमंथी सी, यांच्या सह प्रमुख अधिकारी व मान्यवर मंडळी उपस्थित राहनार आहे.

सहकारी बँकसाठी महत्वपूर्ण पाऊल

वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसाठी महत्वपूर्ण पाऊल आहे. राज्य सहकारी बँक चे अधिकारी प्रशासक म्हणून कार्यभार स्वीकारणार आहे.त्यामुळे जिल्हा बँक सक्षम होण्यास मोठी मदत होणार आहे. सदर कार्यक्रमास शेतकरी बांधव व नागरिकांनी उपस्थित राहावे.

गौतम वालदे- जिल्हा उपनिबंधक वर्धा

जनमाध्यम न्युज ॲन्ड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१५ अंक ३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

MAHAVITARAN
Quotation/Enquiry Notice

Separate sealed quotation in prescribe forms are invited for execution of enquiry for

1) Work contract for annual maintenance of Electrical Installation & Water Tabs, Water Pipes at Administrative Building of Urban Division office, rest house & offices under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/4107 Dt. 25.11.2026).

2) Labour contract work for Loading, Unloading & Transportation of 200 KVA DT's from Akola Major Store to Amravati Urban Division Store Amravati under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/4108 Dt. 25.11.2026).

3) labour contract work for Loading, Unloading & Transportation of 200 KVA & 315 KVA DT's from Dhule Major Store to Amravati Urban Division Store Amravati under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/4109 Dt. 25.11.2026).

4)Quotation for labour contract work for Loading, Unloading & Transportation of 200 KVA DT's from Jalgaon Major Store to Amravati Urban Division Store Amravati under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/4110 Dt. 25.11.2026).

5)Labour contract for engaging an agency for typing, various letters Setting, editing & printing of documents and formats at division office for Technical, Audit & HR section work under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/4111 Dt. 25.11.2026).

6)Work contract hiring (on rental basis) of 1 No. vehicle (Tata Sumo) for newly established flying squad unit under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/4112 Dt. 25.11.2026).

7)Work contract for hiring of vehicle (Tata Sumo/Mahendra Bolero or similar) for B&R Urban Sub-Division No. I under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/4113 Dt. 25.11.2026).

8) Work contract for providing drinking water can at Urban Division office & Major Store under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/4114 Dt. 25.11.2026).

Last date for submission of quotation – 02.12.2026.
PRO 220/2026

EXECUTIVE ENGINEER, URBAN DIVISION, MSEDCL, AMRAVATI.

१४.५६ लाखांच्या गांजासह आरोपी जेरबंद

चिखलदरा/प्रतिनिधीः- पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्याकडून राबवण्यात येत असलेल्या विशेष मोहिम 'ऑपरेशन कवच' अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्यांविरोधात दोन मोठ्या कारवाई केल्या आहेत. चिखलदरा आणि मंगरुळ दस्तगीर पोलीस ठाणे क्षेत्रात करण्यात आलेल्या या कारवाई मध्ये पोलिसांनी १४.५६ लाख रुपये किमतीची गांजाची झाडे तसेच अवैध वाळू वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर-ट्रॉली जप्त केला आहे.

पहिली कारवाई २६ नोव्हेंबर रोजी चिखलदरा पोलीस ठाणेतंर्गत करण्यात आली. गस्ती दरम्यान पोलीस पथकाला गोपनीय माहिती मिळाली की ग्राम कुळंगणा खुर्द निवासी राजाराम धिकार हे विक्रीच्या उद्देशाने आपल्या शेतात अवैधरित्या गांजाची झाडे लावत आहेत. माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिसांनी आरोपी राजाराम ठाकूर धिकार (वय ४५, कुळंगणा) यांच्या शेतावर धाड टाकली. झडती दरम्यान शेतात झोपडी समोर वेगवेगळ्या ठिकाणी मधून-मधून लावलेली गांजाची लहान-मोठी एकूण ३७ झाडे जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या गांजाचे एकूण वजन २९.१२० किलोग्रॅम असून त्याची अंदाजे किंमत १४ लाख ५६ हजार रुपये आहे. या प्रकरणात चिखलदरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि आरोपीला अटक केली आहे. दुसरी कारवाई मंगरुळ दस्तगीर पोलीस



ठाणे क्षेत्रात करण्यात आली. २६ नोव्हेंबर रोजी गस्ती दरम्यान पथकाला माहिती मिळाली की सोनगाव खुर्द येथील चंद्रभागा नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळू उत्खनन करून ट्रॅक्टरच्या माध्यमातून वाहतूक केली जात आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून कारवाई करत निळ्या रंगाचा सोनालिका ट्रॅक्टर आणि वाळूने भरलेली विना नंबरची ट्रॉली रंगेहाथ पकडली. तपासात समोर आले की हा ट्रॅक्टर आरोपी मुकेश विष्णूजी नेवारे (वय ३२, सोनगाव) आणि ट्रॅक्टर मालक आकाश सतीशराव गायकवाड यांचा आहे. आरोपी यांकडून ट्रॅक्टर एमएच ३२ पी ३८२८ आणि विना नंबरची ट्रॉली जप्त करण्यात आली आहे. दोन्ही आरोपीविरुद्ध मंगरुळ दस्तगीर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ट्रॅक्टर चालक मुकेश नेवारे याला अटक करण्यात आली आहे तर मालक आकाश गायकवाड फरार आहे.

पाहिजेत

रात्रपाळीत पार्ट टाईम मशीन वर कामासाठी होतकरु मुले पाहिजे

संपर्क
९९७५३१३५९६

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
किरकोळ (R.M.J.C.)क्र.३२८/२०२६ ने.ता. १२.०१.२०२७

अर्जदार : १. चित्रा दीपकराव घाटे
२. निरंजन दीपक घाटे, दोन्ही रा.सिध्दनाथपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. विकास दीपक घाटे, रा.आदर्श नेहरु नगर, कॉग्रेसनगर, अमरावती
४. जीवन दीपक घाटे, रा.वडुरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **दीपक गंगारामजी घाटे** यांचा मृत्यू दि.**२२.१२.२०२५** रोजी सिध्दनाथपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार नं.१ ही पत्नी असून अर्जदार नं.२ ते ४ ही मुले आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२७.११.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

जाहीर नोटीस

एस.एस.भिंगारदेव, ०७ वे न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०७)
कि.कि.अर्ज नं.११३९/२०२६

अर्जदार - वंदना शंकरराव राऊत तर्फे सौ.वंदना नंदकिशोर जऊळकर रा.पोहोकार पुरा. कुंभारवाडा, वलगांव, ता.जि.अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू, नोंदणी विभाग ग्रामपंचायत वलगांव, ता.जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०७ मध्ये जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३)(अ) व प्रमाणे यातील अर्जदार अर्ज दाखल करतो की, अर्जदार नामे वंदना शंकरराव राऊत तर्फे सौ.वंदना नंदकिशोर जऊळकर, वय ४० वर्षे, रा.पोहोकार पुरा, कुंभारवाडा वलगांव, ता.जि.अमरावती यांचे चुलत आजोबा नामे लहानू नरसाजी राऊत यांचा मृत्यू दिनांक १५.१०.१९८४ रोजी झाला आहे अशी नोंद धरणेचा हुकूम होण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०७ यांनी आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०७ पुढील योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आदेशानुसार,
शिक्का
कनिष्ठ लिपिक
०७ वे न्यायालय, क.स्तर,
अमरावती

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात
आर.एम.जे.सी.क्र.७०९/२०२६ ने.ता.२६.११.२०२६

अर्जदार - १. श्रीमती मंदा तुळशिराम वासनिक, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
२. राहूल तुळशिराम वासनिक, वय ४० वर्षे, धंदा - शेती
३. निलेश तुळशिराम वासनिक, वय ३६ वर्षे, धंदा - शेती
४. शिवचरण तुळशिराम वासनिक, वय ३६ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.मायवाडी. पो.पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. सविता दिपक नागदिवे, वय ४४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पुसदा, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं. २ ते ५ यांचे वडील **तुळशिराम माधव वासनिक** हे दि.**१८.०४.२०२१** रोजी मायवाडी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झाले. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २६.१०.२०२६

आदेशानुसार,
शिक्का
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.ऐमन फातेमा मोहम्मद साजिद** पत्ता मोमीनपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.३२ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/36815 जुना मालमत्ता क्र. 32/400 नझुल शिट क्र.१५/२, २०/२ प्लॉट नं.६ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **हफिज खॉं हमीद** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या श्री.ऐमन फातेमा मोहम्मद साजिद नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **२५.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
पुर्वेस - प्लॉट नं.५-बी
पश्चिमेस - लेआऊटमधील ९ मि.रोड
उत्तरेस - लेआऊटमधील ९ मि.रोड
दक्षिणेस - दुसऱ्याचे शेत

शिक्का

मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

कार्यालय नगर परिषद, पांढरकवडा जि. यवतमाळ

नविन प्रशासकीय इमारत, पिन ४४५३०२
ई-मेल:- mcpandharkawada@gmail.com फॅक्स क्रमांक-०७२३५-२२७४६५ दुरध्वनी क्रमांक- ०७२३५-२२७५६८
जा.क्र/नपपां/बांध वि./कावि/१५४१/२०२६ दिनांक :- १२/११/२०२६

संक्षिप्त ई निविदा सुचना (दुसरी वेळ)

नगर परिषद पांढरकवडाच्या वतीने पांढरकवडा शहरात **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचीत विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविणे** निधी अंतर्गत विकास काम करणे करीता पांढरकवडा नगर परिषदेकडुन महाराष्ट्र शासनाकडील सार्वजनिक बांधकाम (स्थापत्य) विभागाचे कामाचे किमतीनुसार योग्य वर्गात पंजीबध्द असलेल्या कंत्राटदारा कडुन ई निविदा द्विलिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर दि.१०/१२/२०२६ पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे. कामाचे विवरण खालील प्रमाणे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकिय रक्कम	अनामत रक्कम	काम करण्याचा कालावधी	कोरे निविदा प्रपत्र शुल्क
१	२	३	४	५	६
	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचीत विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविणे निधी अंतर्गत				
	खुली निविदा				
१	नगर परिषद पांढरकवडा अंतर्गत डि.पी रस्ता बांधकाम करणे. (हॉटेल ले रीलॅक्स पासुन ते जंगोदाई टेकडी कडे जानाऱ्या पुल्ला पर्यंत.)	१२२३७४३४.४०/-	१३००००/-	३६० दिवस	१३०००/-

आतिश बोरेले
नगराध्यक्ष
नगर परिषद पांढरकवडा

आतिश चव्हान
उपनगराध्यक्ष
नगर परिषद पांढरकवडा

प्रफुल जिड्डेवार
बांधकाम सभापती
नगर परिषद पांढरकवडा

पंकज गावंडे
मुख्याधिकारी
नगर परिषद पांढरकवडा

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३८५/२०२६
Rehana Mohd.Zakir Mansoori+2 **-वि- निरंक**
पुढील ता.१५.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. Rehana Mohd.Zakir Mansoori Age 55 Yrs. Occu.: Household
2. Lubna Mohd.Zakir Mansoori, Age 28 Yrs. Occu.: Education
3. Nayla Mohd Zakir Mansoori, Age 24 Yrs. Occu.: Education
All R/o Near Rest House, New Town, Badnera, Tq. Dist.Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Mohd.Zakir Shaikh Ibrahim Mansoori हे दिनांक 15.06.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Rehana Mohd.Zakir Mansoori+2 -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rehana Mohd.Zakir Mansoori+2 -Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
किरकोळ (R.M.J.C.)क्र.३२६/२०२६ ने.ता. १२.०१.२०२७

अर्जदार : सचिन उमाकांत मोरे
रा.कंझरा, पो.धानोरा मोगल,
ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **उमाकांत पुंडलिकराव मोरे** यांचा मृत्यू दि.**१०.१०.२०२६** रोजी कंझरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला तसेच मयताची पत्नी नामे उर्मिला उमाकांत मोरे हिचा मृत्यू दिनांक १६.११.२००६ मध्ये कंझरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार नं.१ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २७.११.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
किरकोळ (R.M.J.C.)क्र.३२५/२०२६ ने.ता. १२.०१.२०२७

अर्जदार : १. प्रभा देवेंद्र गेडाम
२. निलेश देवेंद्र गेडाम, दोन्ही रा.मांजरी म्हसला,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. सीमा नरेंद्र देशभ्रतार, रा.वेणी गणेशपुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. स्मीता अमोल घोडेस्वार,
रा.रामनगर, चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे जि.अमरावती
-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **देवेंद्र सूर्यभान गेडाम** यांचा मृत्यू दि.**२५.०९.२०२६** रोजी मांजरी म्हसला, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार नं.१ ही पत्नी असून अर्जदार नं.२ हा मुलगा आहे. अर्जदार नं.३ व ४ ह्या मुली आहेत. आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२७.११.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

जाहीर नोटीस
मा.पी.एस.दास, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) दर्यापूर यांचे न्यायालय
ईतर कि.कि.अर्ज क्र. ९२/२०२६ ने.ता.२४.१२.२०२६

अर्जदार - रजियाबी अब्दुल अजीज (लग्नापुर्वीचे नांव)
रजियाबी शेख इस्माईल (लग्नानंतरचे नांव)
वय ६७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बेंबळा बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदार- सचिव, ग्रामपंचायत बेंबळा बु.
ता.दर्यापूर, जि.अमरावती

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार **रजियाबी अब्दुल अजीज (लग्नापुर्वीचे नांव) रजियाबी शेख इस्माईल (लग्नानंतरचे नांव)** यांनी जन्म व मृत्यू कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्माची तारखेची नोंदणी सचिव ग्रामपंचायत बेंबळा बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती यांचे कार्यालयात घेण्याकरीता या न्यायालयात अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदार **रजियाबी अब्दुल अजीज (लग्नापुर्वीचे नांव) रजियाबी शेख इस्माईल (लग्नानंतरचे नांव)** यांचा जन्म दि.०९.०१.१९५९ रोजी बेंबळा बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे झाला होता. त्याअर्थी सदरअर्जाबाबत कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा नेमलेली तारीख दि.२४.१२.२०२६ रोजी आपण सकाळी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) दर्यापूर येथे हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक २१.११.२०२६

आदेशानुसार,
शिक्का
सहायक अधीक्षक,
सह दिवाणी न्यायालय (क.स्तर)
दर्यापूर

जाहीर नोटीस
मा.पी.एस.दास, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) दर्यापूर यांचे न्यायालय
ईतर कि.कि.अर्ज क्र. ९१/२०२६ ने.ता.२४.१२.२०२६

अर्जदार - शेख अहेमद शेख अशदुल्ला
वय ५३ वर्षे, धंदा - मजुरी
रा.बेंबळा बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदार- सचिव, ग्रामपंचायत बेंबळा बु.
ता.दर्यापूर, जि.अमरावती

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार **शेख अहेमद शेख अशदुल्ला** यांनी जन्म व मृत्यू कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्माची तारखेची नोंदणी सचिव ग्रामपंचायत बेंबळा बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती यांचे कार्यालयात घेण्याकरीता या न्यायालयात अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदार **शेख अहेमद शेख अशदुल्ला** यांचा जन्म दि.०९.१२.१९७३ रोजी अर्जदाराचे राहते घरी बेंबळा बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे झाला होता. त्याअर्थी सदरअर्जाबाबत कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा नेमलेली तारीख दि.२४.१२.२०२६ रोजी आपण सकाळी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) दर्यापूर येथे हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक २०.११.२०२६

आदेशानुसार,
शिक्का
सहायक अधीक्षक,
सह दिवाणी न्यायालय (क.स्तर)
दर्यापूर

जाहीर नोटीस
मा.पी.एस.दास, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) दर्यापूर यांचे न्यायालय
ईतर कि.कि.अर्ज क्र. ९३/२०२६ ने.ता.२४.१२.२०२६

अर्जदार - शेख अफसर शेख सरवर
वय ६३ वर्षे, धंदा - मजुरी
रा.बेंबळा बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदार- सचिव, ग्रामपंचायत बेंबळा बु.
ता.दर्यापूर, जि.अमरावती

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार **शेख अफसर शेख सरवर** यांनी जन्म व मृत्यू कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्माची तारखेची नोंदणी सचिव ग्रामपंचायत बेंबळा बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती यांचे कार्यालयात घेण्याकरीता या न्यायालयात अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदार **शेख अफसर शेख सरवर** यांचा जन्म दि.१६.०२.१९६३ रोजी बेंबळा बु., ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे झाला होता. त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा नेमलेली तारीख दि.२४.१२.२०२६ रोजी आपण सकाळी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) दर्यापूर येथे हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक २०.११.२०२६

आदेशानुसार,
शिक्का
सहायक अधीक्षक,
सह दिवाणी न्यायालय (क.स्तर)
दर्यापूर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३८६/२०२६
Amitsingh Gurucharansingh Bagga+1 **-वि- निरंक**
पुढील ता.२३.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. Amitsingh Gurucharansingh Bagga, Age about 46 Yrs. Occu.: Business
2. Upendrasingh Gurucharansingh Bagga, Age about 45 Yrs. Occu.: Business
Both R/o Nehru Timber Mart, Gandhi Nagar, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Gurucharansingh Gopalsingh Bagga हे दिनांक 07.08.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Amitsingh Gurucharansingh Bagga+1 -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Amitsingh Gurucharansingh Bagga+1 -Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३३६/२०२६
Smt.Chandabai Vijayrao Gaud+5 **-वि- निरंक**
पुढील ता.१६.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. Smt.Chandabai Vijayrao Gaud, Age 66 Yrs. Occu.: Housewife
2. Sau.Dipali Sanjay Marodkar, Age about 45 Yrs. Occu.: Business
R/o New Chhangani Nagar, H.V.Nagar, Amravati.
3. Sau.Priti Sanjay Anasane, Age 44 Yrs. Occu.: Housewife
R/o At Po.Talegaon Mohana, Tq.Chandur Bzr. Dist.Amravati.
4. Ganesh Vijayrao Gaud, Age 42 Yrs. Occu.: Business
5. Mayur Vijayrao Gaud, Age 39 Yrs. Occu.: Business
6. Kalpesh Vijayrao Gaud, Age 39 Yrs. Occu.: Business
Appli.No.1,4,5 & 6 R/o Near MNP School No.6, Bhaji Bazar, Amravati.
-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Vijayrao Shrirampant Gaud हे दिनांक 24.02.2023 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Chandabai Vijayrao Gaud+5 -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Chandabai Vijayrao Gaud+5 -Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त



जनता विद्यालयात उद्देशिकेचे सामूहिक वाचन व प्रभात फेरी

अंजनगाव बारी-जनता विद्यालय, अंजनगाव बारी येथे भारतीय संविधान दिन विविध शैक्षणिक व प्रबोधनात्मक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने झाली.त्यानंतर संविधानाविषयी जनजागृती करण्यासाठी प्रभात फेरी काढण्यात आली.यानंतर विद्यार्थ्यांसाठी संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.स्पर्धेचे परीक्षक म्हणून मनीषा भगत व वैशाली ठाकरे यांनी काम पाहिले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक गजेंद्र अवघड होते. यावेळी पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर, मनीषा भगत यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय मार्गदर्शनातून गजेंद्र अवघड यांनी संविधान दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करत विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्ये दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन अमोल डवरे व अर्चना पोकळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजुदास राठोड तसेच सर्व शिक्षकवृंदांनी सहकार्य केले.संविधानाचे महत्त्व केवळ समजून न घेता ते आपल्या आचरणात आणण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.



टायटन्स पब्लिक स्कूलमध्य संविधान दिन

अंजनगाव बारी-विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीद्वारे संचालित टायटन्स पब्लिक स्कूल, बडनेरा येथे २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिपाठाचे आयोजन करून संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थिनी अंशिका हेमनानी हिने प्रभावीपणे केले. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्यानंतर स्वरा आंबडकर हिने आपल्या भाषणातून भारतीय संविधानाचे महत्त्व तसेच संविधानाने नागरिकांना प्रदान केलेले मूलभूत अधिकार याविषयी माहिती दिली. तर कृपाक्षी पुसदेकर हिने नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि देशाप्रती असलेली कर्तव्ये यांचे महत्त्व सोप्या व प्रभावी शब्दांत विशद केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेचे प्राचार्य अजय चौबे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघातर्फे संविधान दिन उत्साहात

अमरावती-स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य), अमरावती जिल्ह्याच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (इर्विन चौक) येथे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश मानेकर होते. यावेळी सामाजिक गोलमेज परिषदेचे पीठासीन अध्यक्ष भाऊसाहेब सरकटे, लायन्स क्लब नलदमयंती मोर्शीचे प्रशासकीय अधिकारी डॉ.प्रा.सुधर्म हांडे,लायन्स इंटरनॅशनलचे अमरावती रिजन चेअरपर्सन ॲड. प्रशांत देशमुख, शिवाजी मराठा हायस्कूलचे सेवानिवृत्त प्रा. अरुण हटवार, प्रभात एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष वि. दा. पवार,कॉम्रेड सुनील घटाळे,ॲड.पी.एस. खडसे आणि सामाजिक कार्यकर्ते गणेशदास गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाला स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाचे पदाधिकारी विजय हरणे पाटील, दीपक खडसे, शंकर खंडारे,भास्कर काळे,गजानन जिरापुरे,अमीर शहा,श्रीकृष्ण नाईक,अमोल खंडारे,सुरेश दहिकर, संजय वाघुळे,गजानन सावंत,अजय रामटेके,आदेश पाठक,विनोद शापामोहन,सुरेंद्र धामणकर यांच्यासह संघाचे अन्य सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन संजय सरवटकर यांनी केले,तर आभार पत्रकार संघाचे दर्यापूर तालुकाध्यक्ष विजय हरणे पाटील यांनी केले.

श्री हव्याप्र विद्यार्थ्यांच्या आविष्काराला 'पेटंट', ज्वारीच्या धांड्यापासून बनविला पर्यावरणपूरक 'सोर्घम स्ट्रॉ'

अमरावती/का.प्र.

महाराष्ट्रातील विदर्भ प्रांतात मोठ्या प्रमाणावर पिकवल्या जाणाऱ्या ज्वारीच्या धांड्यांपासून पर्यावरणपूरक 'सोर्घम स्ट्रॉ' तयार करण्याचा अभिनव प्रयोग श्री हव्याप्र मंडळ द्वारा संचालित डीसीपीई महाविद्यालयातील बीसीए विभागाच्या चार विद्यार्थ्यांनी यशस्वी केला असून, त्यांच्या या संशोधनाला नुकतेच पेटंट प्राप्त झाले आहे. पार्थ डुमरे, कोमल ठाकरे, हर्षल ढकारे आणि तेजस ठाकूर अशी या संशोधक विद्यार्थ्यांची नावे आहेत.

या संशोधनाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, ज्वारीचे पीक कापल्यानंतर शेतात उरणाऱ्या धांड्यांचा आणि कडबा-कुटाराचा प्रभावी



उपयोग करण्याची कल्पकता. मात्र, याच अवशेषांमध्ये उपयुक्त उत्पादननिर्मितीची मोठी क्षमता असल्याचे विद्यार्थ्यांनी सिद्ध केले आहे. ज्वारीच्या धांड्यांपासून स्ट्रॉ तयार करण्याच्या या संकल्पनेमुळे शेतीतील उपलब्ध नैसर्गिक संसाधनांना मूल्यवर्धित उत्पादनाचे स्वरूप मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे.

या अभिनव संशोधनाबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, मंडळाच्या सचिव तथा उपप्राचार्य प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, प्रा. दीपा कान्हेगावकर आणि प्रा. मयूर दलाल यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांना पेटंट प्रदान करण्यात आले. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ हे केवळ क्रीडा शिक्षण आणि प्रशिक्षणापुरते मर्यादित नसून आधुनिक शिक्षण, संशोधन, नवकल्पना आणि सामाजिक बांधिलकी यांची सांगड घालत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करीत आहे. विद्यार्थ्यांनी या यशाचे श्रेय मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सचिव प्रा.डॉ.माधुरी चेंडके, प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे तसेच मार्गदर्शक प्राध्यापकांना देत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे,उपाध्यक्ष डॉ.श्रीकांत चेंडके,सचिव डॉ. विकास कोटेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी वर्गाने या चारही



संशोधक विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

आडनदी प्रकल्पाबाबत आ. केवलराम काळेंची वनाधिकाऱ्यांसोबत चर्चा

सर्वेक्षणापुरतीच परवानगी; बांधकामाला अद्याप मंजुरी नाही

अचलपूर/वार्ताहर

मेळघाट विधानसभा मतदारसंघातील आडनदी येथे प्रस्तावित अदानी पंप स्टोरेज हायड्रोइलेक्ट्रिक प्रकल्पाबाबत सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर आ.केवलराम काळे यांनी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रकल्पाच्या सद्यस्थितीबाबत सविस्तर चर्चा केली. या प्रकल्पाबाबत विरोधकांकडून कोणतीही अधिकृत माहिती न घेता जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप आ.केवलराम काळे यांनी केला. वनविभागाने जारी केलेल्या अधिकृत प्रेस नोटमधून प्रकल्पाबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट झाली असून, सध्या केवळ सर्वेक्षण आणि भूगर्भीय तपासणीसाठी परवानगी देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.या बैठकीला अमरावतीच्या मुख्य वनसंरक्षक ज्योती बॅनर्जी, सहाय्यक



वनसंरक्षक योगेश तापस, महेश पाटील तसेच वनविभागाचे संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मेळघाट प्रादेशिक वनविभाग, परतवाडा यांनी जारी केलेल्या अधिकृत प्रेस नोटनुसार,आडनदी येथील प्रस्तावित अदानी एनर्जी टेन लिमिटेडच्या पंप स्टोरेज हायड्रोइलेक्ट्रिक प्रकल्पाच्या अनुषंगाने संबंधित कंपनीने प्रस्तावित क्षेत्रातील वनस्पती व प्राणी यांचे सर्वेक्षण तसेच जिओ टेक्निकल इन्व्हेस्टिगेशन करण्यासाठी परवानगी मागितली होती. त्यानुसार वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम १९८० आणि वन (संरक्षण एवं संवर्धन) नियम २०२३ मधील मार्गदर्शक तत्त्वांनुसार सर्वेक्षणासाठी परवानगी देण्यात आली आहे. मात्र, ही परवानगी केवळ सर्वेक्षण व भूगर्भीय तपासणीपुरती मर्यादित आहे. प्रत्यक्ष प्रकल्पाचे बांधकाम किंवा जलाशय निर्मितीसाठी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही.

विशेष म्हणजे, प्रस्तावित प्रकल्पासाठी वनजमीन वळतीकरणाचा कोणताही प्रस्ताव अद्याप वनविभागाला प्राप्त झालेला नसल्याचेही अधिकृत प्रेस नोटमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सर्वेक्षणासाठी दिलेली परवानगी आणि प्रत्यक्ष प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक असलेली मंजुरी या वेगवेगळ्या बाबी असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकल्पाबाबत प्रतिक्रिया देताना आ.केवलराम काळे म्हणाले की, 'आडनदी येथील अदानी प्रकल्पाबाबत विरोधकांनी कोणतीही अधिकृत माहिती न घेता केवळ जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.ते पुढे म्हणाले, 'वनविभागाच्या अधिकृत प्रेस नोटमधून सद्यस्थिती स्पष्ट झाली आहे. विरोधकांनी राजकारण करण्यापेक्षा आधी अधिकृत माहिती घ्यावी आणि त्यानंतरच जनतेसमोर आपली भूमिका मांडावी.जनतेची दिशाभूल होणार नाही,यासाठी वस्तुस्थिती समोर आणणे आवश्यक आहे.

आमदार काळे यांनी मेळघाटच्या पर्यावरणाच्या संरक्षणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, 'मेळघाट हा वनसंपदा, वन्यजीव आणि जैवविविधतेने समृद्ध असलेला परिसर आहे. येथील जंगल, वन्यजीव, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि आदिवासी बांधवांचे हित जपणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

मार्डीत श्री संत बळीराम महाराज पुण्यतिथी उत्सव व यात्रा महोत्सवाचे आयोजन

कुऱ्हा/वार्ताहर

तिवसा तालुक्यातील मार्डी येथील श्री संत बळीराम महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त षष्ठी उत्सव व यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या २८ ते ३० नोव्हेंबर या तीन दिवसांच्या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रम, हरिपाठ, भजन, कीर्तन, दिंडी प्रदक्षिणा, दहीहंडी उत्सव आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवामुळे मार्डी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. शनिवार, २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता तीर्थस्थापना करण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६ ते ७ या वेळेत हरिपाठ, तर रात्री ७ ते ९ या वेळेत वारकरी भजनी मंडळ मार्डी यांच्या वतीने भजन संध्येला सुरुवात होईल. रविवार, २९ नोव्हेंबर रोजी षष्ठी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत ह.भ.प. पंढरीनाथ महाराज सायट यांच्या हस्ते कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर दुपारी २ वाजता भव्य दिंडी प्रदक्षिणा काढण्यात येणार असून, पुढे गोरक्षनाथ महाराज मंदिर येथे दहीहंडी उत्सव होईल. सायंकाळी ६ वाजता श्री संत बळीराम महाराज मंदिर, मार्डी येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, ३० नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत प्रक्षाळ पूजनाचा कार्यक्रम होणार आहे. यानिमित्त ह.भ.प. तसरे महाराज (सालोरा) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. रात्री ८ ते १० या वेळेत समारोपीय वारकरी भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम होईल.या धार्मिक सोहळ्याला पंचक्रोशीतील भाविक, वारकरी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत बळीराम महाराजांच्या दर्शनाचा व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा.



संविधानातील मूल्ये दैनंदिन जीवनात रुजविण्याचा संकल्प करा-प्रा.प्रवीण सरदार

आसेगाव पूर्णा / किशोर मोकलकर

भारतीय लोकशाहीचा भक्कम आधार असलेल्या संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनात रुजवावीत, असे आवाहन प्रमुख मार्गदर्शक डॉ. प्रवीण सदार यांनी केले.आसेगाव पूर्णा येथील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त आयोजित अतिथी व्याख्यानात डॉ. सदार बोलत होते. भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका ही संपूर्ण राज्यघटनेचा गाभा असून,त्यातून न्याय,स्वातंत्र्य, समता आणि



बंधुता या मूल्यांची जाणीव होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुवर्णा जवंजाळ होत्या. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी सांगितले की,जात,धर्म,पंथ,भाषा अथवा लिंग असा कोणताही भेदभाव न करता प्रत्येक भारतीय नागरिकाला समान संधी आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे.प्रास्ताविक करताना प्रा.लिल्हारे यांनी संविधान दिनाचा उद्देश स्पष्ट केला. देशातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये, विशेषतः तरुण पिढीमध्ये घटनात्मक हक्क आणि मूलभूत कर्तव्यांविषयी जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे,असे त्यांनी सांगितले.

यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कार्यक्रमाचे संचालन व आभार राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.आशिष काळे यांनी केले. यावेळी प्राध्यापक डॉ.भारत कल्याणकर,डॉ.काळे,दिनेश वाटणे,मुक्ता निंभोरकर,अविनाश कडू यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कुऱ्हा गावात गावठी डुकरांचा सुळसुळाट; नागरिक त्रस्त

कुऱ्हा/वार्ताहर

तिवसा तालुक्यातील कुऱ्हा गावासह पिपला विहार कॉलनी परिसरात गेल्या काही वर्षांपासून गावठी डुकरांचा सुळसुळाट वाढला असून, नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या दोन वर्षांत या डुकरांची संख्या झपाट्याने वाढल्याने परिसरातील नागरिकांचे जगणे त्रस्त झाले आहे. ही डुकरे गावात कोणी आणून सोडली, याची चौकशी करून त्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

पूर्वीही कुऱ्हा गावात गावठी डुकरांचा त्रास होता. मात्र, ग्रामपंचायतीने त्यावेळी योग्य ती उपाययोजना करून डुकरांचा बंदोबस्त केला होता. त्यानंतर काही काळ नागरिकांना दिलासा मिळाला.गावातील गल्लीबोळांसह पिपळा विहार कॉलनी आणि इतर परिसरात ही डुकरे मोकाट फिरत आहेत. घरासमोर लावलेली झाडे उखडणे, अंगणातील वाळवणासाठी ठेवलेल्या वस्तूंची नासधूस करणे, खाद्यपदार्थ खाऊन टाकणे, तसेच घरांचे फाटक उघडे राहिल्यास थेट घराच्या आवारात घुसून नुकसान करणे, असे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडताना तसेच घरातील वस्तूंची काळजी घेताना मोठी कसरत करावी लागत आहे.

डुकरांच्या वाढत्या संख्येमुळे परिसरात



अस्वच्छता निर्माण होण्याबरोबरच नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या मोकाट डुकरांचा विशेष त्रास सहन करावा लागत आहे.या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायतीने तातडीने लक्ष देऊन गावात व पिपला विहार कॉलनी परिसरात मोकाट फिरणाऱ्या गावठी डुकरांचा बंदोबस्त करावा. तसेच ही डुकरे कोणी आणून सोडली, याची सखोल चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी आणि भविष्यात पुन्हा असा प्रकार घडू नये, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी एकमुखी मागणी कुऱ्हा व पिपला विहार कॉलनीतील नागरिकांनी केली आहे.

समान नागरी कायद्याबाबत रविवारी जनसुनावणी

संबंधित गट, संस्था व नागरिकांनी सहभागी व्हावे- नयना गुंडे

अमरावती/का.प्र.

समान नागरी कायद्याबाबत (यूसीसी) नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी अमरावती विभागात रविवार २९ नोव्हेंबर रोजी विभागीय स्तरावर विभागीय जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. या जनसुनावणीत हितसंबंधित गट, संस्था यांचे प्रतिनिधी तसेच नागरिकांनी निर्धारित दिवशी व निर्धारित वेळेत उपस्थित राहून आपली मते मांडावीत, असे आवाहन अमरावतीचे विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे. अमरावती महसूल विभागातील जनसुनावणीचे आयोजन रविवार २९ नोव्हेंबर रोजी अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातफे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात करण्यात आले आहे.सुनावणीचे नियोजन जिल्हानिहाय करण्यात आले असून २९ नोव्हेंबर रोजी अकोला जिल्ह्यासाठी सकाळी ११ ते १२ या वेळेत, वाशिम जिल्ह्यासाठी सकाळी १२.३० ते दुपारी १.३० या वेळेत, बुलढाणा जिल्ह्यासाठी दुपारी २.३० ते दुपारी ३.३० या वेळेत,



यवतमाळ जिल्ह्यासाठी दुपारी ४ ते सायंकाळी ५ या वेळेत आणि अमरावती जिल्ह्यासाठी सायंकाळी ५.३० ते सायं. ६.३० या वेळेत जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. संबंधित गट, संस्था यांचे प्रतिनिधी आणि नागरिक यांना नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती किंवा संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय येथे निर्धारित दिवशी,निर्धारित वेळेपुर्वी १ तास आधी सुनावणीकामी समक्ष उपस्थित राहता येईल. नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथील उपस्थितांची सुनावणी समितीसमोर समक्ष घेण्यात येईल व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या नागरीकांची सुनावणी व्हि.सी.द्वारे घेण्यात येईल.ज्या नागरिकांना केवळ ऑनलाईन पद्धतीने मते नोंदवायची आहेत त्यांना शासनाच्या www.ucc.maharashtra.gov.in या समान नागरी कायदा पोर्टल वर ३७ मुद्यांची माहिती देता येईल, असेही कळविण्यात आले आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर १४ डिसेंबरला मुख्यमंत्र्यांसोबत बैठक

चंद्रकांतदादा पाटील यांचे आश्वासन, अन्यथा बेमुदत कामबंदचा कृती समितीचा इशारा

अमरावती/का.प्र.

राज्यात गुरूवारी झालेल्या विद्यापीठांच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाची शासनाने गंभीर दखल घेत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी तातडीने सेवक संयुक्त कृती समितीच्या पदाधिका-यांसोबत बैठक घेतली. बैठकीत चंद्रकांतदादा पाटील यांनी येत्या १४ डिसेंबर रोजी कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक घेऊन तोडगा काढला जाईल, असे आश्वासन दिले. दुसरीकडे जर १४ डिसेंबर रोजी निर्णय झाला नाही तर बेमुदत कामबंद आंदोलन करू असा इशारा कृती समितीने दिला आहे. या बैठकीला शासनाचे उपसचिव



लुंबाळ,उपसचिव अशोक मांडे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सहसंचालक अर्चना बो-हाडे, विनायक टोमके तसेच सेवक संयुक्त कृती समितीच्यावतीने अध्यक्ष अजय देशमुख,रावसाहेब त्रिभूवन,मिलींद भोसले,दिनेश दखणे,प्रकाश म्हसे,माधवराव राऊळ,आनंदराव खामकर, चंद्रकांत धनवड, संतोष मदने, चंद्रशेखर कदम उपस्थित होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्रा चंद्रकांतदादा पाटील यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये मागणीपत्रातील राज्यातील शासकीय कर्मचा-यांप्रमाणे विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचा-यांना १०, २०,३० वर्षांची सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करणे, सन २००५ पूर्वी जाहिरात प्रक्रिया पूर्ण होऊन सेवेत रुजू झालेल्या ३८७ शिक्षकेतर कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील रिक्त पदे भरण्यास मान्यता देणे, विद्यापीठे व महाविद्यालयांना पाच दिवसांचा आठवडा लागू करणे व इतर मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या मागण्यांपैकी आर्थिक बाबींशी संबंधित प्रश्न वित्त विभागाच्या स्तरावर प्रलंबित असून, त्यावर अंतिम निर्णय होण्यासाठी मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक होणे आवश्यक असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी स्पष्ट केले. तसेच नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशन काळात वैयक्तिक पुढाकार घेऊन १४ डिसेंबर रोजी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक आयोजित करून सदर प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.तसेच विद्यापीठातील ३७४ शिक्षकेतर कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यास मान्यता मिळालेली असून पुढील कार्यवाही अंतीम टप्प्यात असून लवकरच याबाबत अधिसूचना व शासन निर्णय निर्गमित होईल असेही चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले. दरम्यान, सेवक संयुक्त कृती समितीची संघर्षाची भूमिका कायम असून, शिक्षकेतर कर्मचा-यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लागेपर्यंत हा लढा अविरत सुरुच राहणार आहे. १४ डिसेंबरच्या बैठकीत प्रलंबित प्रश्नांवर ठोस व समाधानकारक निर्णय झाला नाही, तर बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करू असा इशारा सेवक संयुक्त कृती समितीच्यावतीने देण्यात आला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

डॉ. मयूर धांडगे यांची जामिनावर सुटका

बाळ विक्री प्रकरण

ॲड.सपना जाधव यांचा यशस्वी युक्तिवाद

अमरावती/प्रतिनिधीः-

शहरातील बहुचर्चित अल्पवयीन मुलीचे बाळ ३.५ लाखात विक्री प्रकरणात अटक आरोपी डॉ. मयूर धांडगे यांना न्यायालयाने जामीन मंजूर केली आहे. ॲड. सपना जाधव यांनी या प्रकरणात यशस्वी युक्तिवाद केला. माहिती नुसार या प्रकरणात अल्पवयीन गरोदर असल्याने डॉ मयूर धांडगे ह्यांच्या कडे मार्च महिन्यात तपासनी साठी गेली असता, सदर डॉक्टर ने पीडितेला डॉ वैशाली भोजने ह्यांच्या कडे पुढील उपचार करिता जाण्यास सांगितले. त्यानंतर अल्पवयीन पीडिता ही मे महिन्यात डॉ वैशाली भोजने ह्यांच्या कडे उपचार करिता गेली असता, डॉ भोजने ह्यांनी, पीडितेला पाचवा महिना सुरु असून



तिला प्रसूती करून घेण्यास सांगितले. प्रसूती नंतर पीडितेचे बाळ ३.५ लाखमध्ये डॉ भोजने ह्यांनी विकल्याचे पीडितेला कळल्यानंतर, पीडितेने डॉ वैशाली भोजने ह्यांच्या विरोधात फ्रेझरपुरा पोलीस स्टेशन अंतर्गत तक्रार दाखल केली होती. सदर प्रकरणात फ्रेझरपुरा पोलीस स्टेशन अधिकारी ह्यांनी डॉ मयूर धांडगे यांना १९ ऑक्टोंबर रोजी अटक केली. चौकशी करून पुढील तपास केला.आरोपी डॉ मयूर दांडगे यांनी ॲड सपना जाधव ह्यांचा मार्फत जमानत मिळण्यासाठी अर्ज जिल्हा न्यायालय अमरावती येथे दाखल केला होता. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने डॉ.मयूर धांडगे यांना जामीन मंजूर करून त्यांची जामिनावर सुटका केली आहे. या प्रकरणात डॉ.धांडगे यांच्या वतीने ॲड. सपना जाधव यांनी प्रभावी व मुद्देसूद युक्तिवाद सादर केला. त्यांनी सांगितले की तक्रार व तपासाच्या अनुषंगाने डॉ. मयूर धांडगे यांचा सहभाग केवळ वैद्यकीय तपासणी, सल्ला व पुढील संदर्भ पुरवण्यापुरता मर्यादित होते.

डॉ. धांडगे यांचा थेट संबंध नसल्याचे तसेच ते तपासास पूर्ण सहकार्य करण्यास तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, तपासाच्या टप्प्यावर त्यांना कोठडीत ठेवण्याची आवश्यकता नसून न्यायालय देतील त्या सर्व अटी व शर्तींचे काटेकोर पालन केले जाईल, असा ठाम युक्तिवाद बचाव पक्षाकडून करण्यात आला.

दोन्ही युक्तिवाद, उपलब्ध कागदपत्रे आणि कायदेशीर तरतुदी विचारात घेऊन न्यायालयाने आरोपी डॉ. मयूर धांडगे यांना अटी व शर्तींवर जामीन मंजूर केला

राजकमल उड्डाणपूल इतिहास जमा

नवीन पूल बांधण्याचा मार्ग मोकळा -बेलपुरा मार्ग अनिश्चित काळासाठी बंद



अमरावती/प्रतिनिधीः- शहराची लाईफ लाईन मानला जाणारा राजकमल रेल्वे उड्डाणपूल पाडण्याचे काम आता निर्णायक टप्प्यात पोहोचले आहे. गुरुवारी रात्री पासून रेल्वे स्टेशन चौकापासून बेलपुराकडे जाणारा मार्ग पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. रात्रीच्या अंधारात पोकलेन मशीनच्या मदतीने या मार्गावरील उड्डाणपुलाचा वरचा भाग जमीनदोस्त करण्यात आला. त्यामुळे शहराच्या एका प्रमुख मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. सर्वात मोठी बाब म्हणजे आता हा रस्ता केवळ काही दिवसांसाठी नाही, तर नवीन पूल बांधून होईपर्यंत बंद राहणार आहे. त्यामुळे शहरवासीयांना दीर्घकाळ वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागणार आहे.

दुसरीकडे, राजकमल चौकापासून जयस्तंभ चौकाच्या दिशेने जाणारा पुलाचा भाग सध्या वाहतुकीसाठी खुला ठेवण्यात आला आहे. मात्र, बांधकामाच्या पुढील टप्प्यात हा मार्गही बंद होण्याची शक्यता आहे. म्हणजेच येत्या दिवसांत शहराच्या मध्य भागात वाहतुकीचा ताण आणखी वाढू शकतो. शहराच्या वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा राजकमल रेल्वे पूल सुमारे १२५ कोटी रुपयांच्या खर्चाने बांधला जात आहे. महारेल आणि एल अँड टी समूहाकडून या प्रकल्पाचे काम वेगाने पुढे नेले जात आहे. बांधकाम संस्थांनी वर्ष ☞(पान २ वर)

अखेर व्यापारी स्वतःहून काढणार दुकानासमोरील अतिक्रमण

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दुकानदाराचे लेखी आश्वासन

-शिवसेना शिंदे गटाचे बंडू घोम यांचे तिन दिवसानंतर उपोषण मागे

अचलपूर/प्रतिनिधीः-

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अमरावती मार्गावरील व्यापारी संकुला समोरील अतिक्रमणा विरोधात शिवसेना नेते बंडू घोम यांनी पुकारलेल्या आमरण उपोषणाला काल तिसऱ्या दिवशी यश आले. व्यापाऱ्यांनी नालीपासून दुकानाकडे जाणारे २० फूट अतिक्रमण स्वतःहून काढून घेण्याचे लेखी आश्वासन



दिल्यानंतर बंडू घोम यांनी आपले उपोषण मागे घेतले. अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अमरावती मार्गावरील व्यापारी संकुलातील काही दुकानदारांनी ठरलेल्या जागेपेक्षा पुढे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले होते. यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना व शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता, तसेच येथे अनेकदा अपघातही घडले होते. भविष्यात हे अतिक्रमण जीवघेणे ठरू नये, यासाठी ते तात्काळ हटवण्यात यावे, अशी मागणी बंडू घोम यांनी बाजार समितीकडे रीतसर पत्राद्वारे केली होती. प्रशासनाने दखल न घेतल्याने त्यांनी २५ नोव्हेंबरपासून उपोषण सुरू केले होते.गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या या उपोषणाची ☞(पान २ वर)

ग्रामपंचायतींचा कारभार गतिमान व लोकाभिमुख करण्यावर भर द्या - गट विकास अधिकारी राणी माळवे

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-

गावाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्रामपंचायतींचा कारभार अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकसहभागातून समृद्ध करण्यावर भर देणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून गावाच्या विकासाला नवी दिशा द्यावी, असे प्रतिपादन पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणी माळवे यांनी केले. पंचायत समिती चांदूर रेल्वेच्या सभागृहात आयोजित



'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत विशेष कार्यशाळेत त्या मार्गदर्शन करताना बोलत होत्या.

या कार्यशाळेला तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक यांच्यासह पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणी माळवे, सहायक गटविकास अधिकारी संजय खारकर, विस्तार अधिकारी (पंचायत) सुरेश चव्हाण, रमेश मेश्राम, तालुका व्यवस्थापक (RGSA) अनिकेत पाटील तसेच पंचायत समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळेदरम्यान शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्यांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामविकासाच्या माध्यमातून गावांना स्वयंपूर्ण बनविणे, स्वच्छता, जलसंधारण आणि स्थानिक ☞(पान २ वर)

शेतशिवारातील संत्रा चोरीचा छडा; मुख्य आरोपीला अटक

मालवाहू वाहन आणि रोकड जप्त

अमरावती/प्रतिनिधीः-

शेतकऱ्यांच्या संत्रा पिकांवर चोरट्यांची वक्रदृष्टी पडत असतानाच अमरावती ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने संत्रा चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावला आहे. पश्चोट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रामापूर शेतशिवारातून संत्र्यांची चोरी करणाऱ्या संशयित आरोपीला पोलिसांनी पाठलाग करून ताब्यात घेतले. या कारवाईत चोरीच्या गुन्ह्यात वापरण्यात आलेले पाच लाख रुपये किमतीचे टाटा झेनॉन मालवाहू वाहन आणि २७ हजार ४०० रुपयांची रोकड, असा एकूण ५ लाख २७ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पश्चोट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रामापूर शेतशिवारातून संत्र्यांची चोरी झाल्याची घटना घडली होती. याप्रकरणी पश्चोट पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतमालाला लक्ष्य करणाऱ्या चोरीच्या घटनांची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी स्थानिक गुन्हे शाखेला ☞(पान २ वर)

नेहरू मैदान परिसरात चाकू घेऊन दहशत पसरविणारा ताब्यात

अमरावती/प्रतिनिधीः-

शहरातील नेहरू मैदान परिसरात हातात धारदार चाकू घेऊन फिरत नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका इसमाला सिटी कोतवाली पोलिसांनी तातडीने ताब्यात घेतले. मुकेश किसनराव मापारी (४५, रा. हमालपुरा, संभाजी मंडळाजवळ, अमरावती) असे ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून नऊ इंच लांबीचा धारदार चाकू जप्त केला असून, त्याच्याविरुद्ध आर्म ॲक्ट आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा



दाखल केला आहे.

२६ नोव्हेंबर रोजी सिटी कोतवाली पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नेहरू मैदान परिसरात एका इसमाच्या ☞(पान २ वर)

यशदाच्या परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांची अमरावती जीएसटी कार्यालयास भेट

अमरावती/प्रतिनिधीः- यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या एकत्रित परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत शासन सेवेत नवप्रवेशित परिवीक्षाधीन गट-अ अधिकाऱ्यांनी गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६ रोजी अमरावती येथील वस्तू व सेवा कर कार्यालयास अभ्यास भेट दिली.

यावेळी यशदाचे वरिष्ठ अधिकारी डॉ. रामप्रसाद पोले उपस्थित होते. या अभ्यास दौऱ्यादरम्यान राज्यकर सह आयुक्त (अमरावती विभाग) महादेव लवटे यांनी प्रशासनातील शिस्त, वेळेचे काटेकोर पालन आणि कायद्याच्या ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. सर्वसामान्य नागरिक व करदात्यांशी संवेदनशीलतेने वागावे तसेच बदलत्या आर्थिक, कायदेशीर व तांत्रिक परिस्थितीत अद्ययावत राहून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून जनहितासाठी कार्यरत राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

राज्यकर उपायुक्त संगीता महाजन यांनी संयुक्त प्रशिक्षणाच्या माध्यमातून एकत्र आलेल्या अधिकाऱ्यांनी विविध शासकीय विभागांत समन्वय साधून काम करावे, अशी सूचना केली. तसेच, सहायक राज्यकर आयुक्त प्रविण भोपळे व राज्यकर अधिकारी सुनिल गोलोकार यांनी राज्याच्या महसूल संकलनातील जीएसटी विभागाची भूमिका, करप्रणाली, करनिर्धारण, तपासणी आणि कायदेशीर तरतुदींच्या ☞(पान २ वर)

गोवंशाची कत्तल करून मांसविक्री; स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

६५ किलो मांसासह कत्तलीचे साहित्य जप्त; एकाला अटक

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- गोवंशाची कत्तल करून त्याच्या मांसाची विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अंजनगाव सुर्जी येथील कुरेशीपुरा परिसरात छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत सुमारे ६५ किलो गोवंशाचे मांस आणि कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण २२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



करण्यात आला. याप्रकरणी मोहम्मद अशपाक शेख अहमद (वय ५०, रा. कुरेशी नगर, अंजनगाव सुर्जी) याला अटक ☞(पान २ वर)

अल्पवयीन मुलीस पळवून नेणारा आरोपी मध्य प्रदेशातून जेरबंद

चांदूरबाजार पोलिसांची भोपाल जिल्ह्यात कारवाई

बेलोरा/प्रतिनिधीः-

अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन फरार झालेल्या आरोपीस चांदूरबाजार पोलिसांना मध्यप्रदेश राज्यातील भोपाल जिल्ह्यातून शोधून अटक केली आहे आहे. तसेच १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी सुखरूप मिळविण्यात पोलिसांना यश आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, पोलीस स्टेशन चांदूरबाजार येथे दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी ☞(पान २ वर)



आदिवासी विकास मंत्र्यांच्या मतदारसंघातच समस्यांचा डोंगर!

धोत्रावासीयांचे प्रश्न ऐकणार कोण?

यवतमाळ/प्रतिनिधीः-

आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या विधानसभा मतदारसंघातील कळंब तालुक्याच्या धोत्रा गावात शेतकरी, युवक आणि सामान्य नागरिकांच्या समस्यांचा पाढा 'जनता की चौपाल'मध्ये वाचण्यात आला. क्रोकोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दीपके यांनी आयोजित केलेल्या या चौपालमध्ये ग्रामस्थांनी शेती, पीकविमा, नुकसानभरपाई, बेरोजगारी, शिक्षण आणि मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न मांडत प्रशासनाच्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त केली. विशेष म्हणजे, आदिवासी विकास मंत्र्यांच्या मतदारसंघातील गावातच नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी अशा व्यासपीठाचा आधार घ्यावा लागत असल्याने स्थानिक प्रश्नांच्या सोडवणुकीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

शेतीचे नुकसान होऊनही अनेक शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत असल्याच्या ☞(पान २ वर)

दर्यापूर नगर परिषदेत रुग्णवाहिकेची प्रतिक्षा संपणार

लवकरच रुग्णसेवेत होणार दाखल!

पालिका अध्यक्ष मंदाकिनी भारसाकळे यांची माहिती

खल्लार/प्रतिनिधीः-

दर्यापूर नगर परिषदेची काही तांत्रिक कारणास्तव बंद अवस्थेत असलेली रुग्णवाहिका आता लवकरच पुन्हा रुग्णांच्या सेवेत दाखल होणार आहे. या रुग्णवाहिकेचे नूतनीकरण करून ती शहरवासीयांच्या आरोग्य सेवेसाठी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.



दर्यापूर नगर परिषदेची रुग्णवाहिका तांत्रिक कारणांमुळे अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत होती. मात्र, शहरातील नागरिकांची आरोग्यविषयक गरज लक्षात घेता रुग्णवाहिका पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. नूतनीकरणानंतर ही रुग्णवाहिका नागरिकांच्या सेवेत उपलब्ध होणार असल्याची माहिती पालिका अध्यक्ष मंदाकिनी भारसाकळे यांनी दिली.

यावेळी त्यांनी शहरातील सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांना आवाहन करताना सांगितले की, रुग्णवाहिका हा कोणत्याही ☞(पान २ वर)

सफाई कर्मचाऱ्यांच्या आवास, आरोग्याबाबत कार्य करा

राज्य सफाई कर्मचारी आयोग अध्यक्ष शेरसिंग डागोर



अमरावती/प्रतिनिधीः- स्वच्छता राखण्यात महत्वाचा घटक असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आवास आणि आरोग्याच्या बाबतीत यंत्रणांनी कार्य करावे, असे आवाहन राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी केले.

नियोजन भवनात सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

डागोर म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांच्या आवास योजना प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. यासाठी ☞(पान २ वर)

ग्रामसखीनेच केली महिला बचतगटांसह शासनाची ५.८५ लाखाने फसवणूक

आरोपी महिलेविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल

-तिवसा तालुक्यातील भारवाडी येथील घटना

तिवसा/प्रतिनिधीः- उमेद अभियानाअंतर्गत बचतगटाशी संलग्नित असलेल्या तिवसा तालुक्यातील भारवाडी येथील ग्रामसंघाच्या ग्रामसखीनेच बचतगटाच्या महिलांचा विश्वासघात करून शासनासह बचतगट समूहाची ५ लाख ८५ हजार रुपयाने आर्थिक फसवणूक केल्याची घटना उघडकिस आली असून याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा व तिवसा पोलिसांनी केलेल्या तपासाअंती आर्थिक फसवणूक करणाऱ्या ३२ वर्षीय महिलेविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरती नामक ग्रामसखी महिलेविरुद्ध पंचायत समितीच्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान(उमेद)चे तालुका अभियान व्यवस्थापक हरीश फरकाडे यांनी तिवसा पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून गुरुवारी तिवसा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सविस्तर असे की,उमेद अभियानांतर्गत लहानुजी ग्रामसंघ भारवाडी हा कार्यरत असून सदर ग्राम संघाशी एकूण १७ बचत गट संलग्न आहेत. त्यापैकी दुर्गा महिला स्वयंसहाय्यता ☞(पान २ वर)